पुणें मराठी ग्रंथालय
नाटक ५५
क्रमांक— २०८

साईनाथप्रे

# नारदवाक्य

अथवा

# अश्वत्थाम्या

रा. ब. हरि वि

माजी सुपरिंटेंडंट, लँड रेकॉर्डस ॲ

यांनी लिहि

नारायण सदा

व

दत्तात्रय वामन

शुक्रवार पे

शि

यांत छ

थाथीथालय
थाल ३ २०८
थालय ३-३-१

किंमत १

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीसमर्थसाईबाबागुरुभ्यो नमः ॥

# नारदवाक्यनाटक

अथवा

## अश्वत्थाम्याचें स्वप्न.


## रा. ब. हरि विनायक साठे,

माजी सुपरिंटेंडंट, लँड रेकॉर्डस अँड रेजिस्ट्रेशन, मध्यभाग, पुणें,


यांनीं लिहिलें तें


**नारायण सदाशिव जोशी**

व

**दत्तात्रय वामन देशपांडे,**

**शुक्रवार पेठ, पुणें,**

यांनीं पुणें येथें शि. म. परांजपे यांच्या

**गोवर्धन** छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें असे.



[ सन १८६७ च्या २५ व्या ॲक्टाप्रमाणें कर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. ]


किंमत १ रुपया.

# अर्पणपत्रिका.

## श्रीसमर्थसाईनाथमहाराज

**यांचे चरणीं**

हें नाटक परमादरानें अर्पण केलें असे.

### श्लोक.

यस्य स्मरणमात्रेण ज्ञानमुत्पद्यते स्वयम् ।
स एव सर्व संपत्तिस्तस्मै श्रीगुरवे नमः ॥

गुरुगीता.

### आर्या.

हें नाटक वाचुनिया झाली मम मानसा जशी शांती ॥
तैशी हो सर्वांना, कर्मठ, शठ, वा असोत वेदांती ॥१॥
हें मागणें प्रभूजी माझें तुजपाशिं जोडुनी हात ॥
द्यावें त्वां मज साई, देइ जसा बालकासि तत्तात ॥२॥

### छक्कड.

बाबा तुम्हांसनी हें नाटक करितों अर्पण ॥
साई तुम्हांसनी हें नाटक करितों अर्पण ॥ १ ॥
आम्ही पोरें आपलीं लई लहान ॥ आम्हां दिलेंती मायंदळ ग्यान ॥ त्याणें हरपलें आमुचें देहभान ॥ ह्मणूनश्यानी घेतों आम्हीं छक्कडीची तान ॥ १ ॥ ह्याला लावूनश्यानी तुम्ही हातभार ॥ करा याचा तुम्ही भक्तांमदीं प्रसार ॥ म्हणजे चालेल आमचा नामी रोजगार ॥ हेंची तुम्हांसनी आमुचें मागणें वारंवार ॥ २ ॥

**नारायण सदाशिव जोशी.**
**दत्तात्रय वामन देशपांडे.**

# प्रस्तावना

अथवा

## द्रष्ट्याचे चार शब्द.

अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत कोपरगांवचे दक्षिणेस दोन योजनांवर शिलधी उर्फ शिरडी ह्मणून क्षेत्र आहे. तेथें माझे गुरु श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांचें वास्तव्य आहे. हे सिद्ध पुरुष साईबाबा ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. गेल्या गुरुपौर्णिमेस मी महाराजांचे पूजेस शिरडी येथें गेलों होतों. पौर्णिमेचे दुसरे दिवशीं तिसरे प्रहरीं महाराजांचे प्रधानशिष्यगणांपैकीं वरिष्ट दर्जाचे देशपांडेकुलभूषण माधवरावजी, उर्फ शामराव, हे माझ्याकडे आले, व तुह्मांला बाबांनीं दासबोधांतला आठवा दशक मंडळीपुढें वाचण्यास सांगितलें आहे, असें ह्मणाले. शामरावजींच्या ह्या निरोपाप्रमाणें त्या रात्रीं आठव्या ( ज्ञान ) दशकाचे चार समास मी श्रोतृवृंदापुढें वाचले, व त्यापैकीं कित्येकांना ज्या शंका होत्या, त्यांचें यथामति निरसन करून घरीं आलों. पण घरीं आल्यावर झोंप लागेना. आज सहा सात वर्षांत महाराजांनीं असलें महत्त्वाचें काम मला कधीं सांगितलें नव्हतें, आणि आजच कां सांगितलें, हेंच माझ्या मनांत घोळूं लागलें. आणि अखेरीस डोळा न लागतां पहाट झाली, व मी उठून बसलों. पुढें स्नानसंध्यादि विधि आटोपून महाराजांकडे आरतीस गेलों. तेथें माधवरावजीही आले होते. त्यांनींच परस्पर महाराजांस आदले दिवशींच्या पुराणाची हकीकत सांगितली. महाराजांनीं कांहीं एक उत्तर न देतां माझेकडे पाहून " रोज वाचीत जा, तुझें कल्याण होईल ! " असें सांगितलें. आरती झाल्यावर मी घरीं आलों, आणि भोजन उरकून पान खाण्याकरितां बसलों. रात्रीं जे विचार माझ्या मनांत घोळत होते, ते आतांपर्यंत तसेच चालू होते. असो. पुढें एका हातांत पान घेऊन त्यास चुना लाविला, इतकी

मला आठवण आहे. त्यानंतर मी तसाच बसलों असतां मला स्वप्न पडण्यास सुरवात झाली. स्वप्नांत प्रथम माधवराव आले, व मला ह्मणाले कीं, बाबा येत आहेत. ते इतकें बोलत आहेत, तों बाबा आलेच ! मी उठून उभा राहिलों. बाबांना साष्टांग नमस्कार घातला, व पुन्हां हात जोडून उभा राहिलों, तों पुढील नाटक साग्र माझ्या दृष्टीस पडलें, अथवा वास्तविक ह्मटलें तर खुद्द समर्थ बाबांनीं दाखविलें. नाटक पुरें झाल्यावर बाबा मला ह्मणाले: " जा आतां, आणि तूं पाहिलेलें नाटक प्रसिद्ध कर ! तुला ह्या कामीं मदत लागल्यास तुझा वडील गुरुबंधु उपासनी अगर तुझा भाविक मित्र माधवराव हरी मोडक करील. " इतकें बोलून बाबा निघून गेले. पुढें मी उपासनींकडे जाण्यास निघालों, तों वाटेंत मला एक भव्य जटामंडित,भस्म चर्चिलेले व विशाळ दाढीचे यति भेटले. त्यांस मी नमस्कार करून आपण कोण ह्मणून विचारतांच " या देहाला मैत्रेय ऋषि ह्मणतात, " असें ते ह्मणाले. मी लागलेंच त्यांना " कार्यकारण रामायण आपले जवळ आहे का ? " ह्मणून विचारलें. ते ह्मणाले: " तूं जर माझे बरोबर काशीस आलास, तर माझे जवळ तें रामायण आहे, तें मी तुला वाचावयास देईन. " मी त्यांचे बरोबर जाण्याचें कबूल करून व त्यांना नमस्कार करून लागलाच परत फिरलों, आणि काशीस जाण्याची बांधाबांध करूं लागलों. त्या धांदलींत जवळच पाण्यानें भरलेला तांब्या होता, त्यास धक्का लागून त्यांतील सर्व पाणी माझे संत्रजीवर सांडून माझें धोतर व पाय भिजले. आणि त्यामुळें मी एकदम जागा झालों. जागृति आल्यावर पानसुपारी खाऊन कोणाशीं कांहीं एक न बोलतां उठून, तडक तेथील खंडोबाचे देवळांत उपासनी मुनि राहतात, त्यांचेकडे गेलों, व त्यांस साष्टांग नमस्कार घालून स्वप्नांत पाहिलेली सर्व हकीकत निवेदन केली, व त्यांचा अभिप्राय विचारला. ते ह्मणाले, " हल्लीं मराठी वाङ्मय मोठ्या झपाट्यानें उच्च दरज्यास चढत असल्यामुळें तुमच्या सारख्यांचे ग्रंथ ह्मणजे एक प्रकारचें लोढणेंच होणार आहे , व त्यामुळें

वाङ्मयाच्या आरोहणाची गति कमी होईल, कदाचित् अजीबात खुंटेलही ! तर असें धाडसाचें काम करूं नका. तुह्मांस स्वतः प्रतिभा, शब्दलालित्य, भाषाचातुर्य इत्यादि ग्रंथकर्तृत्वास लागणाऱ्या गुणांचें कांहीं एक ज्ञान नाहीं. व तें असल्याशिवाय तुमचें पुस्तक बेचव होऊन त्यास कोणी हातांत सुद्धां धरणार नाहीं. आणि तुमची ही उणीव भरून निघणें आतां शक्य नाहीं; मग तुह्मांला साह्य करणारे माधवराव असोत, मैत्रेय ऋषि असोत, किंवा मी असों !" मी ह्मटलें कीं, " असें आहे, तर तुमच्या गुरुजींनीं—बाबांनीं–हा बोजा माझे डोक्यावर कां ठेविला ? त्यांचे दुसरे विद्वान् शिष्य काय थोडे आहेत ? " मी असें म्हटलें, त्या वेळीं उपासनी जरा विचारांत पडले, व अंमळ डोळे मिटून स्वस्थ बसले. पुढें डोळे उघडून ते मला ह्मणाले, "तुमच्याकडूनच हें काम करवावयाचें असा बाबांचा संकल्प दिसतो. व ज्या अर्थी हें काम करण्याची बाबांनीं तुम्हांला समक्ष येऊन आज्ञा केली आहे, त्या अर्थी ते तुमच्याकडून तें करवूनही घेतील. ' मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीन्' हा श्लोक तुह्मांला माहीत आहेच. मग काळजी कसली ? बाबांचें स्मरण करून लेखणी घेऊन सुरवात करा. तेच तुमचे हृदयांत बसून सर्व तुमचे हातानें लिहून काढतील. उठा, आतां विलंब लावूं नका." ह्याप्रमाणें त्यांनीं सांगितल्यावरून त्यांचे पायावर मस्तक ठेवून व त्यांची आज्ञा घेऊन मी घरीं आलों, आणि दुसरे दिवशीं सद्गुरु सांईनाथ महाराजांचें दर्शन व आशीर्वाद घेऊन पुण्यास आलों, व ताबडतोब नाटक लिहिण्यास प्रारंभ केला.

नाटकाचा कच्चा खर्डा पूर्ण तयार झाल्यावर तो वाचीत बसलों असतां माझे स्नेही, रा. रा. कृष्णाजी लक्ष्मण सोमण, हे मला भेटण्याकरितां आले. त्यांस पाहून मला फार आनंद झाला. व मी तो नाटकाचा खर्डा त्यांचे हातांत देऊन त्यांस म्हटलें: " भाऊ, आपण केवळ समर्थ सांईबाबांच्या प्रेरणेनें ह्या वेळेस येथें प्राप्त झालांत, असें ह्मटलें पाहिजे. मी आपलीच वाट चातकाप्रमाणें पहात होतों. आतां

हें नाटक आपण वाचून त्यांत कांहीं कमी जास्ती करण्याची आपल्यास जरूर वाटते किंवा कसें, तें आपण सांगितल्यास माझ्यावर मोठी मेहेरबानी होईल." भाऊंनीं नाटक हातांत घेउन पांचपंचवीस पानें उडत उडत वाचून व इकडून तिकडे चाळवून तो खर्डा खालीं ठेवला, व नाकांत तपकिरीची एक भक्कम चिमटी कोंदून, नाक मुरडून व डोळ्यांस पाणी आणून स्वस्थ बसले! मी त्यांस ह्मटलें कीं, "तुमची ही हिरमुसलेली मुद्रा तपकिरीच्या बारानें झाली आहे, कीं माझें नाटक वाचून झाली आहे, हे मला कसें कळावें?" भाऊ ह्मणाले, "तात्यासाहेब, आपणास राग न येईल, तर सांगतों. एकंदरींत नाटक ठीक आहे. परंतु तें रंगभूमीवर आणण्यास त्यांत बरेच फेरफार करावे लागतील. ते आपण केले, ह्मणजे नाटक प्रसिद्ध करण्यास हरकत नाहीं. आणि ते फेरफार मी सांगतों त्याप्रमाणें करा, ह्मणजे झालें." मी ह्मटलें: "आपण मला फेरफारांचें एक टिपण करून द्या, ह्मणजे मी त्याप्रमाणें सुधारणा करून समर्थांचे आज्ञेप्रमाणें पुस्तक प्रसिद्ध करीन. मग जें होणार असेल तें होवो." नंतर भाऊंनीं मला एक टिपण करून दिलें, व ते ह्मणाले: "ह्याप्रमाणें सुधारणा करा व होतां होई तों एकशें वीस पानांवर पुस्तक जाऊं देऊं नका. असें करतांना एकाद दुसरा प्रवेश कमी करावा लागला, अगर अजीबात गाळावा लागला, तरी बेलाशक कमी करा अगर गाळा, आणि मग प्रसिद्ध करा. शब्दांतही बराचसा फेरफार करावा लागेल. तो तुह्मी मराठी कोश अगर भारत भागवताचें मराठी भाषांतर माधवरावजी मोडकांनीं केलें आहे, त्यांतले वेचक शब्द घेऊन करा; ह्मणजे तुमचें हेंच नाटक विद्वान् लोकांस पसंत पडेल, निदान त्याज्य तरी होणार नाहीं." इतकें सांगून इकडल्या तिकडल्या गप्पा मारून भाऊ निघून गेले.

भाऊ गेल्यावर मी फार परिश्रम करून त्यांच्या टिपणाबरहुकुम सर्व सुधारणा केली. पण कांहीं केल्या पानांची संख्या एकशेंविसांचे आंत येईना. मग निराश होऊन लिहिलेलीं पानें पुढें ठेवून स्वस्थ बसलों. इतक्यांत माझे शेजारी व स्नेही, रा. नारायण सदाशिव जोशी,

माझेकडे आले, व मला सचिंत बसलेला पाहून ह्मणाले, " कसली विवंचना चालली आहे? " मी त्यांस सर्व हकीकत सांगितल्यावर ते ह्मणाले: " ह्यांत काय चिंता करण्याचें कारण? पुस्तक मी छापतों. आणा इकडे तो खर्डा. तुह्मी फक्त किंमत किती ठेवावयाची तेवढें सांगा, म्हणजे झालें !

मी नारायणरावांच्या स्वाधीन खर्डा करून म्हणालों कीं, किंमत तुह्मीच ठरवा. परवां नुकताच केसरींत लेख आला होता. त्यावरून आमचे गुरु पैसा उकळणारांपैकींच असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. व त्यांचाच शिष्य मी असल्यामुळें मलाही—पैसा उकळण्याकरितां हें पुस्तक लिहिलें आहे—असेंच लोक म्हणणार ! तेव्हां किंमतीबद्दल मला न विचारतां तुह्मीच ती चार शिष्ट व संभावित गृहस्थांस विचारून ठरवावी हें बरें. इतकें झाल्यावर नारायणराव जोशी व त्यांचे मित्र दत्तात्रय वामन देशपांडे ह्यांनीं पुस्तक श्रीसमर्थ साईबाबांस अर्पण करण्याबद्दल गोष्ट काढिली. मी म्हटलें कीं, पुस्तक त्यांचेच व मीही त्यांचाच ! मग अर्पण कोणी व काय करावयाचें ! ते म्हणाले, आम्ही अर्पण करून पुस्तकाची पुढील व्यवस्था आपल्याकडे घेतल्यास आपली कांहीं हरकत आहे का? मी म्हणालों कीं, बिलकुल नाहीं. तुम्हांला वाटेल, तसें करा. इतकें बोलणें झाल्यावर रा. नारायणराव व दत्तोपंत यांनीं नाटकाचा खर्डा घेऊन पुढील तजवीज केली.

आतां प्रस्तावनेंत आभार प्रदर्शित करणें अवश्य असल्यामुळें मी प्रांजळपणानें वर निर्दिष्ट केलेल्या सर्व गृहस्थांचे व त्या शिवाय मोरशास्त्री दीक्षित वांईकर वगैरे सर्वांचे आभार मानतों. रा. सोमण ह्यांचें मला प्रोत्साहन नसतें तर हें पुस्तक प्रसिद्ध झालें नसतें, असें म्हणण्यांत मला तर बिलकुल अतिशयोक्ति दिसत नाहीं.

पुणें.
फेब्रुवारी १९१३. } हरिपंत साठे.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीसमर्थसाईबाबाय नमः

# अथ नारदवाक्य नाटक

अथवा

# अश्वत्थाम्याचें स्वप्न.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला

( स्थळ-क्षीरसागर शेषशयन, लक्ष्मीविष्णुसंवाद. )

**भगवान् विष्णु**—( शेषावर उठून बसून ) प्रिये, चल, मला आतां आर्यावर्तकार्यागारांत गेलेंच पाहिजे. तेथें नारदमुनि एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें वाटाघाट करण्याकरितां इतक्यांत येतील. मला आर्यवर्ताकडे जाण्याचें कारण दिसल्यास मी जाणार आहें. तुलाही माझे साह्यास आलें पाहिजे.

**लक्ष्मी**—माझी केव्हां ना आहे ? मी आपल्याबरोबर आलें नाहीं, असें केव्हां तरी झालें आहे ? त्यांतून आर्यावर्तास जाण्याची मला मनापासून हौस. मग मी आपल्याला एकटें बरें जाऊं देईन ?

**विष्णु**—तूं आर्यावर्ताला आनंदानें येशील, हें मला माहीत आहे. माझे विचारण्याचें मर्म तुझे लक्षांत आलें नाहीं. तेथें माझे बरोबर येऊन मला माझे कामांत आनंदानें साह्य करशील का, असा माझा प्रश्न आहे.

**लक्ष्मी**—आपल्या प्रश्नावर माझा असा आपणास उलट प्रश्न आहे कीं, आपल्याबरोबर मी आर्यावर्तास आलें असून आपल्या कामांत साहाय्य केलें नाहीं, असें कधीं तरी झालें आहे, असें आपण दाखवाल काय? एकूण बाई पुरुषांपाशीं बायकांची काडीचीही किंमत नसते ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं. रामावतारीं, तसेंच कृष्णावतारीं, मी आपल्याबरोबर इतक्या खस्ता खाल्या, त्या साऱ्या व्यर्थ गेल्या तर!

**विष्णु**—नाहीं, व्यर्थ कोण ह्मणतो? पण तुला अजून माझ्या प्रश्नाचें गुह्य समजलेंच नाहीं, असें वाटतें. तूं मला रामावतारीं, तसेंच कृष्णावतारीं, साह्य केलें नाहींस, अथवा जें तूं त्या अवतारीं केलेंस त्याची मला किंमत नाहीं, असें मी कधीं ह्मटलें नाहीं, आणि पुढेंही मला तसें ह्मणणें वाजवी होणार नाहीं. राम व कृष्ण या अवतारीं तुझीच कीर्ति, तुझेंच श्रेष्ठत्व, तुझाच सन्मान वाढविणारे प्रसंग वारंवार येत. तेव्हां तुझें पाऊल पुढें यांत नवल तें काय? सध्यां आर्यावर्तांत तसलें थोडेंच कार्य करावयाचें आहे. नारदाबरोबर इकडून तिकडे फुकट धक्के मात्र खावे लागणार. आणि मला सध्यां पंढरीचा चांगलाच अनुभव आला आहे. ह्मणून सहज प्रश्न विचारला.

**लक्ष्मी**—पंढरीचें ठीकच! तेथें आपण जर त्या चंद्रभागेचें व पुंडरीकाचें रात्रंदिवस स्तोम माजवूं लागलां, तर आमची बायकांची जात! आम्हांला तें कसें खपावें? पण तेथें झालें, तरी मी आपणास कधीं आडवी आलें आहे? मी आपली मागील सोप्यांत जाऊन बसतें. मग आपल्या मनास येईल त्याप्रमाणें आपण नाचत असतां. तेव्हां मी कधीं 'ब्र' तरी काढतें का?

**विष्णु**—तूं 'ब्र' काढीत नाहींस हें खरें; पण तूं इतकी हिरमुसलेली आणि उदास असतेस कीं, माझे हातपाय ढिले पडून माझें मन अगदीं खचून जातें. एकादे वेळीं मला असें वाटतें कीं, आदिदेव शंकराकडे जाऊन त्याच्या आज्ञेनें तुझा त्याग करून एकदा मोकळें व्हावें, ह्मणजे मला माझें जगत्पालकाचें कर्तव्य सुरळीतपणें बजावतां येईल.

**लक्ष्मी**—हं, होऊं द्या एकदां मनाप्रमाणें. मलाही शंकर ओळखतात पण. मीही त्यांना विचारीन कीं, मला आपण इतका खटाटोप करून उत्पन्न केलीत आणि इकडच्या गळ्यांत बांधलीत, ती हा ह्यांचा पंढरीचा धुमाकूळ पहाण्यासाठीं ? आणि तेथें ह्यांच्या टाळकुट्या भक्तांकडून होणारा अपमान सोसण्याकरितां वाटतें ?

**विष्णु**—पंढरीस आमचा धुमाकूळ चालतोना ?

**लक्ष्मी**—धुमाकूळ नाहीं तर काय ? श्रुति नाहीं, स्मृति नाहीं, कशाचीही चाड न बाळगतां तुम्ही त्या चंद्रभागेला बगलेंत मारून कोणाचें दळणच दळ, कोणाच्या गवऱ्याच वेंच, कोणाचें बाळंतपणच कर, कोणाचीं गुएलींच धू ! हें काय बाई ? हा धुमाकूळ नव्हे, तर ह्याला काय म्हणावयाचें ? आणि बायकांनीं नुस्तें नाक मुरडलें, तर खपावयाचें नाहीं. मीही शंकरांना हे इकडचे वेडेविद्रे चाळे सांगून विचारीन कीं, तुम्ही इकडे अशीच आज्ञा केली आहे का ? आणि अशी असेल, तर मी ह्यापुढें कसें वागावयाचें ?

**विष्णु**—जाऊं दे ग ! उगीच क्षुल्लक गोष्टींत आपल्यासारख्यांनीं शंकरापर्यंत गाऱ्हाणीं नेणें बरें दिसतें का ? पण तूं काय करशील ? युगमाहात्म्यच तसें आहे.

**लक्ष्मी**—इकडे कसचें युग आणि महात्म. जाणून सवरून वांकडें पाऊल टाकावयाचें, आणि खापर फोडावयाचें त्या बिचाऱ्या कलीवर ! लोकांना अगदीं खरेंच वाटेल जसें कांहीं. शंकर नाहींत का आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावीत. त्यांना कलि काय करतो ? कधीं आड येतो का त्यांच्या कामांत ? इकडे नाहीं का ठाऊक, त्यांच्या पुढें कलि कसा वागतो तें ?

**विष्णु**—( लक्ष्मीला जवळ घेऊन व तिचें चुंबन घेऊन ) माझीच थोडी चूक झाली आहे, मी कबूल करतों. मग तर झालें ना ? जा तर आतां. कोणत्याही कार्यास जाते समयीं गृहिणीशीं तंटा करून तिला कष्टी करून जाऊं नये. तिला हस्तमुख, आनंदांत ठेवून जावें,

असें शास्त्र आहे. आणि आपण जर शास्त्राविरुद्ध वागूं लागलों, तर लोक काय ह्मणतील बरें ? जा तर आतां आनंदानें विश्रांति घे. मी आर्यावर्तास गेलोंच, तर तुला खास नेईन. तुझ्यावांचून मला एकट्याला तेथें कोण पुसणार आहे ? [ पडदा पडतो.

## प्रवेश २ रा.

( अनघपुराजवळील नारदोद्यान. )

**नारद**--( ब्रह्मवीणा घेऊन ' नमो भगवते तुभ्यं वासुदेवाय धीमहि । प्रद्युम्नायानिरुद्धाय नमः संकर्षणाय च ॥ ' असा नाममंत्र म्हणत प्रवेश करतो.) ( सभोंवार पाहून ) काय, अजून समय प्राप्त झाला नाहीं ! माझे समाधीचे कालावरून आतां बिलकूल अवकाश नाहीं, असें मला वाटतें. मग अश्वत्थामा कां बरें अद्याप येत नाहीं ?

( अश्वत्थामा अंगावर धोतर व डोक्यावर दुसरें मळकट धोतर बांधून कपाळास हात लावून प्रवेश करितो ).

**अश्वत्थामा**--महाराज नारदमुने, मी द्रौणि–अश्वत्थामा–चरणाप्रत वंदन करितों.

**नारद**—वत्सा, तुझें कल्याण असो. तुझीं तपादि कर्में निर्विघ्न चाललीं आहेत ना ?

**अश्वत्थामा**--महाराज, कशाचें तप आणि कशाचीं कर्में घेऊन बसलांत. मला तर माझें जीवित नकोसें झालें आहे. महाराज, माझें चरित्र बरेंच लांब आहे. आपण जर स्वस्थ मनानें तें ऐकून घेऊन माझ्या दुःखाचा परिहार कराल, तर माझ्यावर अनंत उपकार होतील. आपण क्षणभर खालीं बसावें. मी सर्व आपणास निवेदन करितों. व ह्याच हेतूनें मी आपलेकडे धापा टाकीत आलों आहे.

( दोघे खालीं बसतात. )

**नारद**--वा द्रौणे, अगोदर हें मला कळूं दे कीं, सध्यां ह्या भारतवर्षांत वेदविहित कार्यें होत असतात काय ? आम्रवृक्ष दरवर्षी

फलद्रूप होतात काय? इंद्र प्रत्येक वर्षीं नियमित वेळीं पर्जन्यवृष्टि करितो काय? आणि भागीरथीचें माहात्म्य लोक मानतात काय?

**अश्वत्थामा**—ह्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मी साधारण माहितीवरून नकारार्थकच देतों. आम्रवृक्षांबद्दल मात्र मी खात्रीनें सांगतों कीं, अलीकडे या आम्रवृक्षांस वर्षाआड फळें येऊं लागलीं आहेत!

**नारद**—ठीक आहे तर. आतां तुझे कष्टाचे दिवस संपले ह्मणून समज.

**अश्वत्थामा**—महाराज, आपण माझी थट्टा करितां कीं काय? आम्रवृक्षांच्या फलांचा आणि माझ्या क्लेशांचा काय संबंध आहे?

**नारद**—बा द्रौणे, मी कधीं असत्य बोलत नाहीं, हें तर तुला ठाऊकच आहे. मग मी विचारलें, ह्याजबद्दल तुला संशय कां?

**अश्वत्थामा**—महाराज, आपलें सत्य हेंच व्रत आहे, हें मी पक्कें जाणतों. मला जो संशय आहे, तो फक्त माझ्या क्लेशांचा, आणि आम्रवृक्षांच्या फलांच्या अथवा भागीरथीच्या माहात्म्याच्या संबंधाचा?

**नारद**—अरे, तुझे क्लेश आतां लौकरच संपणार आहेत,—नाहीं, संपलेच ह्मणून समज! तुला मी जे आम्रवृक्षांबद्दल व इतर दुसरे प्रश्न विचारले, ते कालनिर्णयासाठींच विचारले. आणि तुझ्या उत्तरावरून तुझा क्लेशनिरसनकाल अगदीं समीप येऊन ठेपला आहे, असें ताडलें. हाच तो संबंध आणि हें सर्व पूर्वींच ठरलेलें आहे.

**अश्वत्थामा**—पण मला कसले क्लेश होत आहेत, हें काय बरें आपणास ठाऊक? मी अजून त्यासंबंधानें एक चकारशब्द सुद्धां बोललों नाहीं. माझी साग्र हकीकत तर एकदां ऐकून घ्या.

**नारद**—मी सर्व जाणतच आहें. पण तुला पाहिजे असल्यास बोल, काय बोलावयाचें तें.

**अश्वत्थामा**—महाराज, भारती युद्धाचे अखेरीस माझे मस्तकावरील माणि अर्जुनानें काढून घेतला. तेव्हांपासून जी माझी दैना झाली आहे, ती सांगतां पुरवत नाहीं. तेव्हांपासून श्रीकृष्णाच्या शापाप्रमाणें

मी तीन हजार वर्षें भिक्षावृत्तीनें उदरनिर्वाह केला. व डोक्याची जखम तुपाची भिक्षा मागून भरून काढून काळ कंठीत होतो. पुढें सुमारें हजार बाराशें वर्षें धान्यभिक्षा मिळेनाशी झाली. तुपाचें तर नांवच नको. अशा वेळीं मी उंच्छवृत्तीनें निर्वाह केला. व कपाळाचे क्लेश स्वस्थ पडून सहन केले. अलीकडे हजार आठशें वर्षें फार हाल काढावे लागले. पण अलीकडचीं दोन तीनशें वर्षें तर माझे हाल कुत्रा सुद्धां खाईनासा झाला आहे. शेतांत लोक धान्य पेरीत नाहींसे झाले. उंच्छ-वृत्ति बरोबर चालेना. मग कित्येक दिवस झाडपाला खाऊन काढले. पण कधीं कधीं तर टोळांनीं अथवा कीटकांनीं झाडपाला फस्त केल्या-मुळें मला निव्वळ फाका मारावा लागे. उदरनिर्वाहाची जर ही रड, तर डोक्याच्या जखमेचा भाव कोण पुसतो ! आणि तपादि कर्में कशीं सुचणार ?

**नारद**—ह्या सर्व क्लेशांच्या मुळाशीं काय आहे, याचा तूं कधीं विचार केला आहेस काय ? मागें पहा तर खरें एकदा, ह्मणजे तुला प्रत्यक्ष अनुभव येईल.

**अश्वत्थामा**—( मागें पाहून ) महाराज, त्या साध्वी द्रौपदीच्या पांच पुत्रांच्या हत्या माझे पाठीस लागलेल्या मला दिसत आहेत. गोष्ट होऊन गेली, त्याला मी आतां काय करणार ? माझ्या अन्नदात्या त्या दुर्योधनाची ती भग्नोरुत्वाची स्थिति पाहून माझें देहभान नाहींसें झालें. व तशा बेभान स्थितींत तो घोर अत्याचार माझे हातून घडला. झालेल्या गोष्टीबद्दल मला पूर्ण पश्चात्ताप होत आहे. ह्याशिवाय दुसरें मी ह्या माझ्या शोचनीय स्थितींत काय करणार ?

**नारद**—तेंच करण्याकरितां मी येथें प्राप्त झालों आहें. मी जें कृत्य करणार आहें, तें वेदविहित असून विशेष श्रमाचेंही नाहीं. आणि त्याचा प्रभाव असा आहे कीं, तें पूर्ण रीतीनें झाल्याबरोबर तुझ्या सर्व पातकांचें क्षालन होऊन तुझें दौर्ब्राह्मण्यही नाहींसें होईल. व मग तुला तपादि साधनें करण्यास कसलीही अडचण रहाणार नाहीं.

**अश्वत्थामा**--तसें असेल तर महाराज आतां विलंब कां? आपणास कोणाच्या साह्याची अवश्यकता आहे का? माझ्याच्यानें कांहीं होण्यासारखें आहे का? आपण कोणतें कृत्य करण्याचें योजिलें आहे, तें तरी कळूं द्या.

**नारद**--जरा दम धर. तूं अलीकडे भगवान् व्यासांना भेटला होतास काय?

**अश्वत्थामा**--होय महाराज, मी प्रथम व्यासांकडेसच गेलों होतों. व त्यांनींच मला आपणास भेटावयास सांगितलें. त्यांनीं माझ्याकडे कृपादृष्टीनें पाहिल्याबरोबर माझे अंगांत इतकी धमक आली आहे कीं, मी तेथून जो उसळलों, तो आपल्यापुढें येऊन उभा राहिलों. मला भगवान् व्यासांनींच आपण ह्या वेळेस येथें भेटाल असें सांगितलें.

**नारद**--व्यासांनीं तुला तुझ्या पातकनिरसनार्थ कांहींच का सांगितलें नाहीं?

**अश्वत्थामा**--कांहीं एक नाहीं.

**नारद**--ठीक आहे. तर मी आतां करतों काय करावयाचें तें. मी सोमयाग करण्याचें मनांत योजिलें आहे. ह्याच्यासारखें पातकाचा क्षय करणारें व पुण्यप्राप्ति करून देणारें ब्राह्मणाला दुसरें साधनच नाहीं.

**अश्वत्थामा**--आपण ह्मणतां हें खरें आहे. पण हें सोमयागाचें कृत्य चार मंडळी जमल्याखेरीज एकट्याच्यानें का होणार आहे? आणि सांप्रत कलियुग असल्याकारणानें आपल्याला उघड रीतीनें मंडळींत कसें मिसळतां येणार?

**नारद**--तें सर्व माझ्याकडे लागलें. तूं मात्र एवढी खबरदारी ठेव कीं, याग झाल्यावर अवभृथस्नान होऊन मंडळी आपापल्या घरीं जाईल, तोंपर्यंत शांतवृत्तीनें रहा. कोणाशीं भांडण उकरून काढूं नकोस, ह्मणजे झालें.

**अश्वत्थामा**--मला भांडण करण्याचें कारण? माझ्याच कल्याणा-

करितां जें आपण करणार त्यांत मी काय ह्मणून भांडण उकरून काढीन? इतका का मूर्ख आपण मला समजतां?

**नारद**—तुला मूर्ख कोण म्हणणार? उलट तुझ्यासारखा सत्य-प्रिय, स्वामिभक्त, सहनशील दुसरा कोणीही नसेल, असेंच मी समजतों. पण न जाणों, एकादी गोष्ट तुझे इच्छेविरुद्ध घडून आल्यास तुझ्या शांततेचा भंग होऊं नये, ह्मणून आपलें सहज सुचवून ठेवितों.

**अश्वत्थामा**—मीही आपल्याला आश्वासन देतों कीं, याग संपेपर्यंत मी आपल्या अर्ध्या वचनांत वागेन. कांहीं एक चकारशब्द काढणार नाहीं. मग झालें कीं नाहीं?

**नारद**—अजून काय झालें आहे. व्हावयाचें तें पुढेंच आहे. आणि तें सर्व सुरळित, शांत रीतीनें व विशेष बोभाटा न होतां पार पडावें, ह्याच हेतूनें तुला सुचवून ठेविलें. व ह्याचप्रमाणें मी श्रीकृष्णपुत्र सांब ह्यासही सुचवून ठेवणार आहें. हा सांबही तुझ्याचप्रमाणें शापदग्ध असून तुझ्याकरितां होणाऱ्या यागांत अवभृथस्नान केलें, ह्मणजे शाप-मुक्त होऊन स्वर्गास जाणार आहे, असें पूर्वींच ठरलेलें आहे.

**अश्वत्थामा**—महाराज, ज्यांनीं आपण ह्मणतां असें ठरविलें असेल, त्यांनीं वाटेल तर दुसरा सोमयाग करावा, व सांबाला शापमुक्त करावें. पण माझ्या यागांत जर सांब, अगर पांडव, अगर श्रीकृष्ण-पक्षाचा कोणी मनुष्य दृष्टीस पडेल, तर त्याच्या बरोबर दोन हात केल्याशिवाय माझ्यानें रहावणार नाहीं. आणि तसें झालें, ह्मणजे आज्ञे-बाहेर वर्तन केल्याचा माझ्यावर दोष येणार. करितां माझी अशी प्रार्थना आहे कीं, मला जाण्याची आज्ञा असावी. ( नारदास वंदन करून उठून जाऊं लागतो. ) पांडवपक्षीय वीर माझ्यासमोर उभा असलेला स्वस्थ चित्तानें माझ्यानें पहावणार नाहीं. त्यापेक्षां मी आपल्या सांप्रतच्या स्थितींतच आनंदानें दिवस कंठीन.

**नारद**—मला हें ठाऊकच होतें. आणि ह्मणूनच मी हें कार्य आपल्या शिरावर घेत नव्हतों. आणि भगवान् व्यासांनीं तरी आपल्या

अंगावर न घेण्याचें तरी हेंच कारण; पण हें ईश्वरी कार्य कोणी तरी मनावर घेतलेंच पाहिजे, असा विचार करून तुझ्याकडे आलों. पण तुझें आपलें पहातों, तों तुझा तो याजुष हेकटपणा, तो हिरण्यकेशी दर्प अजून उसळ्या मारतोच आहे !

**अश्वत्थामा**—आपण वाटेल तें म्हणा. जें सांगावयाचें, तें आपणास सांगून टाकिलें आहे. मला आज्ञा असावी. ( जाऊं लागतो. )

**नारद**—अरे, जातोस कुठे ? आणि जाऊन काय करणार ? बैस, मी तुला दुसरा उपाय सांगतों, तो तरी कर.

**अश्वत्थामा**—हं, मग ठीक आहे. सांगा, मी तयार आहें.

**नारद**—दुसरा उपाय म्हणजे करावयाचा सोमयागच; पण तो मानसिक कर. व त्यांतच याग झाल्यानंतर सांबाला तेवढ्या अवभृथ-स्नानाला येऊं दे. म्हणजे त्या बिचाऱ्याचें सहज कार्य होईल.

**अश्वत्थामा**—नांव काढूं नका. महाराज, मी मानसिक यागांत सुद्धां सांबाला येऊं देणार नाहीं, हें साफ सांगतों.

**नारद**—धन्य आहे बुवा तुझ्या दुराग्रहाची. पण तूं तरी काय करणार ? ब्राह्मण म्हटला, कीं तेथें दुराग्रह असावयाचाच. एरवीं ब्राह्मण आणि देव ह्यांमध्यें भेद कशाचा ? भेदाचें कारण हा दुरभिमान व दुराग्रहच. असो. एकंदरींत तूं दोन्हीही गोष्टींला कबूल नाहींस. आणि मला तर हें कार्य घडवून आणलें पाहिजे. तेव्हां मी म्हणतों, तूं तूर्त येथेंच विश्रांति घे. मी भगवान् विष्णूकडे जाऊन पुढें कसें करावयाचें तें ठरवून येतों.

**अश्वत्थामा**—ठीक आहे. पण मला कसली विश्रांति ! आज पांच हजार वर्षांत मला विश्रांति कशी ती ठाऊक नाहीं.

**नारद**—त्याची तुला काळजी नको. ( अश्वत्थाम्याच्या डोक्या-वर हात ठेवून ) जा, आतां मी परत येईपर्यंत तुला गाढ निद्रा येऊन चांगली विश्रांति मिळेल. त्या अश्वत्थवृक्षाखालीं नीज. मी परत आल्यावर तुला उठवीन.

**अश्वत्थामा**—आज्ञा महाराज. ( उठून अश्वत्थामा अश्वत्थ-वृक्षाखालीं जाऊन पडतो व घोरावयास लागतो. )

**नारद**—अश्वत्थाम्यास चांगली निद्रा लागली आहे. तर आतां आपण क्षीरसागरीं जाऊन श्रीविष्णूची गांठ घेतली पाहिजे. (जातो.)

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

**( स्थळ—आर्यावर्तकार्यागाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर कलि इंग्रजी पोषाख घातलेला नारदास भेटतो. )**

**कलि**—( टोपी काढून ) नारदमुने, मी कलि चरणाप्रत वंदन करितों, महाराज.

**नारद**—कोण कलि ? आणि असा वेष कां रे बाबा ? तुझा तो राजचिन्हालंकृत पोषाख कोठें गेला ? सुवर्णाचा तर लेशही अंगावर नाहीं ! हें काय ? सुवर्णाचा आश्रय तर तूं मुद्दाम परीक्षिति राजापासून मागून घेतलासना ? मग आतां कंटाळलास कां त्याला ?

**कलि**—काय करावें, महाराज ? खुद्द विष्णूनेंच जर अशा वेषाचा स्वीकार केला आहे, तर आम्हांला दुसरे तिसरे चाळे करून कसें चालेल ? यथा राजा तथा प्रजा. खरें म्हणाल, तर मला सुवर्णाची फार भक्ति आहे. पण मला त्याचा उपभोग रूपांतर करूनच घ्यावा लागतो. निव्वळ बावनकशी सोनें जवळ बाळगूं नये, अशी विष्णूची सर्व पार्षदमंडळीस सक्त ताकीद आहे.

**नारद**—विष्णूची ताकीद पार्षदगणांपुरती यथायोग्य आहे. पण त्याला स्वतःला सुवर्णाच्या उपभोगाची मनाई कोण करणार ? त्यांनीं वेदशास्त्रविहित आपलीं रत्नखचित राजचिन्हें टाकून असला वेष कां पतकरावा ?

**कलि**—रत्नखचित तर बाजूलाच राहिलें. पण नुसत्या सुवर्णावरही अलीकडे इतका कटाक्ष झाला आहे कीं, बोटांतील मुद्रिका सुद्धां

निव्वळ सोन्याची ठेविली नाहीं. मग इतर राजभूषणांस कसा थारा मिळणार ?

**नारद**--मला वाटतें कीं, हा सर्व प्रकार भक्तवात्सल्याचा आहे. बरोबर, तेंच कारण खास. आतां माझ्या लक्षांत आलें. भविष्य-रामायणांत आमर्कद्वैपायन श्वेतद्वैपायन लोकांच्या पोषाखाचें वर्णन आहे; त्याच्याशीं हा वेश अगदीं तंतोतंत जुळतो. ह्या लोकांचे पूर्वज शालाकटंकटादि उदर्मी व्यापारी असून ते रामावतारीं लंकेंत रहात असत. बिभीषणास जेव्हां लंका दिली, त्या वेळीं ह्या सर्व अनुयायी व्यापाऱ्यांस त्यांनीं हांकलून लाविलें. पुढें ते लोक कांहीं आमर्कद्वीपांत व कांहीं श्वेतद्वीपांत गेले. ह्यांना श्रीरामाचें प्रत्यक्ष दर्शन घडल्यामुळें रामांनीं त्यांना वर दिला कीं, कलीचीं चार हजार वर्षें झाल्यावर तुमच्या वंशजांची चांगली भरभराट होईल; व मी स्वत: त्यांना साहाय्य होऊन त्यांचें सर्व प्रकारें कौतुक करीन. सांप्रत भगवंताचें वर्तन ह्या वरासच अनुसरून आहे. व तें त्याच्या भक्तवात्सल्याला, सत्याला व सात्त्विकवृत्तीला पूर्णपणें शोभत आहे. पण तूं आज इकडे कोणीकडे ?

**कलि**--मी भगवान् विष्णूकडून आलों, आणि आतां आर्यावर्ताकडे जात आहें. आपली गांठ अनायासेंच पडली. आपल्याला श्रीविष्णूनें लवकर बोलाविलें आहे. आणि आपण व विष्णु आर्यावर्ताकडे कांहीं विशेष कामाकरितां येणार आहांत, ह्मणून अगोदर जाऊन सर्व व्यवस्था यथास्थित ठेवण्याची मला आज्ञा झाली आहे.

**नारद**--विशेष कार्य कोणचें, हें तुला कांहीं समजलें आहे का?

**कलि**--मला विष्णूनें सांगितलें होतें, पण मी तें आतां विसरलों. पण एवढें लक्षांत राहिलें आहे कीं, अश्वत्थाम्याच्या व श्रीकृष्णपुत्र सांबाच्या शापनिवृत्तीसाठीं सोमयाग करण्यासंबंधीचें तें आहे.

**नारद**- ठीक आहे. मीही त्याचकरितां भगवान् विष्णूकडे जात आहें. [ पडदा पडतो.

## प्रवेश ४ था.

**[ स्थळ—आर्यावर्तकार्यागार. भगवान् विष्णु श्वेतद्वीपीय ( इंग्रजी ) पोषाख करून बसले आहेत. पुढें संत्र्यांचा पहारा फिरत आहे. ]**

**विष्णु**—कोई है?

**संत्री**—( पुढें होऊन सलाम करून ) हुकूम खावंद.

**विष्णु**—देखो, हमारी तरफ कोई बम्मन आएगा, तो उसकू हमारा हुकूम बिगर अंदर मत छोडो.

**संत्री**—हुकूम खावंद. ( पहाऱ्यावर येतो. ) अबी आना देओ बम्मन. सबकू हकाल देएंगे.

( नारद प्रवेश करितो. )

**नारद**—स्वारी आंत आहे का? भेटतील का? ( आंत जाऊं लागतो. )

**संत्री**—मत जाव. अंदर जानेका हुकूम नहीं है.

**नारद**—असें का? ठीक आहे. ( खालीं बसून आसन घालून नाकास हात लावून प्राणायाम सुरू करतो. )

**विष्णु**—कोई है?

**संत्री**—( पुढें होऊन ) हुकूम खावंद.

**विष्णु**—ओ बम्मन आया है, उसकू अंदर आना देओ. और तुम ए चिठ्ठी लेकर अब्बी टपालमे फेंक देओ. ( चिठ्ठी देतो. )

( नारद आंत जातात. विष्णु त्यांस हातांत हात घालून खालीं बसवितात. )

**नारद**—देवा, खूप ऐट केली आहेस बुवा. तुझा तो कृष्ण अवतारींचा मस्करी करण्याचा स्वभाव अजून गेला नाहीं अं! वा, काय पण पोषाख, काय बसण्याची जागा, काय ऐट, वाहवा रे वाहवा! मला वाटतें, तुला माझ्याशीं मस्करी केल्यावांचून चैन पडत नाहीं.

**विष्णु**—नारदा, तें राहूं द्या सध्यां. आपलें स्वागत असो. कोठून येणें झालें? मी आपली येथें किती वेळ वाट पहात बसलों आहें!

**नारद**—आणि ह्मणूनच मला आंत येण्याची मनाई वाटतें?

**विष्णु**—अर्थात्. तुह्मांला सांप्रतची आदरसत्काराची पद्धत एऱ्हीं कशी कळणार ? तुह्मी मला अंतर्यामीं पहातां, आणि तेंही जुन्या पद्धतींतच. पण मी सांप्रत जगाच्या कारभारांत कसा वागत असतों, हें तुह्मांला कळलें पाहिजे कीं नाहीं ?

**नारद**—मग आपली स्वारी आतां अशा वेशांतच आर्यावर्ता-कडे येणार वाटतें ?

**विष्णु**—बहुतेक ह्याच थाटांत.

**नारद**—फारच मौज होणार आहे तर मग. आणि लक्ष्मी ?

**विष्णु**—तीही अशाच ऐटींत येणार.

**नारद**—ठीक आहे. कसे का यानांत. आपलें काय ? कार्यभाग उरकला ह्मणजे झालें.

**विष्णु**—मी आलोंच का पाहिजे ? नाहीं आलों तर चालणार नाहीं का ?

**नारद**—देवा, तुझ्याशिवाय आह्मी काय करणार ? कोणतेही कामांत तुझी स्वतंत्र विभूति असलीच पाहिजे. तशीच जगन्माता लक्ष्मीही अवश्य पाहिजेच. एकंदरींत आपण उभयतां आलेंच पाहिजे. ब्रह्मदेवानें सर्व मांडणी तुझ्या आज्ञेप्रमाणें फार बारकाईनें मांडून ठेविली आहे. तुमच्या उभयतांकरितां मथुरावासी तुझाच परमभक्त नंदकिशोर व त्याची स्त्री साध्वी कमलादेवी यांची योजना झाली आहे. करितां, तूं नंदकिशोराचे हृदयांत आणि लक्ष्मी कमलादेवींच्या हृदयांत वास्तव्य करून रहा. ह्मणजे योजिलेल्या कार्यास तुह्मां दोघांनाही साहाय्य करितां येईल.

**विष्णु**—ब्रह्मदेवानें मांडणी ठीक केली आहे, हें मी कबूल करितों. परंतु ह्या आपल्या योजनेंत दोन तीन चुका—आणि त्याही बऱ्याच ढोबळ—झाल्या आहेत, असें मला वाटतें. कशा त्या ऐका. अश्वत्थाम्याच्या शापनिरसनार्थ सोमयागच कशाला पाहिजे होता हो ? सर्व यज्ञांत जपयज्ञ श्रेष्ठ आहे, असें मी स्वतः अर्जुनाला सांगितलेलें

भगवान् व्यासांनाही माहीत होतें. आणि तुम्हांलाही माहिती आहे. मग सोमयागच कां ठरविलात? बरें, तुम्हांला सोमयागच पाहिजे होता, तर इतके दिवस कां स्वस्थ बसलांत? सोमयाग ह्मणजे काय लहान का कर्म आहे? त्याला महाब्रह्मनिष्ठ ब्राह्मण पाहिजेत. कलीचीं पांच हजार वर्षें होऊन गेलीं. आतां एक तरी ब्राह्मण तुम्हांला तसा मिळेल का? नाहीं म्हणायला एक कुशंभट गर्गे मात्र मला दिसतो आहे. पण तो एकटा काय करणार? निदान आणखी सोळा तरी असलेच श्रौतपारंगत ब्राह्मण पाहिजेत. शिवाय कलीची कुरकुर आहेच. तो आतां नुकताच माझ्याकडे आला होता. तो म्हणाला कीं, देवा, नारदमुनि जर असलीं सोमयागासारखीं कृत्यें माझ्या अमदानींत करण्याचा प्रयत्न करतील, तर मी त्याला प्रतिबंध केल्याशिवाय राहणार नाहीं. मी कांहीं तरी थातूर मातूर करून त्याची समजूत घालून त्यास परत लाविलें. आणि तसाच आपली वाट पहात बसलों.

**नारद**—देवा, तुझ्या शंका बरोबर आहेत. पण आम्हीं–मी आणि भगवान् व्यास यांनीं–जें करण्याचें योजिलें आहे, तेंही सयुक्तिक व सकारणच आहे. तें कसें तें ऐक. मी तुला विस्तार करून सांगतों. अश्वत्थाम्याला तूं कृष्णावतारीं जो शाप दिलास, त्याचा काल तीन हजार वर्षें तूंच नियमित केला होतास ना? मग त्या कालापूर्वीं आम्हांस त्याच्या शापनिवृत्तीबद्दल कांहीं तरी करितां आलें असतें का? बरें तीन हजार वर्षें गेल्यावर आम्ही कांहीं करावें, तर ज्याच्याकरितां कांहीं कर्म करावयाचें, त्याला त्या कर्माचें कांहीं तरी आगत्य पाहिजे ना? अश्वत्थाम्याची गोष्ट तशी आहे का? भगवान् व्यासांच्या सांगण्यावरून मी एक दोन वेळां दुरून चाचणी घेतली, तों मला असें दिसून आलें कीं, स्वारी आपल्याच रंगांत आहे. भिक्षा विपुल मिळत असे. जिकडे तिकडे समृद्धि असे. ह्याला कोणाचा धाक नाहीं. मग काय विचारतां? पोर अगदीं बिघडून गेला. तेव्हां मी कलीला सांगून अश्वत्थाम्याच्या पोटास चांगलाच चिमटा बसेल, अशी तजवीज केली.

मग जेव्हां वर्षेच्या वर्षे फांके बसूं लागले, आणि त्यामुळें डोक्याच्या दुखण्यानें जेव्हां उचल खाल्ली, तेव्हां स्वारी कुठे ताळ्यावर येत चालली आहे. अजून तरी तो ब्रह्ममद, तो वेददर्प नाहींसा होण्याचें चिन्ह दिसत नाहींच. पण हे सर्व ढंग झाले तर सोमयागानेंच नाहींसे होतील, असें व्यासांचें ह्मणणें आहे. आणि तें मलाही सयुक्तिक दिसतें.

**विष्णु**—तर मग मला वाटतें, तुह्मी उगीच घाई करतां. अश्वत्थाम्याची रग चांगली जिरूं द्या. आणि मग जें तुम्हांला करणें असेल तें करा.

**नारद**—नाहीं! देवा, स्वर्गांतील मंडळी भगवान् व्यासांना नांवें ठेवूं लागली आहेत. ते म्हणतात, व्यास निव्वळ गप्पीदास आहेत. वाटतील तशा गप्पा भारतांत त्या बिचाऱ्या गणपतीकडून लिहून ठेविल्या आहेत. कृष्णशापाची मुदत तीन हजार वर्षे. ती कलीचीं पांच हजार वर्षे झालीं, तरी अजून संपलीच नाहीं वाटतें? अशा एक का दोन ह्मणून सांगूं. आणि मलाही व्यासाबरोबर पुष्पांजळि वहातातच. मला ह्मणतात, हा उंचशेंड्या तंबुरा नाचवीत उगाच इकडे तिकडे फिरत असतो. जें करावयाचें, तें मुळींच करीत नाहीं. अश्वत्थामा आज पांच हजार वर्षे नर्मदेच्या कांठीं दोम दोम करीत हिंडतो आहे, त्याची ह्याला दादही नाहीं. मग ह्याला देवांनीं मोकळें तरी काय ह्मणून सोडावें? आमच्यासारखा स्वर्गांत का डांबून टाकूं नये? असे माझ्याही नांवानें खडे फोडतात. मी इतक्यालाही जुमानलें नसतें; पण देवा, हें आपल्या द्रोणाचार्यांचें पोरकें पोर ना?; भारतीय युद्धांत त्यानें माझ्यावर थोडे का उपकार केले आहेत? तुह्मी तर त्यांनीं "अडला नारायण गाढवाचे पाय धरी" अशी त्रेधा उडविली होती ना? त्या वेळेस जर त्यांनीं तुह्मी कानगोष्ट ऐकली नसती, तर त्याला तुझे ते पांडव एका टापेसरसे उडविण्यास जड होतें का? मला तर वाटतें कीं, त्याच्या मनांतून धर्माचाच प्रथम कपाळमोक्ष करावयाचा होता. पण नाहीं! तूं सांगितल्यावरून गर्दभाचा देह टाकून बिचारा निमुटपणें स्वर्गास चालता झाला. त्याच्या एकुलत्या एका पोराला आपण नाहीं

ताळ्यावर आणिलें, तर दुसरा कोण बरें आणील ? एवढा करुणा-सागर, पण तूं तरी शाप देते वेळीं विचार केला होतास का ? तीन हजार वर्षे ठोठावलींस! पण तीन हजारांच्या पुढें काय ?

**विष्णु**—पुढें काय ह्मणजे ? पुढें पूर्वस्थिति प्राप्त व्हावयाची. बरें, मी म्हणतों, मी असें स्पष्ट सांगावयास चुकलों; पण तुह्मी आणि व्यास तेथें समक्ष होतां ना ? तुह्मी त्या वेळीं मला कां सुचविलें नाहींत?

**नारद**—आम्ही काय सुचवा ? तुझें तें त्या वेळचें उग्र स्वरूप पाहून माझी तर बोबडीच वळली. आणि हातांतली तंबुरी खालीं आदळून फुटते कीं काय, अशी माझी दशा झाली. व्यास जरा होते धीर धरून, पण त्यांनाही वाटलें कीं, ही वेळ होस हो म्हणून काढली पाहिजे. कमीजास्त बोलावें, तर आम्ही ब्राह्मण आणि अश्वत्थामाही ब्राह्मणच. आम्ही त्याचा पक्ष उचलून धरिला, असें तुला वाटेल, म्हणून गप्प बसलों.

**विष्णु**—नारदा, " देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनं च दैवतम् । ते मंत्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतम् ॥" हें तुम्हांला माहीत असूनही तुम्ही गप्प बसतां, आणि अखेरीस दोष लादतां माझ्यावर. तेव्हां काय म्हणावयाचें ?

**नारद**—देवा, तें सध्यां राहूं द्या. आपल्याला प्रस्तुत विषयाचें विवेचन करावयाचें आहे.

**विष्णु**—करा विवेचन. मी नाहीं म्हणत नाहीं. पण तुम्ही मला सुचविलें नाहीं, ही चूक तुमची. मी नाहीं माझी म्हणून कबूल करणार.

**नारद**—बरें, देवा, व्यासांची चूक–नव्हे आमच्या दोघांची चूक–नाहीं तर माझी एकट्याचीच का म्हणेनास ? मला कबूल आहे. कोणाची जरी असली तरी तिची दुरुस्ती झाली पाहिजे ना ? म्हणून मी पुढें एके दिवशीं व्यासांना म्हटलें कीं, अश्वत्थाम्याच्या शापनिरसनार्थ कांहीं तरी उपाय योजून त्याचा उल्लेख महाभारतांत करून ठेवा, ह्मणजे पुढें अडचण पडणार नाहीं. पण ते ह्मणाले, मी एक लाख

भारत रचण्याचा संकल्प केला होता, आणि तो भारत व हरिवंश मिळून पुरा होत आला आहे. आतां त्यांत कमीजास्ती कांहीं एक करितां येणार नाहीं. शिवाय ह्या शापनिरसनार्थ जें कांहीं करावयाचें, तें तीन हजार वर्षांनंतर असल्यामुळें भविष्य आहे. आणि कोणचेंही भविष्य नामनिर्देश करून साग्र लिहून ठेवणें जगत्पालकाचे नियमाविरुद्ध आहे. तेव्हां हें शापाचें प्रकरण तूर्त तसेंच ठेवा. पुढें वेळ येईल, तेव्हां पाहूं. आणि मग जें करावयाचें तें निर्विघ्नपणें शेवटास गेल्यावर लिहून ठेवूं; अगर ज्याला अवश्य वाटेल तो लिहील. मला हें व्यासांचें बोलणें पटलें, ह्मणून मीही स्वस्थ बसलों. पुढें जेव्हां कलीचीं पांच हजार वर्षें भरलीं, तरी अश्वत्थाम्याची कष्टदशा संपेना, तेव्हां मी व्यासांकडे गेलों, व सोमयाग करून त्याची पूर्वस्थिति त्याला प्राप्त करून देण्याचें ठरविलें.

**विष्णु**—सोमयागच कां, हाच माझा प्रथमपासून प्रश्न आहे. जपयज्ञ कमी का आहे ?

**नारद**—त्याचेंच कारण मी आतां तुला सांगतों. इतका काल आह्मी विनाकारण लोटूं दिला, असें तुला आतां वाटत नाहींना ?

**विष्णु**—नाहीं ! कालाबद्दल आतां माझें कांहीं म्हणणें नाहीं. आतां सोमयागच कां, तेवढें सांगा म्हणजे झालें.

**नारद**—तेंच सांगतों, ऐक. अश्वत्थामा हा ब्राह्मण ना ? त्याला ब्राह्मणांतच ठेवण्याची तुझी इच्छा आहे ना ? का त्यानें शूद्राप्रमाणें आचरण केलें तरी चालेल ?

**विष्णु**—वा ! नारदा, तसें कसें चालेल बरें ? त्यानें सध्यां जे आर्यावर्तांत ब्राह्मण आहेत, त्यांच्याप्रमाणें आचरण ठेवलेलें सुद्धां मला खपणार नाहीं. मग शूद्राचरणाचें तर नांवच काढूं नका. मला पंढरीचा अनुभव आहे ना ? कसले ते ब्राह्मण ! आचार नाहीं, विचार नाहीं ! मग ब्राह्मणवर्णाश्रमधर्म तर लांबच राहिला. असल्या ब्राह्मणां-

प्रमाणें अश्वत्थामा वागूं लागेल, तर आपल्या कार्यास तो कसा उपयोगीं पडेल बरें ?

**नारद**—देवा, सांप्रतकालच्या ब्राह्मणांचें नांवच काढूं नकोस. ते ब्राह्मण कसले ! यज्ञोपवीत घातलें कीं झाला ब्राह्मण, आणि नांगर सोडला कीं झाला शूद्राचा क्षत्रिय, नाहीं तर वैश्य ! अश्वत्थामा अशांतला का ब्राह्मण आहे ? गेल्या पांच हजार वर्षांत अग्न्याधेय झालें नसल्यामुळें त्याला जें दौर्ब्राह्मण्य प्राप्त झालें आहे, तेवढ्याचें निरसन झालें, ह्मणजे झालें. हा दौर्ब्राह्मण्याचा दोष घालविण्याकरितांच आह्मी हा याग करविण्याचें ठरविलें आहे. जपयज्ञानें अश्वत्थामा मोक्षास जाईल, हें खरें. पण त्याला मोक्षास का पाठवावयाचें आहे ? तसें असेल, तर त्यानें शूद्राप्रमाणें आचरण केलें, तरी चालण्यासारखें आहे.

**विष्णु**—नाहीं, अगदीं चालणार नाहीं. तुम्ही सगळेच मोक्षास जाऊं लागलां, तर ह्या सृष्टिप्रपंचाचा कारभार कोणी पहावा ? आणि तो चालावा तरी कसा ?

**नारद**—आणि ह्मणूनच आह्मी सोमयाग करून अश्वत्थाम्याला पूर्ण ब्राह्मण्यांत आणून ह्या कर्मभूमींतच ठेवण्याचा विचार केला आहे. आतां तरी तुझ्या ह्या सोमयागासंबंधीं आक्षेपाचें निरसन झालें ना ?

**विष्णु**—सोमयागाची योजना सयुक्तिक आहे. पण ब्राह्मणांचें काय करणार ? तुम्हांला श्रौतनिष्णात ब्राह्मण कोठें मिळणार ?

**नारद**—त्याची तुला काळजी नको. देवा, व्यासांनीं स्वतः आपल्या सर्व शिष्यांसह येण्याचें कबूल केलें आहे. कुशंभट गर्गे चतुर्वेदी असून श्रौतस्मार्त कर्मांत फार पारंगत असून आचरणानेंही पूर्ण ब्राह्मण आहे, हें तुला माहीत आहेच. मग आणखी कोण पाहिजे ? एखाददुसरा ब्राह्मण कमी पडलाच, तर घेऊं तिथलाच. नाहीं तर मी आहें तर खरा. मी बसेन वेळच आली तर.

**विष्णु**—तुमची ब्राह्मणाची जात फार मतलबी खरी, नारदा. आतां अश्वत्थाम्याच्या यागाला जाण्याला तुह्मांला सवड आहे आं ?

ह्याच्या पूर्वीं थोडे का याग झाले ? आपण कधीं आलां होतां का तेथें ?

**नारद**—त्या वेळेस दुसरी कांहीं मंडळी जमत असत. आमचें विशेष काम नसे, ह्मणून आह्मी येत नव्हतों. अश्वत्थाम्याचा याग आमचेखेरीज कोण करणार ? हें सर्व राहूं द्या बाजूला आतां. तुझे आक्षेपाची आतां निवृत्ति झाली ना ? तरी तूं सांबाचा अश्वत्थाम्याच्या यागाशीं कां संबंध जोडून दिला, हें विचारलें नाहींस ?

**विष्णु**—त्याचें कारण उघड दिसतच आहे. सांब स्त्री झाल्यामुळें तिला हा याग करण्याचा स्वतंत्र अधिकार नाहीं, हेंच ना ?

**नारद**—होय, हेंच. शिवाय सांबाचें कृत्य कांहीं अघोर नव्हतें. तो विचारा गेला थट्टा करावयाला, आणि त्याचें झालें विपरीत. त्यानें चार नांवाचे नवरे करून, पांचवा अश्वत्थाम्याला सुद्धां नांवाचा नवरा करून, त्याच्या सोमयागाचें अवभृथस्नान केलें, ह्मणजे तो मुक्त होईल व स्वर्गास जाईल.

**विष्णु**—हें पंच पतींचेंच काम जरा अवघड दिसतें. तुम्ही असें हें शेवटास नेणार कोण जाणें !

**नारद**—ह्यांत काय कठिण आहे बुवा ? सांबाला ज्या सारण-प्रभृति वीरांनीं स्त्रीवेश देऊन ही बभ्रूची बायको आहे, असें ऋषीला सांगितलें, त्यांपैकीं प्रमुख चार वीर जन्मास कधींच आलेले आहेत. व त्यांच्या त्या स्त्री झालेल्या सांबाच्या लग्नगांठीं ब्रह्मदेवानें देऊन ठेविल्या आहेत. व ही सर्व व्यवस्था मला माहीत आहे.

**विष्णु**—मग, नारदा, मला कशाला उगीच धक्के देतां. तुम्ही व व्यास मिळून हें काम होण्यासारखें नाहीं का ?

**नारद**—नाहीं, देवा. तूं आमच्या पाठीवर असलास, ह्मणजे शंकर प्रत्यक्ष आले, तरी त्यांना आम्ही भीक घालणार नाहीं.

**विष्णु**—कशाला घालाल ? मग शंकराचें आणि माझें लाथाळ लावून आपण दूर जाऊन मजा पहात बसा, ह्मणजे झालें.

**नारद**—काय, देवा, तूं भलतीच कल्पना काढीत बसतोस,

कोण जाणे! शंकर अगोदर येताहेत तरी कशाला? आणि आलेच व लाथाळ्यावर बेतलीच, तर तूं मोहिनीरूप घे ह्मणजे झालें. ह्मणजे शंकरांनीं नांगी टाकलीच ह्मणून समज.

**विष्णु**—जाऊं दे! नारदा, ही थट्टा करण्याची वेळ आहे का? मी आतां घरीं जातों. लक्ष्मी वाट पहात असेल. तुम्ही नाहीं का येत माझ्याबरोबर?

**नारद**—अवश्य. मीही लक्ष्मीचें दर्शन घेऊन तसाच परस्पर जाईन. तूं आपल्या एक दोन दूतांस मात्र बजावून ठेव कीं, मला त्यांची अवश्यकता वाटल्यास मी स्मरण करीन तेव्हां मला त्यांनीं भेटावें. चला आतां लक्ष्मीकडे जाऊं. ( जातात. )

[ पडदा पडतो. ]

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

[ स्थळ—अनघपुरींतील कुशंभटाचें घर. कुशंभट ओटीवर पोथी वाचीत बसले आहेत व त्यांचें कुटुंब (गोपिका) काकूबाई दारांत उभ्या आहेत. ]

**काकूबाई**—म्हटलें, आज घरांत खरोखरीच कांहीं नाहीं हो ! आणि दहा तर वाजून गेले. आतां यापुढें दाणे येऊन शिजवून पोटांत जाण्यास एक वाजणार ! आतां तरी उठायचं आणि कांहीं तरी तजवीज करायची. एकादा अतिथि आल्यास त्याला काय सांगायचें ?

( कुशंभट पोथीचें पान खालीं ठेवून व काकूकडे वळून )

**कुशंभट**—अग, तुला नुसती काळजी करण्याची ही काय संवय लागली आहे, कोण जाणे ! जो आपणाकडे अतिथि पाठवील, तो त्याच्या आतिथ्याची तजवीज नाहीं का करणार ? मग आपल्याला त्याची काळजी कशाला हवी ? खुशाल ' हरि हरि ' ह्मणत बैस कशी ! त्याला जगाची काळजी आहे. मग आपण आणि आपला अतिथि यांनाच तेवढा तो काय ह्मणून वगळील ?

**काकूबाई**—जशी आपली आज्ञा ! मग मला काल पसाभर गहूं मिळाले आहेत, त्याची अटवल करूं कां ? उगीच आपला पाणी पिण्यास तरी आधार होईल.

**कुशंभट**—हूं कर; आज अटवलीवरच काढूं. उद्यांचें उद्यां पहातां येईल. व पहाणारा पाहील. ( काकू आंत जातात. )

( नारद अतिथिरूपानें प्रवेश करितो. )

**ब्राह्मण**—विश्वेश्वराय नमः. ( कुशंभटास ) महाराज, कांहीं भिक्षा मिळेल का येथें ?

**कुशंभट**—( उठून व नमस्कार करून ) महाराज, क्षणभर थांबा. घरांत अटवल तयार होत आहे. झाली ह्मणजे आपणास समर्पण करितों.

**ब्राह्मण**—अटवल ! कसली अटवल ? गव्हांची कीं काय ?

**कुशंभट**—होय महाराज.

**ब्राह्मण**—नको नको ! मला शिजलेलें खावयाचें नाहीं. एक पसाभर गहूंच मला घालाल, तर तुमचें कल्याण होईल. ( कुशंभट जातात व गहूं घेऊन येतात. )

**कुशंभट**—महाराज, थोडा का विलंब झाला असता, ह्मणजे गहू चुलीवर चढलेच असते. आणि मग मात्र पंचाईत पडली असती.

**ब्राह्मण**—पंचाईत कसली ? माझा नेम शिजलेलें न खाण्याचा आहे. नुसतें चुलीवर चढल्यानें व्यत्यय आला नसता. आपलें भोजन झालें का ?

**कुशंभट**—नाहीं महाराज.

**ब्राह्मण**—मग आपण दोघे बरोबरच बसूं. आपण भोजन करा, व मी आपल्याबरोबर ही भिक्षा सेवन करीन. ह्मणजे आपल्या पंक्तीचा मला अनायासें लाभ घडेल.

**कुशंभट**—महाराज, मला अजून थोडा अवकाश आहे. आपल्याला उगीच तिष्टत बसावें लागेल.

**ब्राह्मण**—आणि मला कसली घाई आहे ? कोठें तरी व केव्हां तरी चार दाणे चावायचे. ते येथेंच, आणि आपल्या येथेंच सेवन करीन म्हणतों. मला दुसरें तिसरें कांहीं एक नको.

**कुशंभट**—( मनांत खजील होऊन व हात जोडून ) महाराज, आपल्याला हे दाणे घातले आहेत, याशिवाय घरांत एक धान्याचा दाणाही शिल्लक नाहीं. ह्मणून प्रार्थना करतों कीं, आपण भिक्षा सेवन करावी, यांतच माझी आणि माझ्या कुटुंबाची तृप्ति होईल.

**ब्राह्मण**—असें असेल, तर मला घातलेले दाणे भिक्षा होत नाहीं. आणि मला तर भिक्षेवांचून कांहीं एक ग्रहण करावयाचें नाहीं.

तेव्हां आपण हे सर्व गहूं परत घ्या, आणि मला एक चिमूटभर द्या; ह्मणजे ईश्वर तुमचें उत्तरोत्तर कल्याण करील. माझा आशीर्वाद असत्य होणार नाहीं. ( कुशंभट तसें करितात व पायावर मस्तक ठेवितात, आणि नारद निघून जातात. )

( धोंडभट शिध्याचें ओझें पाठीवर टाकून प्रवेश करितात. )

**धोंडभट**--गेला का तो भिकारडा एकदाचा. केव्हांचा मी हें ओझें डोक्यावर घेऊन बाहेर उभा आहें ! तो एकदा बाहेर पडतो केव्हां, असें मला झालें होतें !

( काकू प्रवेश करितात. )

**काकूबाई**--ह्मणजे ! अतिथि महाराज गेले का इतक्यांत ? मी त्यांना नमस्कार करण्याला येणार, तों ते गेले सुद्धां !

**धोंड०**--अहो काकू, तुम्ही तरी त्या ( कुशंभटास उद्देशून ) बाबासारख्या चळूं नका. बरें झालें तो भिकारडा गेला तें. नाहीं तर मी हा आणलेला सर्व शिधा ह्या बाबांनीं त्याचे पदरांत टाकिला असता.

**काकूबाई**--बरें, टाकला असता म्हणून आमचें काय कमी झालें असतें ? आमचें प्रालब्ध आमचे बरोबरच असणार ! त्यांतून कोणास कांहीं देतां यावयाचें नाहीं, घेतां यावयाचें नाहीं ! त्यांत कांहीं मिळवितां यावयाचें नाहीं किंवा त्यांतून कांहीं कमी करतां यावयाचें नाहीं !

**धोंड०**--वाहवा ! एकूण दोघेंही सारखींच खमंग आहांत म्हणावयाचें. अहो, मी पाठीचा कणा मोडेपर्यंत आणि टाळक्याला कड येईपर्यंत जो हा एवढा भार वाहून आणिला, त्याचें तुम्हांस कांहींच चीज नाहीं तर ! फार थोर आहांत ! दुसरें काय म्हणावयाचें !

**कुशंभट**--अहो धोंडूनाना, असे रागावूं नका. आह्मी कृतघ्न आहोंत, अशी तुमची कल्पना होऊं देऊं नका. आणि तिनें जो आतां सिद्धांत सांगितला, तो खोटा समजूं नका. मी आपणास प्रत्यक्ष सांगतों, ह्मणजे आपला राग शांत होईल.

**धोंड०**—आपण कसला राग शांत करतां! स्पष्टोक्तीनें उत्पन्न झालेला राग वाचाळपणानें जास्त मात्र होईल!

**कुशं०**—जरा शांत तर व्हा. मला आपण एवढें तरी सांगा कीं, जो हा आपण आमचेकरितां शिधा आणिलात, तो आमचेकरितां अगोदर वसुंधरेनें उत्पन्न केला होता, म्हणून आपल्याला मिळाला ना?

**धोंड०**—जाऊं द्या हो! असल्या पोकळ वेदांतांत मला शिरावयाचें कारण नाहीं. आपल्याला याची जरूर असल्यास ठेवतों. नाहीं तर दुसरे भिकारी काय थोडे आहेत?

**कुशं०**—जशी आपली इच्छा असेल, तसें करावें. आम्हांला काय! जसें तो 'हरि' ठेवील, त्याप्रमाणें कालक्षेप करावयाचा. आणि आपल्याला तरी तोच हरि जशी बुद्धि देईल, तसेंच आपणही करणार!

**धोंड०**—कां काकू? आपलेंही असेंच म्हणणें आहे ना? तें ठरलेलें आहे म्हणा!

**काकूबाई**—हो तसेंच. तिकडल्या बाहेर का मला जातां येणार आहे?

**धोंड०**—शर्थ आहे बुवा या तुमच्या वेदांती समजुतीची—मी म्हणतों—तुमच्या रबरी चामटपणाची! दुसरें काय म्हणावें! इतके फांके वारंवार बसत आहेत, तरी तुह्मी आपले घम्म अं! मला वाटतें, हा वेदांताचा खास परिणाम नसावा. वेदाच्या अंताचा—ह्मणजे ज्ञानमृत्यूचा—ह्मणजे मूर्खत्वाचा—हा परिणाम असावा!

**कुशं०**—तसें म्हणा बापडें! आमचें काय जातें? जिभेला हाड नाहीं. ती लववावी तशी लवणारच.

**धोंड०**—मला सर्वांत जें आश्चर्य वाटतें, तें आपल्या उभयतांच्या माझ्याबद्दलच्या औदासीन्याचें! अहो काकू, मी आपल्या मुलासारखा! मला लहानाचें मोठें केलेंत, माझे दोन्हीही भाऊ आपल्या आशीर्वादानें मार्गास लागले, मीही आपल्याच कृपेनें ह्या स्थितीस येऊन पोहोंचलों. ह्या सर्व गोष्टी मी मनांत वागवून माझ्या शक्त्यनुसार

आपल्याला साहाय्य करीत असतों. पण त्याचें आपल्याला कांहींच कौतुक वाटत नाहीं, ह्याला काय ह्मणावें बरें? हा वेदांत का हें व्यवहारशून्यत्व?

**काकूबाई**---अरे, तूं इतका संतापतोस कां?

**धोंड०**—संतापूं नको, तर काय करूं? अहो, तुमच्या त्या वेदांताप्रमाणें मलाच तुमचा तो 'हरि' समजून शाबासकी देऊन तुह्मी माझें कौतुक केलें असतेंत, तर वेदांत साधून व्यवहारही साधला नसता का? आणि मला तरी मग इतकें वाईट कां वाटतें?

**काकूबाई**---अरे धोंडभट, तूं असें पहा-

**कुशं०**—दम धर ग! अरे धोंडूनाना, तूं हरीचेंच रूप आहेस. सर्व ठिकाणचें जल जसें गंगाच आहे, तसे आपण सर्व हरिरूपच आहोंत, हें तुला मान्य आहे ना?

**धोंड०**—हो मान्य, अगदीं मान्य!

**कुशं०**---मग त्या अतिथि ब्राह्मणाची कां निर्भर्त्सना केलीस? तूं हरिरूप, तोही हरिरूपच! तर बुवा, ह्याचा विचार असा आहे कीं, जसें जल सर्वत्र गंगारूपच आहे, परंतु गंगेचे सर्व गुण त्याचे ठिकाणीं वास्तव्य करीत असल्यावांचून, त्यास जसें गंगा ह्मणतां येत नाहीं; त्याप्रमाणें आपण सर्व हरिरूपच खरे, परंतु त्या हरीचे गुण असल्याशिवाय हरि ह्मणणें शोभत नाहीं. तो मगाचा ब्राह्मण रूपानें व गुणानें 'हरि' होता, म्हणून त्याला मात्र हरि ह्मणणें शोभतें. बाकी आपण सर्व नांवानें मात्र 'हरि' आणि तूंही त्यांतलाच एक!

**धोंड०**— जाऊं द्या हो! बाबा, मला त्या तुमच्या हरीशीं अगर त्याच्या गुणाशीं, ह्मणजे हरिपणाशीं, अगर, सभ्य लोकांच्या भाषेंत ह्मणावयाचें ह्मणजे, त्याच्या 'हार्याशीं' काय करावयाचें आहे? (जाऊं लागतो.)

**काकूबाई**---अरे, जरा दम धर. जाशील आतां. पण मला, हा शिधा आणलास कोठून, एवढें तरी सांगशील?

**धोंड०**—( मागें परतून ) हा प्रश्न मला प्रथमच केला असतात, तर कांहीं बिघडलें असतें का ? आतां तर नाहींच सांगत. अगोदर मला भूक लागली आहे; त्यांतून मला श्रमही झाले आहेत; आणि त्यांत आपल्या वेदांताच्या बडग्यानें डोकेंही बरेंच सडकलें गेलें आहे. तर मला जाऊंच द्या कसा आतां ! ( जाऊं लागतो. )

**काकूबाई**—धोंडू ! अरे धोंडभट ! इकडच्या पायांची शपथ आहे तुला, जाशील तर. मला आधीं सांग, मग जा बापडा. शिधा कोणी दिला ? तो पवित्र आहे ना ? एवढें कळूं दे; मग तूं जा.

**धोंड०**—( मागें फिरून ) काकू, शिधा अगदीं पवित्र आहे बरें ! त्याबद्दल कांहीं एक शंका आणूं नका. आज 'युगसंधि' नांवाची मोठी पर्वणी होती, म्हणून मी नर्मदेवर स्नानास सहज गेलों होतों. तेथें कोणी वृंदावनदास नांवाच्या भाट्यानें इतका दानधर्म केला कीं, ब्राह्मण दान घेतां घेतां थकून गेले, असें म्हटलें तरी चालेल. मलाही पुष्कळ दक्षिणा व शिधा मिळाला; त्यापैकींच हा शिधा आहे.

**काकूबाई**— एवढी का आज पर्वणी होती ! ( कुशंभटाकडे वळून ) इकडे लक्षांत आली नाहीं वाटतें ?

**कुशं०**—हो, लक्षांत कां नाहीं ? धर्मराजाचा अश्वमेध आटोपल्यानंतरची ती मुंगसाची आश्चर्यकारक गोष्ट तूं विसरलीस वाटतें ? आठवत असेल, तर मघाशीं जो आपल्या येथें अतिथि येऊन चिमूट-भर दाण्यांनीं तृप्त झाला, त्यानें आपली गरिबाची पर्वणी येथेंच यथा-सांग पूर्ण करून घेतली, असें तुला नाहीं का वाटत ? तो अतिथि हरीच होता. त्याचे चरणावर मस्तक ठेवूनच मी पुनीत झालों. आणि त्यानें चिमूटभर दाणे घेऊन आपल्याला अश्वमेधाचें पुण्य प्राप्त करून दिलें. यापेक्षां आपणाकडून अगर कोणाकडूनही पर्वणीनिमित्त जास्त काय होऊं शकणार ?

**काकूबाई**—पण आपण ह्या पर्वणीबद्दल काल कोठें बोलला नाहीं ? शिवाय, मला त्या अतिथीचें दर्शन झालें नाहीं. म्हणून मला विस्मरण झाल्यासारखें वाटलें.

**कुशं०**--काल बोललों नाहीं, याचें कारण मला जरा संशय येत होता. हा 'युगसंधि' योग प्रत्येक युगाचीं पांच हजार वर्षें भरण्याच्या सुमारास ठरीव संवत्सर, मास, तिथि, वार, नक्षत्र वगैरे एकत्र आलीं असतां येत असतो. आजचा योग पूर्ण नाहीं, असें मला वाटत होतें. परंतु आजचे अतिथीचे आगमनानें तो माझा संशय आतां बहुतेक दूर झाला आहे. हा योग पूर्ण रीतीनें आला, ह्मणजे त्या दिवसापासून पुढील युगाचा प्रादुर्भाव–ह्मणजे थोडी छटा भासूं लागते, असा नियम आहे. सध्यां कलीचीं पांच हजार वर्षें होत आलीं आहेत. तेव्हां आतां आजपासून कृतयुगाची थोडी छटा दिसूं लागली पाहिजे. जर वेदविहित कर्में यापुढें यथासांग होऊं लागलीं, व सत्याची आवड लोकांत जास्त वाढूं लागली, तर आजची पर्वणी पूर्ण होती, असेंच म्हणावें लागेल. पहावें आतां काय होतें तें.

**धोंड०**—असाच शास्त्रार्थ कुटित जा बरें! (काकूकडे वळून) काकू, तुम्हांला काय सांगावें? हा असा मोठा गमतीचा काल आहे कीं, पैसा मिळण्याची फक्त इच्छा झाली, कीं बस्स आहे! असा पैसा मिळूं लागतो कीं, ज्याचें नांव तें! आज मी पहात होतों ना, कीं ज्याला 'हरिः ॐ' सुद्धां म्हणतां येत नव्हतें, त्यांनीं कीं हो कंठाळभर रुपये जमविले! आज फक्त जानव्याला किंमत होती! ओहोहो! धन्य ते दानशूर भाटे व उदमी, कीं ज्यांनीं आज कर्णाच्याहूनही अधिक दातृत्व दाखविलें! पण त्याचें तुम्हांला काय! सारांश, दैवापुढें जाववत नाहीं, हेंच खरें. जातों मी आतां. मला आज फार उशीर झाला. बायको वाट पहात बसली असेल. (जातो.)

**काकूबाई**--(कुशंभटास) मग हे पदार्थ घेऊन स्वयंपाक करूं का?

**कुशं०**--हो, हो, अवश्य. श्रीहरीनेंच हे पदार्थ पाठविले आहेत. एका चिमटीवर ज्यानें आपली दहा दिवसांची बेगमी केली, तो आप-

त्याला कधींही संकटांत ठेवणार नाहीं. तुला नाहीं का असें वाटत ? थोंडू निमित्तमात्र आहे.

**काकूबाई**—माझी समजूत आपल्याप्रमाणेंच आहे. आणि मला कशाची काडीचीही चिंता वाटत नाहीं. आणि हें तरी आपल्याच कृपेचें फल, असें मी समजतें. [ पडदा पडतो.

---

## प्रवेश २ रा.

**( उज्जनी येथील हरसिद्धीचे देवालयांतील सभामंडप. नारद योग्याच्या वेशानें बसले आहेत. उभी शेंडी धोतराच्या टोपानें झांकून टाकली आहे. गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा, पुढें तांब्यापंचपात्री, व जवळ दर्भाच्या जुड्या पडल्या आहेत. )**

**नारद**—( स्वगत ) कुशंभटाची भेट झालीच. त्या शिंदीच्या बनांत श्रीकृष्णपुत्र सांब स्त्री होऊन अवतरलेला दृष्टीस पडलाच. आतां फक्त अनघपुराकडे फिरून जाऊन जहागिरदाराची गांठ घेतली, ह्मणजे बहुतेक कार्यभाग उरकल्यासारखें झालें. पहावें आतां कसें काय घडतें तें.

( बभ्री प्रवेश करून नारदास वंदन करिते व हात जोडून त्याच्या पुढें उभी रहाते. )

**बभ्री**—महाराज, आपण आतां यापुढें माझें काय करावयाचें योजिलें आहे, तें तरी एकदा कळूं द्या. झालें, सर्व कांहीं आटोपलें ! माझी आई व माझा बाप ह्यांची वाट लागलीच. आणि त्यांच्याबरोबर आह्मां स्त्रियांना ह्या जन्मीं ईश्वरतुल्य जो पति, तेही बिचारे मला सोडून गेले ! आतां माझी गति पुढें काय होणार, तें विचारण्याकरितां मी आलें आहें.

**योगी**—बाई, आपण कोण ? कोठून व काय उद्देशानें येणें झालें ? आणि मला आपण कोण समजतां ? हें कळल्याशिवाय मी काय सांगूं बरें ?

ब०--महाराज, मी आपणाला पूर्णपणें ओळखतें. थोडे दिवसांपूर्वी आपण त्या शिंदी बनांत आलां नव्हतां का? आपणच ते, अशी माझी पूर्ण खात्री आहे.

योगी--होय, मी शिंदीच्या बनांत दर्भ काढण्याकरितां आलों होतों, व तेथें दोन बाया पाहिल्याचें स्मरतें. एक तेथें बसलेली होती. आणि भिक्षा आणून घातल्याशिवाय गेलांत, त्या आपण असाव्यात, असें मला वाटतें.

ब०--तीच मी! आणि मला उद्देशून 'हिच्या कपाळीं पांच नवरे आहेत,' असें आपण बोलल्याचें आपल्याला स्मरतें का?

योगी—होय, स्मरतें. विचारणाऱ्या गृहस्थाची, माझ्या तोंडांतून तसें उत्तर निघावें, अशी इच्छा दिसल्यावरून मी तसें बोललों.

ब०--हा आपला आणि विचारणाऱ्या गृहस्थाचा सहज खेळ झाला. पण त्यामुळें मी गरीब अबला सर्वस्वी बुडालें. माझी दृढनिश्चयी साध्वी मातोश्री गेली, त्याबद्दल इतकें वाईट वाटत नाहीं. उलटें ती आपल्या आशीर्वादानें सौभाग्य घेऊन हळदकुंकूं उधळीत गेल्याचें मला कौतुकच वाटतें. परंतु माझा पति गेल्यानें मी अगदीं हो उघडी पडलें. आतां माझा ह्या जगांत निभाव लागणें कठिण आहे. (हुंदके देऊन रडते व डोळे पुसते.)

योगी—बाई, तुह्मांला रडूं नका म्हणून सांगणेंही अशा प्रसंगीं मला कठिण वाटतें. पण नाइलाजास्तव आणि मन घट्ट करून मला सांगितलेंच पाहिजे. कारण येथें तुमचें शांतवन माझ्यावांचून दुसरें कोण करणार? म्हणून मी ह्मणतों, आपण विवेक करून आपली साद्यंत हकीकत मला सांगाल, तर फार बरें होईल. ह्मणजे मला जर एकादा उपाय सुचला, तर मी तो आनंदानें सांगेन. झाल्या गोष्टीस मात्र कांहीं इलाज नाहीं. ईश्वरेच्छा म्हणून स्वस्थ बसलें पाहिजे.

ब०--महाराज, आपण त्रिकालज्ञ आहांत. आपल्याला सर्व माहीत आहेच. असें असून माझ्या मुखांतूनच जर सर्व वदविण्याची

इच्छा असेल, तर ती मला मान्य करणें आहे. कारण, मला आतां ह्या जगांत आपल्यावांचून त्राता राहिला नाहीं. आणि ह्मणूनच मी एवढा मुद्रख तुडवीत आपल्यापुढें पदर पसरण्याकरितां आलें आहें.

**योगी**––आई, तुमच्या ह्या अशा तुटक बोलण्यानें मी फारच बुचकळ्यांत पडूं लागलों आहें. म्हणून मी म्हणतों, आपली साद्यंत हकीकत कृपा करून मला एकदा सांगावी. आपल्या पतिसंबंधानें माझी बत्तीशी बाधल्याचें आपल्यास वाटणें साहजिकच आहे. पण कावळ्याच्या शापानें ढोरें मरत नाहींत, हेंही आपण लक्षांत घेतलें पाहिजे. शिवाय, आपली मातोश्री निवर्तल्याचें आपण सांगत आहांत. तर तिला सुद्धां मीच का शाप दिला होता? मग ती कां बिचारी मेली?

**ब०**––महाराज, मी आपली निर्भर्त्सना करण्याकरितां अथवा आपणाला कोणत्याही प्रकारें दोष देण्याकरितां आलें नाहीं. आपण सर्वज्ञ, पतितपावन योगी आहांत, असेंच मी आपल्याला समजतें. माझ्या आईनेंही मरते वेळीं हेंच सांगितलें. आणि ह्मणूनच मी आपल्या-पुढें इतक्या निर्भिडपणानें बोलत आहें. मी ईश्वराला स्मरून सांगतें कीं, आजपर्यंत मी जरी हालअपेष्टा भोगिल्या, तरी आपल्यावांचून दुसऱ्या कोणत्याही पुरुषाजवळ इतकें बोललें नाहीं. आपण माझे माय-बाप, गुरू आहांत, असें समजून मी बोलत आहें. व माझे मातोश्रीचीही अशीच आज्ञा आहे.

**योगी**—मुली, तूं येथें अशी बैस. (बभ्रीला आपल्या समोर बसवून व तिच्या तोंडावरून हात फिरवून) तुझा निर्धार पाहून मी संतुष्ट झालों आहे. मीही तुला माझीच मुलगी आहेस असें समजतों. आतां निःशंक व निर्भिडपणानें मी विचारतों, तें सांग पाहूं. मी ज्या दिवशीं आलों होतों, त्या दिवशीं तो चुडा ओढीत बसला होता व माझ्याशीं बोलत होता, तो कोण? तुझा बाप का?

**ब०**––छे! तो माझा सासरा! तोही मेला! माझे पति व सासरा एकाच वेळेस, एकेच ठिकाणीं निजले असतांना मेले!

**योगी**--ह्मणजे ? झालें तरी काय ? तें हल्लींचें दुखणें ह्मणजे प्लेग झाला कीं काय ?

**ब०**—नाहीं ! महाराज, फक्त माझ्या आईला प्लेग झाला. ज्या दिवशीं आपण आला होतां, त्याच दिवशीं आपण गेल्यावर दोन तासांनीं आईला ताप आला. पुढें लागलीच गांठ आली. रात्रीं तिला तबेल्यांत नेऊन ठेविलें होतें. बंगल्यांतल्या हॉलमध्यें माझा सासरा, पति व वनांतच एक पक्कान्या रहात असे तो, असे तिघेजण निजले. पुढें पहाटेच्या पांचाचा सुमार असेल, माझ्या आईनें मला हांक मारली. मी जवळ गेलें. पण तिनें आपले डोळे फिरविले आहेत, असें मला वाटल्यावरून मी तशीच धांवत बंगल्याकडे गेलें. आणि हॉलमधील मंडळींना उठविण्याची शिकस्त केली. परंतु कोणी हांक देईना, अगर कडी काढीना. मग मी तशीच आईकडे आलें, आणि तिच्याजवळ धीर करून बसलें. आई अंतर्यामीं सावध होती. मी जवळ बसलेली पाहून तिचे डोळे पाण्यानें भरून आले. तिनें माझ्या तोंडावरून हात फिरविला, व म्हणाली: 'लाडके बाळे, माझी आतां तुला व तुझ्या वडिलांना सोडून जाण्याची वेळ अगदीं जवळ येऊन ठेपली आहे. माझे पश्चात् तुझें संरक्षण सर्व प्रकारें तो काल वनांत आलेला योगी करील. तूं माझें और्ध्वदेहिक झाल्यावरोबर अगोदर त्या योग्यांला गांठून त्यांचे चरणावर मस्तक ठेव, आणि आपली सविस्तर हकीकत सांगून ते जशी आज्ञा करतील तशी वाग. तुझ्या वडिलांची व तुझी भेट झालीच, तर मी काल व परिस्थिति लक्षांत ठेवून नीतीनें वागलें, व आपले-संबंधानें मनानेंही वांकडें पाऊल टाकलें नाहीं, म्हणून सांग. योगी-महाराजांना सांग कीं, आपल्या दर्शनानें माझें जन्माचें सार्थक झालें. तसेंच माझ्या ह्या लाडक्या पोरीचें करा !' इतकें म्हणून तिनें पुन्हा माझे तोंडावरून हात फिरविला व डोळे मिटले. ते पुन्हा उघडले नाहींत !

**योगी**--असो. पुढें तुझा सासरा वगैरे मंडळी केव्हां बाहेर आली ? उजाडल्यावर आली असेल ?

**व०**—ती कशाची बाहेर आली ! आह्मी त्यांची आठ वाजे तों वाट पाहिली. पुढें दारू मक्तेदाराचे शिपाई येऊन पुष्कळ हांका मारून व दार ठोठावून जेव्हां ते उघडीत नाहींत असें पाहिलें, तेव्हां त्यांपैकीं एकजण जाऊन मक्तेदाराला व डॉक्टराला घेऊन आला. त्यांनीं मग दार फोडिलें. आणि आंत जाऊन तिघांचीं प्रेतें बाहेर आणिलीं. हा सर्व प्रकार माझी आई ऐकत होतीच. ती डोळे न उघडतां मला बोलावून म्हणाली, "लाडके, मला सर्व कळलें आहे. तुझ्यावर कठिण प्रसंग आहे. पण ह्यांतूनही तुला ते कालचे योगीच पार पाडतील. कसाही प्रसंग आला, तरी न डगमगतां व जितकी त्वरा करवेल तितकी करून त्यांचें तूं दर्शन घे. तेच तुला माझ्या व तुझ्या वडिलांचे ठिकाणीं आहेत. आतां मात्र मी जातें." इतकें म्हणून तिनें आपला प्राण सोडिला.

**योगी**—एकूण ह्मणतेस, तुझी आई, सासरा, पति आणि तो पकान्या, इतकीं एकदम आटोपलीं तर ? ह्या तिघांना काय निमित्त झालें ? डॉक्टरानें कांहीं सांगितलें नाहीं का ?

**व०**—डॉक्टर व मक्तेदार हॉलांत गेले, तेव्हां तेथें घासलेटचा जळता दिवा होता. त्यावरून त्यांनीं असें ठरविलें कीं, दिव्याच्या धुरानें गुदमरून जाऊन ते मेले. निजते वेळीं सर्व दारें बंद केलीं होतीं. परंतु दिव्याला निरोप द्यावयाला विसरले, यामुळें अपघात झाला.

**योगी**—शिव शिव ! कोण अनर्थ हा ! असो. तुझ्या बापाची काय हकीकत आहे ? अलीकडे तो कोठें आहे ? त्याला एकदा भेटून आईनें सांगितलेला निरोप कळविला पाहिजे, असें तुला नाहीं का वाटत ?

**व०**—आपल्या आशीर्वादानें तेंही काम उरकलें आहे. आतां कोठें जावयाचें राहिलें नाहीं. आणि कोणाला कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. जें सांगावयाचें, तें फक्त आतां आपल्यालाच.

**योगी**—ह्मणजे ? तूं आपल्या बापाला भेटून आलीस का ?

ब०—आपण सर्व जाणत आहांच. तथापि विचारतांच ह्मणून सांगतें. माझ्या आईचें प्राणोत्क्रमण झालें न झालें, तोंच माझा बाप तेथें येऊन पोहोंचला. आणि ती सर्व परिस्थिति पाहून कांहीं एक शब्द न बोलतां तो माझेजवळ बसला. व मला जवळ घेऊन चार पांच वेळां माझ्या कपाळाचें चुंबन घेऊन मला ह्मणाला, ' लाडके, आतां आपला योगायोग संपला!' इतकें म्हणून माझा हात धरून त्यानें आपल्या खिशांत घातला व आईच्या एका बाजूस पडून तिच्या अंगावर हात टाकतो तोंच त्याचें प्राणोत्क्रमण झालें.बापाच्या खिशांत कांहीं नोटा व रुपये हातीं लागले ते मी काढून मक्तेदाराच्या स्वाधीन केले, व सर्वांचा पुढील विधि उरकण्याविषयीं प्रार्थना केली. मक्तेदारानें नोटा मोजून पाहिल्या व एक नोट ठेवून बाकीच्या मला परत देऊं लागला. पण मला कांहीं नको ह्मटल्यावर त्या त्यानें सर्व आपल्याजवळ ठेविल्या. संध्याकाळचे सुमारास मंडळी विधि आटोपून घरीं आली, तेव्हां मक्तेदारानें ' माझे घरीं येतां का?' ह्मणून मला विचारलें. मी नाहीं ह्मणतांच दोन शिपाई व दोन बाया माझे संरक्षणाकरितां ठेवून मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. मी तेथें अर्धी रात्र उलटेपर्यंत स्वस्थ पडून राहिलें. पुढें, ह्मणजे चाराचे सुमारास, तेथून जी निघालें ती आपला माग काढीत येथें येऊन पोहोंचलें.

योगी—( गहिंवरून व डोळे पुसून ) बाळे, तूं स्त्री असून पुरुषापेक्षांही धैर्यानें व शांतपणानें त्या प्रसंगांतून पार पडलीस, ह्यांत संशय नाहीं. शाबास तुझी ! तुझ्या आईनें सांगितल्याप्रमाणें तुझ्या देहाचें सार्थक झालें, असें समज. तुझें नांव काय ? लाडकी का ?

ब०—मला माझी आई व बाबा लाडकी ह्मणत असत. माझें लग्न झाल्यापासून माझीं सासरचीं माणसें व दुसरी सर्व मंडळी मला बभ्री ह्मणूं लागली. आणि मलाही ह्या दैन्यवाण्या व कष्टमय स्थितींत ' लाडकी ' पेक्षां ' बभ्री 'च बरें वाटतें.

**योगी**—मीही तुला बभ्रीच ह्मणेन. मला काय ? पण माझ्या मतानें तुला ‘ लाडकी ’ नांवच शोभतें. बभ्री काय ? त्यापेक्षां भद्री तरी शास्त्रोक्त दिसलें असतें. पण काय ग बभ्रे, हें नांव त्यांनीं कांहीं विशेष कारणावरून ठेविलें ? कीं आपलें उगीच तोंडास आलें तेंच ह्मणूं लागले ?

**ब०**—केवळ तसेंच ह्मणतां येणार नाहीं. कारण हें आहेच. आणि आपल्याला सुद्धां वाटेल कीं, तें चांगलें सबळ कारण आहे. पण मी ह्मणतें, आतांच ह्याची कशाला वाटाघाट पाहिजे. आतां मी येथें आपल्या चरणांची सेवा करून रहाणार आहें. प्रसंगानुसार सर्व कांहीं सांगतां येईल. माझें एकंदर चरित्र फारच लांबलचक आहे, महाराज.

**योगी**—असेना, आपल्याला तरी दुसरें काय करावयाचें आहे आतां ? आणि काळाचा निर्बंध कोणाला ? तुला आहे का अजून ? मी तो केव्हांच झुगारून दिला आहे.

**ब०**—आपल्या कृपेनें मीही त्याची पर्वा बाळगीत नाहीं. मला सहज वाटलें कीं, आपली भाकडकथा सांगून आपल्याला उगीच कां शिणवा ?

**योगी**—मला कसला शीण ? मी शीण बीण कांहीं जाणत नाहीं. तुला वाटत असल्यास बभ्री हें नांव कसें पडलें तें सांग. बाकीचें तूर्त राहूं दे, तुझी मर्जी नसल्यास.

**ब०**—मी आपल्या चरणांची दासी. मला कसली मर्जी ? सांगतें, ऐकावें. महाराज, गरिबीमुळें माझ्या लग्नाचा कांहीं केल्या योग येईना. जवळ पैसा नाहीं, म्हणून माझा बाप आह्मां दोघींना त्या बनांत ठेवून पैसे आणण्याचे निमित्तानें मथुरेस त्याचा स्नेही नंदकिशोर नांवाचा कोणी बॅलिस्टर आहे, त्याजकडे जो गेला, तो परवां आई मेली त्या दिवशीं देह टाकण्याकरितां परत आला. तो गेल्यावर आह्मां दोघींना जीं संकटें व विपत्ति भोगावी लागली, व आमची जी विटंबना झाली, त्याची नुसती आठवण झाली, तर माझ्या अंगावर कांटा उभा रहातो. आणि सध्यां तीं सांगत बसण्याचेंही कारण

नाहीं. तूर्त बभ्री कां नांव पडलें एवढेंच सांगतें. एके दिवशीं माझी आई चिंताग्रस्त बसलेली पाहून मी तिला विचारलें, "आई, तूं कसला विचार करते आहेस?" ती म्हणाली, "तुझ्या लग्नाचा. तुझ्या लग्नावांचून मला दुसरी कशाचीही काळजी वाटत नाहीं." मी आईला म्हटलें, "आई, मला त्या मुनिमाच्या मुलाला देऊन टाकून एकदाची काळजींतून मुक्त हो कशी. पुढें माझेच काय सोहाळे व्हावयाचे असतील, ते मी आनंदानें कंठीन. पण तूं इतःपर माझ्याबद्दल झुरूं नकोस." आईनें हे शब्द ऐकले मात्र, आणि जी उठली ती त्या मुनिमाच्या बंगल्यांत जाऊन एका तासाच्या आंत लग्न ठरवून आली, आणि मला म्हणाली, "लाडके, दैवाची झुळूक आतां बरी वाहूं लागेल असें दिसतें. तुझें लग्न एकदाचें ठरलें!" दुसरेच दिवशीं गोरज मुहूर्तावर माझें त्या मुनिमाच्या मुलाशीं लग्न लागलें. आणि मी ही नवऱ्याकडे जाण्याच्या वयाची झालेली असल्यामुळें त्याच रात्रीं माझी व माझ्या नवऱ्याची गांठ पडली. त्या वेळीं त्यानें मला पहिलाच प्रश्न गोत्राबद्दल केला. मला माझें बाभ्रव्य गोत्र माहीत होतें, तें मी सांगितल्याबरोबर तो मला म्हणाला, "आजपासून मी तुला आपली लहान बहीण व तुझ्या आईला मातोश्री असें समजून वागत जाईन. तुम्ही दोघेंही कांहीं दिवस येथेंच काढा. पुढें मी तुझें दुसरें लग्न करून देईन. कारण आमचेंही गोत्र बाभ्रव्य असल्याकारणानें आपला पतिपत्नीत्वाचा संबंध रहाणें शास्त्राविरुद्ध आहे." इतकें बोलून तो तेथून निघून गेला. आणि मीही तोंडांत मारल्यासारखी होऊन तेथून निघून आईकडे गेलें. दुसरे दिवसापासून माझा सासरा, मी आपल्या बाभ्रव्य गोत्राचा बभ्रा केला, म्हणून मला बभ्री ह्मणूं लागला. आणि मग सगळी मंडळीही त्याच नांवानें हांक मारूं लागली.

**योगी**—बभ्रे, तुझें चरित्र एकंदरींत विचित्र तर खरेंच. तुझ्या बापाची व त्या मथुरावासी नंदकिशोर बॅलिस्टराची ओळख होती, ही गोष्ट मला सहज कळून यावी, ह्यांत कांहीं तरी ईश्वराचा विशेष हेतु दिसतो. माझी व त्या नंदकिशोराची चांगली ओळख आहे. ओळखच काय, पण नातें आहे, असें म्हटलें तरी चालेल. तो आणि मी गुरु-

बंधु आहोंत. आणि माझ्यावर त्याची इतकी भक्ति आहे कीं, तो माझ्याबाहेर एक पाऊलही टाकणार नाहीं. मी जर तुला त्याच्याकडे पाठविली, तर तो तुला आईबापांची आठवण सुद्धां होऊं देणार नाहीं. आणि मग तुला कसलीही काळजी करावयास नको.

ब०—महाराज, आतां जो काय माझा सोक्षमोक्ष करावयाचा, तो आपल्याच हातानें करा. आजपर्यंत झालेली विटंबना पुरे. आतां मला कांहीं एक नकोसें झालें आहे. ह्या देहाचा सुद्धां मला वीट आला आहे. आपली इच्छा मी आपले चरणापाशीं नसावें अशी असेल, तर मी ह्या क्षणीं क्षिप्रेंत जाऊन जीव देतें. ( उठून उभी रहाते. )

**योगी**—( तिला खालीं बसवून ) मग तूं माझ्याकडे आपल्या आईच्या सांगण्यावरून आलीस, ती जीव देण्याकरितां का? आणि हेंच जर करावयाचें होतें, तर येतांना क्षिप्रा ओलांडून तरी कशाला आलीस? मूर्ख खरी तूं. अग मुली, तूं नुकतीच आतां मला आपल्या आईबापांच्या ठिकाणीं समजत होतीस ना? मला तूं आपला गुरु समजतेस ना? गुरु ह्मणजे गोठ्यांतला बैल अगर रेडा का समजतेस?

ब०—( चरणावर मस्तक ठेवून ) महाराज, अपराध क्षमा करा. संकटानें अगदीं गांजून गेल्यामुळें तसे शब्द माझ्या तोंडांतून निघाले. मी सर्वस्वी अपराधी आहें. मी आपलें लेंकरूं आहें. मला माझ्या अपराधाची क्षमा केली पाहिजे.

**योगी**—मुली, तुला मी लेंकरूच समजतों. तुला आतां गांगरण्याचें कांहीं एक कारण नाहीं, हेंही आश्वासन देतों. पण आपल्या दोघांस सोईचा असा एकादा मार्ग काढला पाहिजे ना? मी सर्व पृथ्वीभर हिंडणार. तुझा निभाव माझ्याबरोबर कसा बरें लागणार? म्हणून मी तुला नंदकिशोराकडे पाठविण्याचें म्हणतों.

ब०—आपली जर तशीच इच्छा आहे, तर मला गेलेंच पाहिजे. पण माझें ह्मणणें ऐकून घेऊन मग जें करणें असेल तें करावें.

**योगी**—सांग, कळूं दे, तुझें काय ह्मणणें आहे तें.

ब०—महाराज, नंदकिशोर सुधारणावादी आहे, असें मला ऐकून ठाऊक आहे. ह्या लोकांचें धर्माचरण कसें असतें, हेंही मला माझ्या सासऱ्याच्या अनुभवावरून कळून चुकलें आहे. मीं अनाथ, तरुण, नाहीं आई, ना बाप ! आणि ज्यांच्यावर माझी सर्वस्वी भिस्त, ते आपणही तेथें जवळ रहाणार नाहीं. अशा स्थितींत माझे धिंडवडे जर त्या नंदकिशोरानें आणि त्याच्या सुधारक मंडळींनीं मांडले, तर काय करूं ? मला कोण संभाळणार ?

योगी—शिव शिव ! बभ्रे, तूं वेडी खरी. नुसती वेडीच नव्हेस, पण फार भित्रीही आहेस. असो. तुझ्या वयाला व स्थितीला हें सर्व शोभतें, म्हणून बरें आहे. पण तूं विचार करीत नाहींस. तुला तुझे आईबाप मेल्यापासून येथें येईपर्यंत कोणी संभाळलें बरें ? मी होतों का तुझ्याबरोबर ? असो. आतां जास्त बोलत बसण्यांत अर्थ नाहीं. माझ्यावर तरी तुझा पूर्ण भरंवसा आहे ना ? आणि मी सांगेन, तसें आचरण ठेवशील ना ?

ब०—माझ्या आईचें तेंच सांगणें आहे. आपले आज्ञेबाहेर मी तिळमात्रही जाणार नाहीं. मग माझें जें होणें असेल, तें होवो.

योगी—ठीक आहे. ही बत्तीस रुद्राक्षांची माळ आपले गळ्यांत घाल. (आपले गळ्यांतून माळ काढून बभ्रीस देतो. ) आणि स्नान करून ये. प्रत्यक्ष चंद्रमौळि ज्या मंत्राचा जप करितात, तोच मंत्र मी तुला देतों. मी सांगेन तसें आचरण करून जर ह्या मंत्राचा जप करशील, तर रामकृपेनें तुझ्या सर्व पातकांचें क्षालन होऊन आपण प्रत्यक्ष सांब आहों, यःकश्चित् बभ्री नव्हे, असा तुला प्रत्यक्ष अनुभव येईल. ही दर्भांची जुडीही आपले जवळ ठेव. व सदोदित निदान तीन दर्भ तरी आपल्या जवळ बाळगीत जा, ह्मणजे संकीर्ण व इतर क्षुद्र पातकांचा तुला संपर्क होणार नाहीं.

ब०—(योग्याच्या चरणावर मस्तक ठेवून) महाराज, मी आपल्या आज्ञेबाहेर एक तिळभर जाणार नाहीं, असें आपल्यास

सांगितलेंच आहे. पण माझी थोडी आपणास विनंति आहे. आज्ञा असेल, तर सांगतें. आपल्यावांचून मी कोणास सांगूं?

**योगी**—बोल. तुझ्या मनांत मला कळविल्याखेरीज कांहीं एक ठेवूं नकोस. तुझें मन तें माझेंच मन, असें धरून तुला यापुढें वागलें पाहिजे.

**ब०**—महाराज, आपली आज्ञाच असेल, तर मी नंदकिशोराकडे जातें. माझी ना नाहीं. पण मी तेथें आहें, तोंपर्यंत अन्नोदक सेवन करणार नाहीं. आणि नंदकिशोरानेंही ह्या बाबतींत मला आग्रह करूं नये. अशी व्यवस्था आपण कृपा करून करावी, अशी माझी प्रार्थना आहे.

**योगी**—बाळे, तुझ्या प्रस्तुतच्या स्थितींत हें एवढें खडतर व्रत तुझ्याच्यानें निभावणार नाहीं. आणि मी सांगतों याप्रमाणें जर आचरण ठेविलेंस, तर तुला असल्या देहदंडाचें कारणही नाहीं. तथापि तुझा आग्रहच असेल, तर माझी पुन्हा गांठ पडेपर्यंत फलाहार करीत जा. आणि स्वतः पाणी आणून वापरीत जा. माझी गांठ पडल्यावर मी तुला पुढें कसें वागावयाचें, तें समक्ष सांगेन. जा, ऊठ आतां, लौकर स्नान करून ये. मीही आंत जाऊन देवाची पूजा करून वाट पहात बसतों. ऊठ. (योगी पळीपंचपात्री व दर्भांची जुडी घेऊन उठतात.) [ पडदा पडतो. ]

## प्रवेश ३ रा.

**( स्थळ—अनघपुरांतील खाद्यपेयाराम सदनांतील हॉल. )**
**( धोंडभटनाना हातांत कागद घेऊन प्रवेश करितात. )**

**धोंडभट**—(घड्याळ काढून व त्याकडे पाहून) पांच वाजून सत्तावीस मिनिटें झालीं, तरी अजून एकाचाही पत्ता नाहीं. आतां हे सभासद यापुढें येणार केव्हां आणि आज नेमलेल्या विषयांची चर्चा करणार केव्हां! बरें, विषय तरी एक दोन का आहेत! आणि ते तरी एकाच मासल्याचे आहेत का? सगळाच पोरखेळ. आणि ऐट मात्र एखाद्या मोठ्या परिषदेची. हें जुळणार

कसें बरें ! बरें, पगार वाढवा ह्मणण्याची सोय आहे का ? म्हटलेंच, तर घरीं बसा ह्मणतील. मग हे पांच मिळताहेत, तेही जातील. त्यापेक्षां ही वीस दिवसांची आपली श्राद्धदक्षिणा म्हणून स्वस्थ बसावें हेंच बरें.

( रावसाहेब रत्नपारखी प्रवेश करितात. )

**रत्नपारखी**---( घड्याळ काढून व त्याकडे पाहून ) काय हो धोंडूनाना, अजून कोणीच कसें आलें नाहीं. मीच दोन तीन मिनिटें उशिरा आलों. पण येथें पहातों तों कोणीच अजून आलें नाहीं.

( रावबहादुर डमरु प्रवेश करितात. )

**डमरु**--( घड्याळाकडे पाहून ) थोडा उशीर झाला खरा. पण मीच होतों, म्हणून इतक्या लौकर आटोपलें. माझ्याच पंजोबाचें अक्षर मला लागेना ! त्यांत भाषा ती जुनी मराठी ! पुष्कळ अकारान्त शब्द उकारान्त लिहिलेले ! कागद जागजागीं फाटलेला व कित्येक ठिकाणीं डाग पडलेले ! पण मी एकदा जो खनपटीस बसलों, तो जितकें मला कामापुरतें दिसलें व नीट वाचतां आलें, तितकें लिहून काढून आणिलें आहे.

**रत्न०**--आपण जें लिहून आणिलें आहे, त्यानें काम भागण्यासारखें आहे ना ?

**डमरु**—होय तर. मी कांहीं अस्सल बरहुकूम नक्कल केली नाहीं. अस्सलांतील मजकूर घेऊन हल्लींच्या मराठी भाषेंत सरळ लिहून काढिला आहे. आणि ही सर्व हकीकत मला माहीत होती, आणि माझी आजी जवळ बसली होती, म्हणून तिच्या मदतीनें मला लिहितां आली.

**रत्न०**--मग वाचानांत का ? ऐकूं द्या तर खरा काय तुमच्या अद्वैतसिद्धांताचा इतिहास आहे तो. माझें अजून हेंच ह्मणणें आहे कीं, अद्वैतसिद्धांत सिद्धांत या नात्यानें खरा असला, तरी आमच्यासारख्यांना तो मृगजळवत्च आहे. ह्मणजे, नामरूपानें मात्र खरा, व्यवहारांत अगदीं खोटा.

**डमरु**—खरें ह्मणाल, तर माझेंही आपल्यासारखेंच ह्मणणें आहे. पण जें वेदश्रुतिसंमत आहे, जें मोठमोठ्या विभूतींनीं—ह्मणजे श्रीमत् शंकराचार्यांसारख्यांनीं—स्थापन केलें आहे, व जें सर्व पंडितांस मान्य आहे, त्यास आपण झुगारून कसें चालेल.

**रत्न०**—हं, तसें म्हणा पाहिजे तर. व त्याबद्दल माझा वादही नाहीं. माझें ह्मणणें इतकेंच कीं, आपल्यासारख्यांना अद्वैतसिद्धांत कांहीं एक उपयोगाचा नाहीं.

(भोलानाथ सरसुभे हळू हळू काठी टेकीत प्रवेश करितात, व चष्मा काढून हातरुमालानें पुसून सर्व मंडळीकडे पहात हलकेंच खुर्चीवर बसतात.)

**सरसुभे**—(चिरूट पेटवून व एक झुरका घेऊन) काय हो धोंडूनाना, आज कांहीं तयारी दिसत नाहीं ही?

**धोंडभट**—सर्व व्यवस्था आहे. आपल्यास उशीर झाल्यामुळें मीही घाई केली नाहीं. (बाजूस ठेविलेल्या सोडावॉटरच्या बाटल्या, बिसकुटें व ग्लास टेबलावर आणून ठेवितो.)

**सर०**—(एक ग्लास भरून घेऊन एक घोट घेतो, व रत्नपारखी आणि डमरु ह्यांस एक एक चिरूट देऊन) उशीर? हं हं, महाराज, आज मुळींच माझें येणें झालें नसतें. पण त्या जगदीशाच्या कृपेनें खेर झाली, म्हणून आलों. वाटेंत धुरळा बसण्याकरितां पाणी टाकलें होतें, त्यावरून माझा पाय घसरून मला सपशेल निजावें लागलें. एवढेंच झालें कीं, एका कुशीवर निजल्यामुळें चटकन उठतां आलें. मग तसाच घरीं गेलों, आणि कपडे बदलून आलों, यामुळें उशीर लागला. पण अजून जहागिरदारसाहेब नाहींत, व डॉक्टर पडघमही नाहींत, हें काय?

(धुंडिराज वैद्य प्रवेश करितात.)

**सर०**—या, असे या. (त्यांना खुर्ची देतात.) आज आपली स्वारी इकडे कोणीकडे चुकली?

**धुंडिराज वैद्य**—चुकली नाहीं. आज बुद्ध्याच मी आलों आहें. आज द्वैताद्वैताबद्दल चर्चा होणार आहे, असें ऐकलें. म्हणून म्हटलें, घटकाभर ऐकावें जाऊन काय ठरतें तें.

**सर०**—आज चर्चा नाहीं. ती मागील सभेंत झाली आहे. आज रावबहादुर डमरु फक्त निबंध वाचणार आहेत.

**धुंडिराज**--बरें, निबंध का होईना. तो तरी ऐकावयास सांपडेल.

**सर०**--ठीक आहे. आणखीही दुसरे विषयांची वाटाघाट ऐकावयास मिळेल. असे नियमित येत गेल्यास फायदा होणार नाहीं, असें नाहीं. पण तुह्मी जुन्या मताची मंडळी, तुमच्या हें डोक्यांतच शिरत नाहीं, काय करावें !

( डॉक्टर पडघम प्रवेश करितात, व सगळ्यांबरोबर शेकहॅन्ड करून रा० ब० डमरुजवळ बसतात. )

**सर०**--कां डॉक्टरसाहेब, आज रावसाहेब रत्नपारखी "जंतुशास्त्राबद्दल आमच्या समजुती" या विषयावर निबंध वाचणार आहेत. आपल्या मागें परत जाण्याचा तर लकडा नाहीं ना ? आपण हजर असलां, ह्मणजे वादविवादास रंग येईल.

**डॉ० पडघम**—मी तरी तेवढ्याचकरितां मुद्दाम आलों आहें. रावसाहेब रत्नपारखी, ज्यांना या शास्त्राची बिलकुल ओळख नाहीं, ते बोलतात काय, तें तरी एकदा ऐकावें. पण सरसुभेसाहेब, इतके विषय आज आटोपणार तरी कसे ? मला वाटतें, एकंदर चार विषय आहेत. आणि वेळ अवघा दोन तास ! अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं. आणि जहागिरदारसाहेबही अजून आले नाहींत.

**सर०**--काय रे धोंडूनाना, आज कोणकोणते विषय आहेत ? आणि कोणकोणाकडे आहेत ?

**धोंडभट**--( कागद घेऊन वाचतो. ) आज ज्यांच्याकडे जे विषय आहेत, त्यांचीं नांवें अशीं:

( १ ) द्वैताद्वैत—रावबहादुर डमरु निबंध वाचणार.

( २ ) जंतुशास्त्राबद्दल आमच्या समजुती– रावसाहेब रत्नपारखी विवेचन करणार.

( ३ ) पुनर्विवाह—जहागिरदारसाहेब व्याख्यान देणार.

( ४ ) "फुंकणी लुकणं" न्याय—सरसुभेसाहेब.

यांपैकीं पहिला व चौथा या दोन्हींबद्दल महाराष्ट्र इतिहास-संशोधक मंडळीस पत्र लिहावयाचें आहे. व तें सरसुभेसाहेब स्वतः माझ्याकडून लिहविणार आहेत. बाकी राहिले दोन विषय. पैकीं एक विषय, जहागिरदारसाहेब आले नसल्यामुळें, पुढें होणाऱ्या बैठकींत चर्चेस निघाला तरी चालेल. मग एकच विषय चर्चा करण्याचा रहातो. व तो रावसाहेब रत्नपारखी हजर असल्यामुळें आतांच घेऊन कामास सुरुवात करावी, असें मला वाटतें.

**सर०**—छे, तसें करणें बरें होणार नाहीं. विषय अगदीं नवीन आहे. आणि त्याच्या चर्चेचा फायदा जहागिरदारसाहेबांस मिळालाच पाहिजे. म्हणून हा विषय घेण्यापूर्वीं ज्याविषयीं चर्चा होऊन, आज फक्त महाराष्ट्र इतिहाससंशोधक मंडळीला पत्र लिहावयाचें आहे, त्याचाच अगोदर विचार करणें बरें. पत्र लिहून होई-पर्यंत जर जहागिरदारसाहेब आले नाहींत, तर त्यांचा विषय पुढें काढूं. व रावसाहेब रत्नपारख्यांचा चर्चेला घेऊं. कां, कसें काय डॉक्टरसाहेब, मी पायानें पंगू असलों, तरी माझी जीभ खंबीर आहे. पहा कसे तेव्हांच विषय उडवितों ते.

**डॉ० पड०**—मला आपलें ह्मणणें पसंत आहे. अगोदर पत्राचाच मसुदा तयार करावा. सेक्रेटरी धोंडूनाना तो तेव्हांच लिहितील. आणि आह्मांसही आपले अभिप्राय सहज ऐकावयास सांपडतील.

**सर०**—हं, ठीक आहे. धोंडूनाना, कागद पेन्सिल घे पाहूं. प्रथम पत्राचा खर्डाच तयार होऊं द्या. मग कमी जास्ती करितां येईल. ( धोंडभट सरसुभ्यांपुढें कागद पेन्सिल घेऊन बसतो. ) पण खरेंच,

एक गोष्ट राहिली. रावबहादुर डमरूंनीं आपला निबंध अजून वाचला नाहीं. तो वाचून आपण सर्वांनीं पसंत केल्याशिवाय त्याबद्दल पत्रांत कसा उल्लेख करितां येईल ? कां खरें कीं नाहीं, रावबहादुर डमरु ?

**डमरु**--खरेंच, निबंध अगोदर वाचलाच पाहिजे. ( चटकन उठून व चुकीची दुरुस्ती करण्याबद्दल तत्परता दाखवून निबंध वाचावयास सुरुवात करतो. ) सभ्य गृहस्थ हो, मला थोडकेंच वाचावयाचें आहे. ह्मणजे माझा निबंध फार लहान आहे. तो मी जितका रसाळ होईल, तितका करून आणिला आहे. सभ्य गृहस्थ हो, मी ज्या घराण्यापैकीं ह्मणविला जाण्याचा अभिमान बाळगितों, त्या डमरु घराण्याचा शूलपाणि या नांवाचा एक पुरुष पाणिनीचा समकालीन असून, पाणिनीला ज्या वेळीं शंकराच्या डमरूच्या एका बाजूच्या आवाजानें व्याकरणसूत्रें प्राप्त झालीं, त्याच वेळेस त्याच डमरूच्या दुसऱ्या बाजूनें आमच्या सदर पूर्वजाला अद्वैतसिद्धांताचीं सूत्रें मिळालीं. पुढें त्यांनीं हीं सूत्रें जुळवून ‘ सिद्धांतडमरु ’ या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. ह्याच ग्रंथाच्या आधारानें श्रीमत् शंकराचार्यांनीं अद्वैतसिद्धांत स्थापन केला. पुढें असमानी सुलतानी होऊन हा ग्रंथ कोठें गाहाळ झाला, त्याचा पत्ता नाहीं. ह्या ग्रंथाचा गोषवारा पुढें एका पुरुषानें मराठींत लिहून ठेविलेला आमच्या पंजोबांपर्यंत आमचे घराण्यांत होता, व बायकांना सुद्धां याची माहिती होती. पुढें यांतील कांहीं पानें उंदरानें खाल्लीं व कांहीं इतकीं मळीण झालीं कीं, त्यांवरून नक्कल करणें सुद्धां अशक्य झालें होतें. व कांहीं दिवसांनीं हीं पानेंही नाहींशीं झालीं असतीं. पण आमच्या लोकांचें प्रारब्ध मोठें, यामुळें जगदीशानें सरसुभेसाहेबांस बुद्धि देऊन त्यांच्या मार्फत मला प्रोत्साहन मिळाल्यामुळें मी आज आठ दिवस श्रम करून त्या पानांवरून आमच्या वृद्ध आजीबाईंच्या साहाय्यानें त्या सिद्धांतग्रंथाचें मूळ तत्त्व शोधून लिहून आणलें आहे. तें हें कीं, जगत् हें कपित्थफलाप्रमाणें कल्पून त्याच्या बाहेर कपित्थफलाला जसें डेंख असतें, तसें ह्या जगाला दहा अंगुलें

डख आहे, अशी कल्पना केली आहे. व ही श्रुतिसंमत आहे. जोंपर्यंत मनुष्य ह्या कपित्थफलांत ह्मणजे व्यवहारांत वागतो, तोंपर्यंत त्यास आपण ईश्वराहून वेगळे आहोंत, असें मानावेंच लागतें. आणि येथेंच द्वैताची उत्पत्ति आहे. आणि तें साहजिकच आहे. तसें न होईल, तर व्यवहार बंद पडतील. आणि जे व्यवहाराच्या बाहेर--ह्मणजे डेंखावर--येऊन पोहोंचतात, त्यांच्याबद्दल मात्र अद्वैतसिद्धांताचा प्रत्यक्ष अनुभव येतो. व तोही तेथें असेपर्यंतच. कारण तेथें फक्त ईश्वरालाच राहण्यापुरती जागा असल्यामुळें ज्याला तेथें जाऊन प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा असेल, त्याला ईश्वरांतच आपला समावेश करून घ्यावा लागतो, ह्मणजे ईश्वरच बनावें लागतें. आणि तसें झालें, ह्मणजे त्याला अद्वैतसिद्धांताच्या सत्यतेची प्रचिति येते. बाकी सर्वांनीं तोंडानें वाचाळपणा करून अद्वैताची घमेंडी मात्र मारावी, प्रचिति द्वैताचीच यावयाची. सारांश, अद्वैत ह्मणजे ईश्वरच; व ज्यास ईश्वराची प्रचिति झाली, त्यालाच अद्वैतसिद्धांत समजला. बाकींचे सर्व द्वैतीच समजले पाहिजेत. सभ्य गृहस्थ हो, हा उपलब्ध असलेल्या भागाचा गोषवारा झाला. एवढ्यावरून द्वैतमतच व्यवहाराला धरून आहे, व येथें जमलेली सर्व मंडळी द्वैतीच आहेत, असें मीही रावसाहेब रत्नपारख्यांच्या ह्मणण्याप्रमाणें जोरानें प्रतिपादन करून आपली मोठ्या नम्रतेनें खालीं बसण्याची परवानगी घेतों. ( खालीं बसतो. )

**सर०**—हं, धोंडूनाना, घे कागद पेन्सिल आणि कर सुरुवात. लिही ! महाराष्ट्र इतिहाससंशोधक मंडळीचे सेक्रेटरी यांस—विनंति विशेष. सोबत रावबहादुर डमरु यांनीं वाचलेल्या निबंधाची प्रत जोडली आहे. निबंधांतील मजकूर श्रीमंत सरसुभेसाहेब यांस बिलकुल मान्य नाहीं. करितां याबद्दल विचार करण्याची तसदी घेण्याचें कारण नाहीं. मात्र ह्यांत जो "सिद्धांतडमरु" या नांवाचा ग्रंथ नमूद आहे, त्याचा मात्र आपले मंडळीकडून अवश्य शोध व्हावा, अशी अगत्यपूर्वक विनंति आहे. बस्स, तूर्त एवढेंच या विषयासंबंधीं पुरें

आहे. आतां दुसरें कशाबद्दल लिहावयाचें ?

**धोंड०**—आतां 'फुंकणी लुकणं' न्याय राहिला. तो लिहिला ह्मणजे पत्र पुरें झालें.

**सर०**—हं, हें घे. मी स्वतः लिहून आणिलें आहे. त्या बर-हुकूम लिहून काढ ह्मणजे झालें. पण तें एकदा या सर्व मंडळीस वाचून दाखीव. ह्मणजे कोणास कांहीं कमजास्त करावयाचें असल्यास करण्यास ठीक पडेल.

**धोंड०**—(लिहून आणिलेला मजकूर घेऊन वाचावयास लागतो.) एके दिवशीं सरसुभेसाहेबांचे घरीं एक अतिथि जेवाव-यास आला. वैश्वदेव घरांत कोठें न दिसल्यामुळें सरसुभे शूद्र आहेत, अशी बेवकूबपणाची मनाची समजूत करून चालता झाला. त्याबद्दल सरसुभेसाहेबांस इतकें वाईट वाटलें नाहीं. पण आपण जातीचे ब्राह्मण असून लोकांनीं आपणास फक्त वैश्वदेव न केल्यामुळें शूद्र समजावें, हें त्यांस खपेना. ताबडतोब त्यांनीं वैश्वदेव मंत्राच्या दोन फोनोग्राफाच्या बांगड्या तयार करवून दुसरेच दिवशीं "फोनोग्राफिक" वैश्वदेव केला. परंतु बांगडी तयार करणाऱ्या ब्राह्मणांनीं, असलें कृत्य बंद पाडण्याचे हेतूनें म्हणा, अगर दुसरे कांहीं कारणामुळें म्हणा, अशी शंका काढिली कीं, हें यंत्र परदेशी असल्यामुळें व फोनोग्राफाच्या प्लेटीस लाविलेलें लुकण अशुद्ध पदार्थांचें असल्यामुळें, "फोनोग्राफिक" वैश्वदेव अग्नि-नारायणास मान्य होणार नाहीं. हें ऐकल्याबरोबर सरसुभेसाहेबांस मोठी चुटपुट लागून, त्या दिवसापासून लुकणाचीं द्रव्यें शोधून काढण्याचा जो त्यांनीं ध्यास घेतला, तों त्यामुळें त्यांचें शरीर अर्धें झालें. अखेरीस जगदीशाला त्यांची करुणा येऊन, एके दिवशीं रात्रीं सरसुभेसाहेबांस लुकणाच्या द्रव्याबद्दल स्वप्न पडलें. प्रथम स्वप्नांत एक सुवासीण येऊन, ती त्या द्रव्यांच्या निरनिराळ्या पुड्या करून सरसुभेसाहेबांस देऊं लागली. पण सरसुभेसाहेबांनीं परस्त्रीशीं भाषण न करण्याचा नियम अलीकडे धरल्यामुळें त्यांनीं तिला खुणेनें हांकलून दिलें. आणि आपण स्वस्थ

झोंपीं गेले. पण थोडक्याच अवकाशांत तो पंढरपुरचा विठोबा नांवाचा चामट कुळकर्णी त्यांच्या स्वप्नांत आला. त्याचें तें चाकाएवढें पागोटें पाहूनच सरसुभेसाहेबांस संताप आला, व त्यांनीं त्यालाही हांकलून दिलें, आणि फिरून स्वस्थ झोंपीं गेले. पुढें कांहीं वेळानें सरसुभेसाहेबांच्या पुढें एक प्रचंड श्यामवर्णाचा गोळा दृष्टीस पडून त्यांतून असा ध्वनि निघाला कीं, "माझ्या प्रियकर व दृढनिश्चयी भक्ता, तुला अजून श्रमविभागाचें तत्त्व चांगलें कळूं लागलें नाहीं, ह्याची मला दिलगिरी वाटते. अरे, मीच तीं द्रव्यें प्रथम त्या स्त्रीबरोबर व नंतर विठोबा कुळकर्ण्याबरोबर पाठविलीं होतीं. पण तीं तूं घेतलीं नाहींस, त्याला मी काय करूं? आतां तुला इतकेंच सुचवून ठेवितों कीं, त्यांतील बहुतेक द्रव्यें तुझ्या नित्याच्या स्वयंपाकांत वापरण्यांत येत असतात. तीं तूं आपल्या भक्तीच्या सामर्थ्यानें शोधून काढून स्वदेशी फोनोग्राफ तयार कर." इतकें झाल्यावर सरसुभेसाहेब आणखी बोलणार, इतक्यांत तें तेज नाहींसें होऊन सरसुभेसाहेब जागे झाले. त्यावर अजून पुन्हां स्वप्न पडलें नाहीं. स्वप्नाच्या दुसरे दिवशीं सर्व हकीकत रावबहादुर डमरु यांस त्यांनीं सांगितली. तेव्हां रावबहादुर म्हणाले कीं, फोनोग्राफ तयार करणें फार अवघड आहे, असें नाहीं. व लुकणांतील द्रव्येंही तुमच्या निश्चयामुळें जगदीशास सांगणें भाग आहे. पण ज्या कर्ण्याच्या योगानें आवाज निघतो, तो तरी तुह्मांस परदेशांतून आणावा लागणारच! व मग फोनोग्राफवाले तुमच्यापासून सबंध यंत्राची किंमत घेऊन नुसता कर्णा तुमचे हातांत देणार! हें ऐकल्याबरोबर सरसुभेसाहेबांस दे माय धरणी ठाव, असें होऊन ते निचेष्टित बसले. पण सुदैवानें तेथें सेक्रेटरी धोंडूनाना वसले होते. त्यांनीं आपलें डोकें खर्च करून अशी शक्कल काढिली कीं, जर लुकणाचीं द्रव्यें स्वयंपाकाच्या पदार्थांतच जगदीशकृपेनें सांपडणार आहेत, तर स्वयंपाकास अवश्य लागणारी जी फुंकणी, तीच कर्ण्या-ऐवजीं स्वदेशी फोनोग्राफांत उपयोगांत आणली पाहिजे, असा जगदीश-

संकेत कां नसावा? धोंडूनानाच्या तोंडांतून हीं अक्षरें पडलीं मात्र, तों सुभेदारसाहेब शुद्धीवर आले, आणि धोंडूनानाचे आभार मानून त्यास म्हणाले कीं, "धोंडूनाना, आज आपल्या अकलेच्या प्रभावानें मी मोठ्या संकटांतून मुक्त झालों, हें सांगावयास नकोच. पण आपल्या ह्या आजच्या लुकण–ऊहापोहांत एक निव्वळ मराठी 'न्याय' उत्पन्न झाला, तो तुमच्या लक्षांत आला का? आजपर्यंत आपल्या मराठी भाषेंत 'काकतालीय' न्यायासारखे न्याय नसल्यामुळें, ती अगदीं पोरकी दिसत असे. ती उणीव कांहीं अंशीं भरून निघाली, असें आपल्या लक्षांत येतें का?" धोंडूनाना चटकन म्हणाले कीं, "आपण 'फुंकणी–लुकणं' न्याय म्हणत असाल, तर तो माझे केव्हांच लक्षांत आला आहे." हें ऐकल्याबरोबर सरसुभेसाहेबांस फार हर्ष झाला, व त्यांनीं धोंडूनानाची पाठ थोपटली. व दोघांनीं मिळून, हा नूतन 'न्याय' मराठी भाषेंत उपयोगांत आणण्याचा ठराव करून आपल्याकडे कळविण्याचें ठरविलें. मात्र हा न्याय उपयोगांत आणणें, तो एका विवक्षित गोष्टीचा ऊहापोह करीत असतां दुसरीच एकादी गोष्ट उत्पन्न झाली, तर तिच्या संबंधानेंच उपयोगांत आणण्याची सावधगिरी ठेवीत जावी. कळावें, पत्र पोहोंचल्याचें कळवावें.

**सर०**—हं, याप्रमाणें पत्र पुरें करून पाठवून दे, ह्मणजे झालें. आतां फक्त दोन विषय राहिले. पैकीं जहागिरदारांचा विषय ते येण्यावर तहकूब ठेवून, रावसाहेब रत्नपारख्यांनीं आपल्या विषयासंबंधानें बोलण्यास सुरुवात करावी, अशी मी सूचना करितों.

**रत्न०**—(उठून) सभ्य गृहस्थ हो, मला जें कांहीं बोलावयाचें आहे, तें इतकेंच कीं, हल्लीं जंतुशास्त्राचा नवीन शोध लागल्याचा जो डंका वाजत आहे, तो निरर्थक असून निदान आमचे देशांत तरी हा शोध नवीन नाहीं. याची माहिती आमचेकडे ऋषिकालापासून सर्वांस असून ती उपयोगांत आणण्याचाही प्रघात अद्यापपर्यंत आमच्यांत चालू आहे. ज्याला आपण 'चैतन्य' म्हणतों, तेंच ह्या

जंतुशास्त्राचा पाया आहे. आमच्या शास्त्राप्रमाणें चैतन्य हें जीवमय आहे. व सर्व सृष्टि चैतन्यमय, ह्मणजे जीवमय, ह्मणजे जंतुमय आहे. आपण जें जें डोळ्यांनीं पहातों, त्या सर्वांमध्यें चैतन्य–ह्मणजे जीव–ह्मणजे जंतु आहेत. ते दिसणें अगर न दिसणें, हें मात्र डोळ्यांच्या व सूक्ष्मदर्शक साधनांच्या शक्तीवर अवलंबून आहे. आमच्या शास्त्रांत डोळ्यांची शक्ति वाढविण्याचीं साधनें सांगितलीं आहेत. त्यामुळें सूक्ष्म-दर्शक भिंगाची आमच्याकडे जरूर पडत नसे. शास्त्रोक्त साधनानें दृष्टि कमाविली, ह्मणजे हें जग चैतन्यमय–ह्मणजे जीवमय–ह्मणजे जंतुमय दिसूं लागेल. दिव्यदृष्टि ह्या कमावलेल्या दृष्टीलाच ह्मणतात, व याचा अनुभव पुष्कळ दिव्यदृष्टिवाल्यांस अद्यापपर्यंत येत असल्याचें आपणा सर्वांस विदित आहेच. पूर्वकालीन ऋषि व हल्लींचे हटयोगी यांना ह्या प्रकारची दृष्टि —

( जहागिरदारसाहेब प्रवेश करितात, व सर्वजण उठून त्यांस खुर्चीवर बसवितात. )

**सर०**—मला वाटतें, आतां रत्नपारख्यांनीं आपलें भाषण संपवून खालीं बसावें. तूर्त झालें इतकेंच बस्स आहे.

**डॉ० पड०**—माझेंही असेंच ह्मणणें आहे. नाहीं तर ते पुढें माझ्या टोपींत जंतु आहेत, असें सांगण्यास कमी करणार नाहींत. त्यांनीं जंतुशास्त्राचा पाश्चिमात्य पद्धतीनें चांगला अभ्यास करावा. व पाश्चि-मात्य व मुख्यत्वेंकरून जर्मन पंडितांचे ग्रंथ वाचावे. आणि मग ह्या जंतुशास्त्रासारखे गहन विषय हातांत घ्यावे.

**सर०**—खरेंच, काय हो रावसाहेब, आपण जंतुशास्त्रासंबंधीं बोलतां ना? मग हें चैतन्य, ऋषि, हटयोगी ही कोठली परिभाषा काढिली आहे? तुम्ही एकाद्या प्रोफेसराचा ग्रंथ वाचला आहेत काय? तो काय म्हणतो, तें तरी सांगा. उगीच ह्मणे, चैतन्य जंतुशास्त्राचा पाया आहे. आपण रहातों, त्या घराचा पाया सुद्धां चैतन्यच का?

**रत्न०**—हो, हो, यांत काय संशय आहे ? ह्या सृष्टींत यच्चावत् स्थावर जंगम पदार्थ चैतन्यमयच आहेत. त्यांत जीव आहे, ह्मणूनच ते जंतुमय आहेत. असें अजूनही मी आमच्या शास्त्राच्या आधारानें म्हणतों. व ह्याला पाश्चिमात्य शास्त्राची, अगर आधाराची, किंवा प्रोफेसराच्या अभिप्रायाची बिलकुल जरूर नाहीं.

**धुंडिराज**—शाबास, रावसाहेब शाबास ! आपलें प्रतिपादन फार मार्मिक व सत्याला धरून आहे, अशी माझी तरी पूर्ण खात्री आहे.

**डॉ० पड०**—काय हो वैद्यबुवा, आपण ह्या सभेचे सभासद आहांत का ? इतकें शिरा ताणून बोलण्याचा यांना काय अधिकार आहे ? जंतुशास्त्र ह्मणजे काय, हें तरी ह्यांना समजलें आहे काय ? तें वाग्भटांत अगर अश्वभटांत आहे का ? लायन्भटांत तरी आहे का कांहीं उल्लेख ह्या जंतुशास्त्राचा ?

**धुंडिराज**—डॉक्टरसाहेब, मी ह्या सभेचा सभासदही नाहीं, व मला बोलण्याचा अधिकारही नाहीं, हें मी कबूल करितों. परंतु काय करूं ? रावसाहेब रत्नपारख्यांच्या तोंडांतून जेव्हां आमच्या वेदांतशास्त्राचें रहस्य बाहेर पडलें, तेव्हां माझें शरीर व माझी जीभ माझ्या स्वाधीन न रहातां मी एकदम उठून उभा राहिलों. प्रमाद झाला खरा; पण ह्याबद्दल मी माफी मागतों.

**बापुसाहेब**—माफी कशाला मागावयास पाहिजे ? विषयाची उघड चर्चा चालली असतां वाटेल त्यानें आपलें मत सांगावयास कांहीं हरकत नाहीं.

**सर०**—तें खरें बापुसाहेब ! पण काय बोलावें, याचा कांहीं विचार नको का ?

**रत्न०**—विचार पाहिजे ना ? मग तुम्ही तरी, मी काय म्हणतों, याचा विचार केला आहेत का ? मी म्हणतों, हें सर्व जगत् चैतन्यमय—ह्मणजे जीवमय—आहे, असें आमचीं शास्त्रें ठणाणा करीत

असतां, तुम्ही पाश्चिमात्यांचें एवढें स्तोम कां माजवितां ? पाश्चिमात्यांना जे जंतु आतां कोठें दिसूं लागले आहेत, ते आमच्या शास्त्रदृष्टीला केव्हांच आढळून आलेले आहेत.

**धुंडिराज**—आणि याबद्दलच मला जो परमानंद होत आहे, तो मी बापुसाहेबांच्या परवानगीनें पुन्हां जोरानें व्यक्त करितों.

**सर०**—( घड्याळ पाहून ) मला वाटतें, हा जंतुशास्त्राचा विषय पुढील बैठकीपर्यंत तहकूब ठेवावा; व राहिलेल्या पुनर्विवाहाच्या विषयावर बापुसाहेबांस जें बोलावयाचें असेल, तें त्यांनीं आतां बोलावें; ह्मणजे आजच्या सभेचें काम वेळेवर होऊन नेमलेले सर्व विषयही झाल्यासारखे होतील. फक्त वीसच मिनिटें राहिलीं आहेत.

**बापु०**—माझ्याकडे असलेल्या विषयावर बोलण्यास आज माझी तयारी नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. परंतु राहिलेल्या वेळांत ह्याच विषयासंबंधीं आमचे येथें आजच जी एक चमत्कारिक गोष्ट घडून आली, ती सांगण्याविषयीं मंडळींची मी परवानगी मागतों. गोष्ट अपूर्व असून सर्व सभासदांस आश्चर्यचकित करील, अशी माझी खात्री आहे. ह्याच गोष्टीमुळें मला माझा नेमलेला विषय तयार करण्यास वेळ मिळाला नाहीं, आणि सभेस येण्यासही उशीर लागला.

**सर०**—आपण ह्मणतां तसें करण्यास सभेच्या नियमांची हरकत नाहीं. गोष्टींत पुनर्विवाहाचा कांहीं तरी संबंध असला, ह्मणजे झालें.

**बापु०**—कांहीं तरी कां ह्मणतां ? पूर्ण रीतीनें पुनर्विवाहाचीच गोष्ट आहे, असें म्हटलें तरी चालेल. व ती माझ्या स्वतःच्याच पुनर्विवाहासंबंधीं असून, वधू निश्चित करण्याबद्दल मी पत्र लिहून तें टपालांत टाकण्याकरितां शिपायापाशीं देऊन नंतर इकडे आलों आहे.

**सर०**—शाबास, बापुसाहेब, शाबास ! ह्याला ह्मणावें काम !

**डॉ० पड०**—आणि मानसिक धैर्य व दृढनिश्चय !!

**सर०**—पण, हें झालें कसें आजच्या आज ? एकंदर हकीकत

सांगाच. आह्मांला तीं कळूं द्याच. थोडा वेळ लागला, तरी हरकत नाहीं. आपण बसूनच काय सांगावयाचें तें सांगितलें, तरी चालेल.

**बापु०**—( सरसुभ्यांस ) मी आपला फार आभारी आहें. असो. मी आज सकाळीं उठून प्रातर्विधि आटोपून दिवाणखान्यांत आलों. तों इतक्यांत शिपायानें वर्दी आणिली कीं, खालीं कोणी योगी आला असून त्यास मला भेटण्याची इच्छा आहे. मी शिपायास त्या योग्याला वर पाठवून देण्यास सांगितलें. व त्याप्रमाणें तो वर आला. त्याला पाहिल्याबरोबर मला फार आनंद झाला. मग हिकडल्या तिकडल्या चार गप्पा झाल्यावर त्यानें माझी स्वतःची हकीकत विचारली. आमच्या इकडच्या रिवाजाप्रमाणें त्यानें पहिला प्रश्न मला मुलांबाळांसंबंधींचा केला. त्याबरोबर मी ' ना ' चा पाडा वाचला. पुढें घरांतील आणखी कांहीं हकीकत विचारल्यावर त्यानें मला लग्न करण्यास सांगितलें. मी म्हटलें, " आतांपर्यंत रुईसुद्धां चार बायका झाल्या, आणि आतां यापुढें बायको करावयाचीच झाली, तर पुनर्विवाहाची करण्याचा बेत आहे. व त्यासंबंधीं खटपट चालू आहे. चांगलीशी वधू मिळाल्यास कार्य उरकून घेणार आहें. " हें ऐकून योगी म्हणाला कीं, " पुनर्विवाहानें धर्म आणि अर्थ साधणार नाहीं. कदाचित् ' काम ' मात्र साधेल. पण ज्यांना संततीची जरूरच आहे, अशा तुमच्यासारख्यांनीं स्मृतींत सांगितल्याप्रमाणेंच विवाह केला पाहिजे. पुनर्विवाहाची संतति जातिबाह्य ठरून तुमचा वंशच्छेद होईल. " मी म्हटलें, " बेहेत्तर आहे, वंशच्छेद झाला तरी ! स्वतः पुनर्विवाह करून दुसऱ्यास कित्ता घालून देण्याचा माझा हेतु आहे. तेवढें झालें, ह्मणजे बस्स आहे ! "

**सर०**—वाहवा ! बापुसाहेब, शाबास ! खूप बाणा राखलात ! आमची मंडळी फसतात, ती अशाच वंशच्छेदासारख्या पोकळ भीतीनें ! वंशच्छेद कसला कर्माचा ! पुनर्विवाहित स्त्रीची संतति जातिबाह्य काय म्हणून ? मनूनें अगर इतर स्मृतिकारांनीं अशा संततीचा कधीं प्रत्यक्ष अनुभव घेतला होता ? उगीच कांहीं तरी ' मनःपूतं ' शेरा

मारून ठेविला आहे झालें! पण बापुसाहेब, तुह्मी डगमगलां नाहींत, ही फार बहार झाली बुवा !

**बापु०**—मी काय म्हणून डगमगेन ? पण पुढें ऐकाल तर खरें. माझा उद्देश लोकांना कित्ता घालून देण्यापलीकडे कांहीं नाहीं, असें जेव्हां मी निक्षून सांगितलें, तेव्हां तो योगी ह्मणाला, " असा निश्चयच असल्यास तो ईश्वरास पार पाडणें भाग आहे ! " मी म्हटलें: " ईश्वरानें तेवढें करावेंच, अशी माझी मनापासून इच्छा आहे. " योगी ह्मणाला, " तुह्मांला स्वतःलाही पुनर्विवाहानें दौर्ब्राह्मण्याचा दोष लागणार. " मी म्हटलें कीं, " मी प्रायश्चित्त घेईन. " योगी ह्मणाला, " सोमयाग केल्याखेरीज दौर्ब्राह्मण्यदोषाचें क्षालन होणार नाहीं. " मी म्हटलें कीं, " सोमयागास लागणारी पैशाची रक्कम दैवयोगानें प्राप्त झाल्यास मी सोमयाग करीन. पण पुनर्विवाह करणार ! " योगी ह्मणाला कीं, " निश्चयच असेल तर ईश्वरास द्रव्य देणेंही भाग आहे. " मी म्हटलें कीं, " ठीक आहे. ईश्वरानें द्रव्य दिलें तर सोमयाग करीन. " इतकें ह्मटल्यावर त्या योग्यानें माझा हात धरून नेऊन आमच्याच वाड्यांत मला अशी एक खुणेची गोष्ट दाखविली कीं, मी तर आश्चर्यचकित होऊन त्याचे पायच धरिले. मग त्यानें माझा हात धरून मला दिवाणखान्यांत नेलें, आणि तो मला ह्मणाला, "पुनर्विवाहाचीच वधू पाहिजे असल्यास आतांच्या आतां तो मथुरावासी नंदकिशोर बॅलिस्टर आहे, त्याला मी सांगतों तसें पत्र लिही. त्याच्याकडे एक वधू आहे; ती जहागिरदारीण होण्यास अगदीं योग्य आहे."

**सर०**—बरं, बरं, बरं ! नंदकिशोर मला माहीत आहे. आणि तो आहे खरा आमच्या मंडळींपैकीं. पण त्याचेजवळ कोठली वधू ? काय गारुड आहे, तें आपल्या लक्षांत येत नाहीं बुवा !

**बापु०**—पण ऐका तर खरें पुढें. मग मी त्या योग्याच्या सांगण्याप्रमाणें पत्र लिहून तें टपालांत टाकून इकडे आलों. पुढें काय ह्मणणें आहे आपलें ? बोला.

**सर०**—बोलूंच का तर? आपणाला जी आपल्याच वाड्यांत खुणेची गोष्ट सांगितली, ती काय? सांगा पाहूं.

**बापु०**—ती तूर्त मला सांगतां येत नाहीं. त्या योग्याची मला सक्त ताकीद आहे कीं, त्याबद्दल आतांच परिस्फोट करावयाचा नाहीं. पुढें सवडीसवडीनें पाहतां येईल.

**सर०**—मला वाटतें कीं, त्यानें आपल्याला साफ फसविलें. तो भामट्या असला पाहिजे. कांहीं पैसे बियसे उपटलेन् कीं नाहीं? आपल्यासारखें कुळ मिळाल्यावर कमी काय?

**बापु०**—भलतेंच. भामट्या मला ओळखूं येणार नाहीं काय? पैशाचें तर लांबच राहिलें. पण त्या योग्यानें आमचे येथें चहा पिण्याचें सुद्धां नाकारलेन ना? त्याला विरक्ताला चहाची काय जरूर? आज पंधरा दिवस मी अन्नोदक वर्ज्य केलें आहे, असें तो ह्मणाला. भामट्या असें ह्मणेल वाटतें? उगाच एकाद्याला दोष द्यावा?

**सर०**—तुह्मी जहागिरदार चांगले शिकले सवरलेले, म्हणून तुह्मांला सपशेल मूर्ख ह्मणतां येत नाहीं, इतकेंच! बाकी त्यांत आणि तुमच्यांत मला तरी कांहीं फरक दिसत नाहीं. अहो, तुह्मी दोन तासांच्या मुलाखतींत त्या योग्याला इतके भाळलांत, ह्याला काय ह्मणावें? बरें, तेंही असो. पण त्याच्या सांगण्यावरून तावडतोब नंदकिशोराला पत्र सुद्धां लिहिलेंत अं! शाबास तुमची! नंदकिशोर आपल्या मंडळीं-तलाच आहे म्हणून बरें. दुसरा एकादा तुमच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद करता. असलीं पत्रें योग्याच्या अगर एकाद्या भामट्याच्या सांगण्यावरून का कोणी लिहीत असतात?

**बापु०**—सुभेसाहेब, आपण त्या योग्याला भामट्या ह्मणतां अं! मी तर त्याला प्रति ईश्वरच समजतों बुवा! काय त्याचें तें तेज! काय त्याचें तें मधुर भाषण! आणि नुसत्या बोलण्याला काय घेऊन करतां? पण बोलल्याप्रमाणें प्रत्यक्ष अनुभव ना! आणखी काय पाहिजे?

**सर०**—कसला प्रत्यक्ष अनुभव ? जो तुह्मांला सांगण्याची मनाई केली आहे, तोच ना ? मग आनंद !

**डॉ० पड०**—त्या योग्याला माझ्याकडे कां आणिलें नाहींत ? अगर पाठवून तरी द्यावयाचें होतें. मी ताबडतोब त्याची परीक्षा करून हा भामटा आहे का खरा योगी आहे, हें तेव्हांच ठरविलें असतें, आणि सर्टिफिकिट दिलें असतें. असल्या सर्टिफिकिटांना कांहीं विशेष फी पडत नाहीं !

**रत्न०**—मला तर वाटतें कीं, बापुसाहेबांनीं कांहीं एक गैर केलें नाहीं. आह्मांला सांगितलें नाहीं, तरी बेहेत्तर आहे. पण तुह्मांला स्वतःला तरी त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे ना, बापुसाहेब ? आपण पत्र लिहिलेंच आहे, त्याच्या उत्तराची वाट पाहूं. उत्तर आल्यावर मग काय करावयाचें त्याचा विचार करितां येईल.

**बापु०**—उत्तर कसलें आतां ! ती वधू आणि तिची चुलती येथें प्रत्यक्षच येणार आणखी आठ दहा दिवसांच्या आंत. मला योग्यानें विचारलें कीं, गांवांत मुलींच्या शाळा आहेत का ? मी म्हटलें, नाहीं. तेव्हां तो ह्मणाला, एक लौकर स्थापन करा. आणि त्या शाळेवर त्या वधूला आणि तिच्या चुलतीला मास्तरणी नेमा. एकेकीला दरमहा शंभर शंभर रुपये द्यावयाचे ठरवा. ह्मणजे त्या ताबडतोब येतील. आणि त्या आल्या, ह्मणजे त्यांस कांहीं दिवस कुशंभट गर्ग्यांच्या येथें राहूं द्या. पुढें सोईसोईनें सर्व घडून येईल.

**सर०**—कां रावसाहेब, कां डॉक्टरसाहेब, ऐकलेंत ना ? शाळेंत प्रथम मुली किती, तर दोन, नाहीं तर तीन ! त्यांना मास्तरणी किती, तर दोन ! आणि एकेकीला पगार किती ?—थोडा ! अवघा चार पंचविसा ! ! आणि त्या रहाणार कोठें ? तर त्या कुशंभटाचे उकिरड्यांत ! आतां जहागिरदार शहाणे कीं तो योगी पक्का भामट्या, तुह्मीच ठरवा. मी म्हणतों, तो योगी सात भामट्या ! बस्स ! मला वाटतें, आतां सभा बरखास्त करावी, हेंच बरें. बापुसाहेब येथें येते वेळीं कांहीं कमजास्त

करून आलेले दिसतात. आणि ह्या वादांतही कांहीं निष्पन्न न होतां त्यांचा आणि त्या योग्याचा जास्त जास्त प्रकाश मात्र दृष्टीस पडूं लागेल. आणि तें आपल्या सभेस श्रेयस्कर होणार नाहीं. तेव्हां मी म्हणतों, आतां त्या बाया येईपर्यंत तरी हा विषय लांबणीवर टाकावा.

**धोंड०**—(बापुसाहेबांस हात जोडून) माझी अशी विनंति आहे कीं, ही सभा मुलींच्या शाळेला जोडून त्या मास्तरणींच्या पगारापैकीं, मला सभेचा सेक्रेटरी ह्या नात्यानें कांहीं बढती मिळण्याची तजवीज असेल, तर कृपा करून व्हावी. अगर त्या बायांना माझ्या बंगल्यांत उतरण्याची शिफारस तरी आपण करावी. भाडें फक्त दीडशें आहे!

**सर०**—जाऊं दे रे. अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं, तों बढतीचें आणि बंगल्याच्या भाड्याचें कसलें शुष्ककाष्ठ लावीत बसला आहेस! पैसे घेऊन काय करणार रे तूं? भाजी का? का फोडणीचे वरणांत घालणार? मूर्ख बेटा! अरे, पुरुषांनीं नांवलौकिकाकरितां झटावें! आणि तुला हें चांगलें समजावें, म्हणून मी तुला सांगतों कीं, तूं जें आज महाराष्ट्र इतिहाससंशोधक मंडळीला पत्र लिहिणार आहेस, त्या पत्रांत जेथें जेथें माझ्या नांवाचा उल्लेख आहे, तेथें तेथें फुल्या देऊन अशी टीप दे कीं, " 'सरसुभे' ही पदवी रावबहादुरीपेक्षां जास्त असल्यामुळें व स्वत: सरसुभेसाहेब इभ्रतीनें, विद्वत्तेनें, वयानें व इतर सर्व गुणांनीं अधिक असल्यामुळें, त्यांनीं रावबहादुरीची पदवी मिळण्याबद्दल विशेष खटपट केली नाहीं." व नंतर जहागिरदारसाहेबांच्या पत्रावर व टीपेवर सह्या घेऊन आजच्या आज रवाना कर. मग पुढें बढतीचें अगर बंगल्याच्या भाड्याचें पहातां येईल. (सर्व सभासदांस) सभ्य गृहस्थ हो, आतां मी सभा बरखास्त करतों. (सर्व जण उठतात.)

[पडदा पडतो.]

## प्रवेश ४ था.

**( स्थळ—मथुरेंतील बाबू नंदकिशोरचा बंगला. नंदकिशोर वर्तमानपत्र वाचीत बसले आहेत. )**

( कमलादेवी प्रवेश करिते. )

**कमलादेवी**—ऐकलं का ? काका येत आहेत, म्हटलं. मी वाडींत त्यांना शिरतांना पाहिलें, आणि तशीच इकडे आलें.

**नंदकिशोर**—कोण, जगत्काका ?

**कमला०**—होय.

**नंद०**—आपण इतक्यांतच ना त्यांच्याविषयीं गोष्टी बोलत होतों ? मी इकडे येऊन वर्तमानपत्र उघडलें मात्र, तों स्वारी आपली दत्त अं ! वा, काय ह्या चैतन्याची करामत आहे हो ?

( जगत्काका योगी प्रवेश करितात. नंदकिशोर त्यांना साष्टांग नमस्कार घालतो व कमलादेवी ओणव्यानें नमस्कार करिते. )

( काकांस बसण्यास सांगतात. व काका बसतात. )

**जगत्काका**—( नंदकिशोरास उद्देशून ) कां साहेब, ठीक चाललें आहे ना ? ( कमलादेवीस ) कां देवी, आनंदांत आहेस ना ?

**नंद०**—आम्ही दोघेंही आपल्या आशीर्वादानें आनंदांत होतोंच, व बभ्रूताई आल्यापासून तर परमानंदांत आहोंत. पण काका, सांगा पाहूं, आपल्या मनांत माझ्याकडे येण्याचें केव्हां आलें ? ( कमलादेवीस ) तूं जाऊन बभ्रूताईला काका आल्याचें कळव. (जाते.)

**जगत्काका**—केव्हां ह्मणजे ? बभ्री तुझ्याकडे पाठविल्यापासून मी तुझ्याकडेसच येण्याला निघालों आहें. नाहीं म्हणावयाला मध्यंतरीं त्या अनघपुरच्या जहागिरदारास मात्र भेटावयास गेलों होतों. पण तें किती, चार घटका हो ! आपले सध्यांचे दोन तास , नाहीं तर तीन तास, इतकेंच !

**नंद०**—असो. आपण मागें आलां होतां, त्या वेळेस मला चैतन्याबद्दल जें विवरण करून सांगितलेंत, त्याच्याशीं आपल्या

आतांच्या येण्याचा संबंध कसा जुळतो, तो मला स्पष्ट करून सांगा पाहूं. आपण त्या वेळेस कोणत्याशा दक्षिणी साधूची एक ओंवी म्हणून त्यावर प्रवचन केलें होतेंत, व असें सिद्ध केलें होतेंत कीं, सर्वत्र चैतन्य भरलें असल्यामुळें एकाच्या मनांत दुसऱ्याविषयीं कांहीं गोष्ट आली, तर त्याची जाणीव त्या दुसऱ्याला तात्काल झालीच पाहिजे.

**जगत्काका**—तूं काय म्हणतोस, तें अजून माझ्या पुरें लक्षांत आलें नाहीं. मी म्हटलेली ओंवी तूं टिपून ठेविली आहेस का ?

**नंद०**—हो, ती माझ्या नोटबुकांत मी टिपलेली आहे. (नोट-बुक काढून) ही पहा ती ओंवी, काका. (वाचतो.) "जो सर्वां भूतांचे ठाईं।"

**जगत्काका**—अस्सं ! आतां माझ्या आलें लक्षांत तुझें काय ह्मणणें आहे तें. आणि ती ओंवीही माझे लक्षांत आली. पहा आपलें टिपण, मी ओंवी म्हणतों. "जो सर्वां भूतांचे ठाईं। द्वेषातें नेणेची कांईं। आपपर जया नाहीं। चैतन्य जैसें ॥" हीच ओंवी ना ?

**नंद०**—होय, हीच.

**जगत्काका**—अरे, ही भगवान् ज्ञानेश्वराची ओंवी बरं. ज्ञानेश्वर ह्मणजे साक्षात् विष्णुच तो. भगवान् विष्णूच्याच मुखांतली ओंवी ही. हा वेदांतवृक्षाचा गाभा आहे बरें ! चार चरण ह्मणजे प्रत्यक्ष चार वेदच हे. आणि मजा ही कीं, चार निरनिराळे चरण असून प्रत्येकाचा अर्थ एकच ! फार बहार केलीस तूं, हा विषय आतां काढलास ! ह्याचा तुला अर्थ का पाहिजे आहे ?

**नंद०**—अर्थ नको, काका. तो मला समजला आहे. आतां मी विचारतों तेवढें सांगा. ह्या ओंवीप्रमाणें सर्वत्र चैतन्य—ह्मणजे जाणीव—भरली आहे ना ? ह्मणजे तुम्ही बसलां आहांत, आणि मी बसलों आहें, ह्यांच्यामध्येंही सर्व चैतन्य—ह्मणजे जाणीवच—आहे ना ?

**जगत्काका**—होय, तूं म्हणतोस तसेंच आहे.

**नंद०**--मग माझ्या मनांत आपल्याबद्दलचा विचार, अगर जाणीव, आपण येथें येण्यापूर्वीं फार झालें तर दहा मिनिटेंच आली असेल. आणि आपण तर ह्मणतां, बभ्रूताईस पाठविल्या दिवसापासून आपण माझ्याकडेच येण्याला निघालां आहांत. ह्मणजे तेव्हांपासून आपल्या मनांत माझी जाणीव उद्भवलेली आहे. तर ह्याचा मेळ कसा घालावयाचा? चैतन्य तर आपल्या ह्मणण्याप्रमाणें सर्वकाल अबाधित आहे.

**जगत्काका**--ठीक विचारलेंस. तुला मेळ घालून दाखवितों. पण तसें करण्यापूर्वीं तुला दोन दृष्टांत देतों. ते समजले, ह्मणजे तुझें तुलाच कसा मेळ पडतो, हेंही समजेल. हल्लीं बिन तारेनें बातमी पोहोंचविण्याचीं यंत्रें निघालीं आहेत, हें तुला माहीत आहे ना?

**नंद०**—हो, माहीत आहे.

**जगत्काका**—तीं–ह्मणजे ज्यांतून बातमी द्यावयाची तें, आणि ज्यांतून बातमी घ्यावयाची तें, अशीं दोन–निरनिराळ्या ठिकाणीं असतात ना?

**नंद०**--होय.

**जगत्काका**—दोहींमध्यें अबाधित चैतन्य असतें ना!

**नंद०**--होय.

**जगत्काका**--तीं दोन्ही यंत्रें यथायोग्य स्थितींत असलीं, ह्मणजे आपापलीं कामें बरोबर करतात ना?

**नंद०**--होय, असा प्रत्यक्ष अनुभवच आहे.

**जगत्काका**--मी तेंच म्हणतों. पण ह्या दोन यंत्रांपैकीं एक नादुरुस्त असलें, अगर तें ज्या स्थितींत असणें जरूर आहे, त्या स्थितींत अंतर पडलें, तर बातमी देण्याचें अगर घेण्याचें काम तें करील का?

**नंद०**--मग कसें करील? तें योग्य स्थितींत असलें, तरच काम करील.

**जगत्काका**--ठीक आहे. पण दोन्हींमधल्या चैतन्यास कांहीं बाध आला का? तुझ्या मतानें तें आहे तसें अबाधित आहे ना?

**नंद०**—होय.

**जगत्काका**—आतां हा दृष्टांत आपल्या दोघांस कसा लागतो, तें पाहूं. आपल्या दोघांमध्यें, मग आपण कोठेंही असों, चैतन्य अबाधित आहे ना?

**नंद०**—होय.

**जगत्काका**—पण आपली दोघांची स्थिति त्या यंत्रासारखी कायम ह्मणतां येईल का? तूं किती उपद्व्याप मध्यंतरीं केले असशील! आणि मीही किती तरी व्यवसाय केले असतील! ह्यांचा कांहीं तरी थांग लागेल काय? आणि ह्याप्रमाणें आपण गुंतलों असतां, आपण जाणीव देण्याघेण्याच्या स्थितींतच होतों, असें ह्मणतां येईल का?

**नंद०**—खरें म्हटलें, तर तसें ह्मणतां येणार नाहीं. आपलें लक्ष—आपलें अनुसंधान—तर अवश्य पाहिजे. आणि तें आपल्या इतर व्यवसायांमुळें सतत असणें शक्य नाहीं.

**जगत्काका**—आपल्यासारख्यांच्या बाबतींत तूं म्हणतोस तसेंच खरें. एका जगचालकावांचून असें अनुसंधान रहाणें शक्यच नाहीं. त्याला मात्र वाटेल त्या व्यवसायांत असूनही, ही जाणीव—हें ज्ञान—कायम राखतां येईल. आपल्यासारख्याला इतर व्यवसाय बाजूसच ठेवावे लागतात. ह्याची प्रचिति तुला आतांच दाखवितों. बब्रूताई अजून कां बरें येत नाहीं? तिला बोलाव पाहूं.

**नंद०**—होय, बोलावतों. (बोलवावयास उठतो.)

**जगत्काका**—तूं उठूं नकोस, खालीं बैस. आपण पाहूं तर, खरें, ती केव्हां येते ती, कशी येते ती.

**नंद०**—पण तिला सूचना तर केली पाहिजे. एरव्हीं तिला कसें समजणार?

**जगत्काका**—पण क्षणभर दम का धरीनास. पाहूं तर खरें कीं तिला बाह्य सूचना लागते, कीं ती तशीच येते ते.

**नंद०**—तुमची मर्जी. नाहीं तर मी येथूनच तिला हांक मारतों.

**जगत्काका**—तूं स्वस्थ बैस. आणि पहा तर खरें, काय होतें तें.
( गळ्यांत रुद्राक्षांची माळ घातलेली, हातांत दर्भांची जुडी घेतलेली, व शुभ्र वस्त्र परिधान केलेली बभ्री प्रवेश करिते, आणि काकांच्या व नंतर नंदकिशोराच्या चरणांवर मस्तक ठेविते. )

**नंद०**—( बभ्रीस ) ती नाहीं का आली ?

**बभ्री**—त्याही आलेंच ह्मणाल्या.

**जगत्काका**—कां ताई, बरी आहेस ना ? तुझे नेमधर्म सुरळीत चालले आहेत ना ? येथें तुला सर्व गोष्टींची अनुकूलता आहे ना ?

**ब०**—महाराज, मी आपल्या आईबापांच्याच घरीं आहें. ( नंदकिशोराकडे बोट दाखवून ) हे माझे वडील—( कमलादेवी प्रवेश करिते, तिच्याकडे बोट दाखवून ) आणि ही माझी मातोश्री. मला येथें आपल्या आशीर्वादानें कांहीं एक कमी नाहीं.

**नंद०**—ताई, आतां काकांची जेवणाबद्दल—

**जगत्काका**—दम धर. मला तुझ्या त्या जाणिवीच्या प्रश्नाचें निराकरण करूं दे. ( बभ्रीस ) काय ग ताई, तुला आतां येथें कोणी बोलावलें ?

**ब०**—मघांशीं मातोश्री काकी आल्या होत्या, त्यांनीं मला आपण आल्याचें कळविलें. पण माझी नुकतीच माळ सुरू झाली होती, म्हणून मी तावडतोब आलें नाहीं. माळ संपल्यावर मी येणार होतें; पण मला मातोश्री ह्मणाल्या कीं, तूं आपला जप पुरा कर, मग जाऊं. सध्यां ते बोलत बसले आहेत. इतक्यांत जाऊन काय करावयाचें आहे ? मग मी फिरून जप सुरू केला. शेवटीं माळ अर्धी अधिक होते आहे, तों मला असें वाटलें कीं, आपण माझी अगदीं वाट बघत बसलां आहांत. मग मी सुरू असलेली माळ पुरी केली, आणि लगेच इकडे आलें.

**जगत्काका**—कां साहेब ! ताईला मी बोलाविण्याचें मनांत आणलें ती वेळ, आणि तिला मी तिची वाट पहातों आहें, अशी

जाणीव झाली ती वेळ, बरोबर जुळते, असें तुला वाटतें का ?

**नंद०**—अगदीं बरोबर जुळलें, काका.

**जगत्काका**—मग आतां त्याबद्दल विशेष चर्चा करण्याची अवश्यकता तुला वाटते का ?

**नंद०**—नाहीं. पण आपण दोन दृष्टांत देणार होतां. पैकीं एक सांगितलात. दुसरा कोणता ?

**जगत्काका**—अरे, दुसरा एकचसा काय, पण शेंकडों दृष्टांत देतां येतील. तूं आपलीं भारतरामायणादि पुराणें वाचीत असतोस ना ? मग भगवान् व्यासांचें अथवा देवर्षि नारदाचें जेथें जेथें आगमन झाल्याचें लिहिलें आहे, तेथें तेथें ते कोणाच्या पत्रावरून अगर कोणाच्या बोलावण्यावरून आलेले आहेत ? त्यांना जाणीव होण्याला ह्या चैतन्याशिवाय दुसरें काय साधन होतें ? भगवान् गोपाळ कृष्णाला–त्या आपल्या आवडत्या बहिणीला ते दुष्ट कौरव राजसभेंत नेऊन तिची विटंबना करणार आहेत–ही जाणीव कशी झाली, तुला वाटतें ? का तूं हीं पुराणें ह्मणजे उकिरडा समजतोस ?

**नंद०**—काका, क्षमा करा. माझ्याकडून आपण ह्मणतां तसे प्रमाद ह्यापूर्वीं घडले असतील. पण बभ्रूताईच्या सहवासानें–मी म्हणतों आपल्याच कृपेनें–माझ्या सर्व मनोवृत्ति पालटल्या आहेत. आतां मी पूर्वींचा नंदकिशोर राहिलों नाहीं.

**जगत्काका**—हें सर्व बभ्रूताईच्या सहवासाचें फळ बरें ! तिच्यांत गुरुभक्ति पूर्ण बाणली आहे. ती आतां करूं शकणार नाहीं, असें कांहींही नाहीं.

**नंद०**—बभ्रूताईचा सहवास तर खराच. पण मूळ आपली कृपा, काका. आमच्या हिला विचारा तर खरें कीं, बभ्रूताईची आणि यमुना मातेची भेट होऊन पाण्याबद्दल काय चमत्कार झाला तो ! आमच्या कुव्याचें पाणी आतां गोडें झालें आहे, काका ! पूर्वींसारखें खारें नाहीं. आपण प्रत्यक्ष पहावें पाहिजे असल्यास.

**जगत्काका**--असेल, मी नाहीं म्हणत नाहीं. पण तेवढ्या-करितां यमुना मातेच्या भेटीचें काय प्रयोजन, तें मला समजत नाहीं. धरणीकंपाच्या लहानशा धक्क्यानें अगर वातावरणाच्या सहज फेर-फारानें खाऱ्याचें गोडें पाणी झालेलें तूं ऐकलें नाहींस का? कित्येक औषधींच्या योगानें अगर रसायनशास्त्रप्रयोगानें सुद्धां असा चमत्कार होतो.

**कमलादेवी**—इश्श. तुमचें आपलें कांहीं तरीच! मी प्रत्यक्ष यमुना आमचे घरीं आलेली पाहिली आहे. आणि तिचें व बभ्रूताईचें भाषणही ऐकलें आहे. पुढें काय आपलें ह्मणणें आहे?

**जगत्काका**—अग देवी, ती यमुना कसली घेऊन बसली आहेस! ती कोणी तरी भूगर्भशास्त्रज्ञ, अथवा वातावरणशास्त्रज्ञ, अगर रसायनशास्त्रज्ञ यमुना नांवाची विदुषी असेल, झालें! तूं भोळी! फस-लीस दुसरें काय?

**कमला०**--मी तुमचें साफ ऐकणार नाहीं. यमुनेचें तेज कोणीकडे! मला समजत नाहीं वाटतें? कोठली विदुषी घेऊन बस-लांत उगीच!

**जगत्काका**--बरें बुवा, आह्मांला काय? तुमची खात्री झाली आहे ना? पुरे! मीही होय म्हणतों; मग झालें कीं नाहीं?

**नंद०**--काका, असला लपंडाव आमच्याशीं आपण आतां किती दिवस करणार? आपण असें करूं लागलांत, तर आम्ही असल्या गोष्टींची शहानिशा कोठें करावी?

**जगत्काका**--असल्या गोष्टींची शहानिशा करीत बसण्याचें कारणच नाहीं. बुद्धिदाता परमेश्वर आहे. त्यानें बुद्धि दिली कीं, ती बुद्धिच आपल्या मनाची खात्री करते. असो. तुह्मां तिघांनाही तो परमेश्वर बुद्धि व ज्ञान देईलच. मला सांगावयाचें तें इतकेंच कीं, आपल्याला आतां अनघपुरास जाऊन जीं कांहीं व्यावहारिक कार्यें करावयाचीं आहेत, त्यांत आपलें सर्वांचें वर्तन भगवान् वसिष्ठांनीं सच्चिद्घन रामचंद्राला सांगितल्याप्रमाणें असावें. वसिष्ठ रामचंद्राला

म्हणाले कीं, रामा तुला अवतारकृत्यें केलींच पाहिजेत. तीं करतांना " अंतस्त्यागी बहि:संगी लोके विहर राघव । अंत:शीतलतायां तु लब्धायां शीतलं जगत् ॥" समर्थ रामदासांनींही प्राकृत जनांस तोच उपदेश केला आहे. समर्थ म्हणतात, " प्रकृतीसारखें चालावें । परि अंतरीं शाश्वत ओळखावें । सत्य होऊनी वर्तावें । लोकांसारिखें ॥" हा उपदेश अंत:करणांत वागवून चाला, ह्मणजे झालें.

**नंद०**—त्याची आपण अगदीं काळजी करूं नका. अनघपुरांतील आपलीं कार्यें झालींच म्हणून समजा.

**जगत्काका**—उत्तम ! तुझें हेंच आश्वासन मला पाहिजे होतें. आतां कमलादेवीला आणि बभ्रीला अनघपुरास पाठवून दे कसें. उद्यांच जाऊं देत त्यांना ? त्यांनीं तेथें कुशंभट गर्ग्यांच्या येथें रहावें. मी तेथें गेल्यावर जें करावयाचें तें करीन. तूंही तेथें लौकरच ये.

**नंद०**—माझीं कोर्टांत दोन तीन जरूरीचीं कामें आहेत. तीं झाल्याबरोबर मी अनघपुरास येतों. आपण कधीं जाणार ?

**जगत्काका**—मला एक महिनाभर लागेल. मी गोकुळ-वृंदावन करून विश्वेश्वराचें दर्शन घेऊन मग जाणार आहें.

**नंद०**—ठीक आहे. आतां एवढेंच मागणें आहे कीं, बभ्रूताईस भोजन करण्याची आज्ञा व्हावी. एवढ्या वयांत दररोज उपास कसे होणार ?

**जगत्काका**—तिचें माझें तें पूर्वींच ठरलें आहे. तिनें आजपासून उपास करण्याचें कारण नाहीं. जप होत आहे, तेवढा पुरे आहे. चला उठा, आपण सर्वच बभ्रूताईला पंक्तीस घेऊन तिच्या उपासाचें उद्यापन करूं.

( सर्व उठतात. )

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**( स्थळ—अनघपुर. कुशंभटाचें घर. कमलादेवी आरामखुर्चीवर वाचीत, व बभ्री खुर्चीवर बसून टेबलावर लिहीत बसली आहे. आरसे वगैरे लाविले आहेत अशी खोली. )**

**कमलादेवी**—काय ग ताई, आपल्याला येथें येऊन तीन आठवडे होत आले, नाहीं का?

**बभ्री**—तीन आठवडे कां? जवळ जवळ महिना होत आला. जहागिरदारांना आजारी पडल्यालाच आज विसावा किंवा एकविसावा दिवस असेल. त्याच्या अगोदर सात आठ दिवस नाहीं का आपण येथें आलों?

**कमला०**—खरंच, कसं आहे ग त्या जहागिरदारांचं? काल तुला डॉक्टर पडघम कायसें सांगत होते ना त्यांच्या प्रकृतीबद्दल?

**ब०**—होय. डॉक्टर काय करतो बिचारा! तो म्हणत होता कीं, ह्या आपल्या जुन्या मताच्या मंडळींच्या विचारापुढें कांहीं जाववत नाहीं. दुसरं काय?

**कमला०**—जहागिरदार कांहीं जुन्या मताचे नाहींत. आपण येथें आलों नी त्यांना भेटलों, तेव्हां आपण पाहिलें नाहीं का? त्यांचे विचार किती मार्मिक, खुबीदार, पोक्तपणाचे व दूरदर्शी असून भाषण कसं ऐटदार होतं तें.

**ब०**—स्वतः जहागिरदार आपण ह्मणतां तसेच आहेत. पण हल्लींच्या त्यांच्या स्थितींत त्यांना कोण विचारणार? आणि जरी ते मोठे शहाणे असले, तरी सध्यांच्या स्थितींत त्यांना इकडचें तिकडे मुद्धां हालवत नाहीं. ते काय करणार! त्यांचा कारभारी तो दुर्जनराय

करील ती पूर्वदिशा ! तो सांगेल तसें चालावयाचं. जहागिरदारांची फार शोचनीय स्थिति आहे, असें एकंदरींत काल डॉक्टर पडघमचे बोलण्यांत आलें. ते आणखी असेंही म्हणाले कीं, मी ही केस बरीच ताळ्यावर आणिली होती. पण त्या दुर्जनरायाचा कोणा धुंडिराज वैद्यावर भरंवसा असल्यामुळें आपल्यास त्यांत कांहीं विशेष पडतां येत नाहीं.

( सरसुभे व धोंडभट प्रवेश करतात. कमलादेवी व बभ्री उठून, या बसा ह्मणतात, व त्यांना खुर्चीवर बसवितात. आणि कमलादेवी आरामखुर्चीवरून उठून साध्या खुर्चीवर बसते. )

**कमला०**—कोणीकडून येणें झालें ?

**धोंड०**—मी येथेंच असतों. भटजी आहेत का घरांत ?

**कमला०**—होय, जप करीत असतील.

**धोंड०**—आणि काकू ?

**कमला०**—त्याही घरांत आज कांहीं पुरणावरणाचा स्वयंपाक आहे वाटतें, त्यांत गुंतल्या आहेत.

**धोंड०**—त्यांचा मुलगा आहे का घरांत ?

**कमला०**—असेल. आतांच तो शाळेंतून परत आला, आणि आंत गेला आहे, वाटतं.

**धोंड०**—कोण ? कुशंभटजींचा मुलगा ? सन्मुखराम ?

**कमला०**—होय, सन्मुखरामच. आतां इतक्यांत शाळेंतून येऊन घरांत गेला आहे, असें मला वाटतं.

**धोंड०**—सन्मुखराम ! शाळेंत काय आहे त्याचें ? तो नाक्यावर होता ना ?

**कमला०**—होय, पण नाक्यावर त्याला आठ मिळत होते, तेवढ्यांत कुशंभट बाबांचें काय होणार ? म्हणून मीच त्याला आमचे शाळेंत विसावर तूर्त हंगामी ठेविला आहे.

**धोंड०**—आपण मुख्य मास्तरीणबाई आहां वाटतें ?

**कमला०**—होय, आणि ह्या बभ्रूताई माझे हाताखालीं आहेत.

**धोंड०**—येथील शाळेच्या मानानें आपणास पगार असेल, तो पुरत नसेल बहुतकरून ?

**कमला०**— हो, कांहीं अंशीं तसेंच खरें. मला फक्त शंभर रुपये, आणि ह्यांना (बभ्रीकडे वळून) पन्नास ! तेवढ्यांत आमचा निर्वाह कसा होणार ? पण तूर्त आमची पगारावरच भिस्त नाहीं.

**धोंड०**—तें खरेंच. पण आह्मांला आपलें आमच्या भिकार समजुतीनें वाटतें कीं, जहागिरदारांचें उत्पन्न पहातां व शाळेची स्थिति मनांत आणतां, हा पगाराचा व इतर खर्च फार जबर आहे.

**सर०**—अरे, तूं वेडा तर नाहींस धोंडभटजी ! ह्यांच्या-सारख्यांचा पगार जहागिरदारांचें उत्पन्न अगर शाळेची स्थिति मनांत आणून का ठरविला आहे म्हणतोस ? ह्यांच्या कुलशीलावर, ह्यांच्या विद्वत्तेवर, ह्यांच्या सदाचरणावर तो ठरलेला आहे. शिवाय अंतःस्थ हेतु काय आहे, तुला माहीत नाहीं का ? बाईसाहेब आतांच ह्मणाल्या नाहींत का, आमची पगारावरच भिस्त नाहीं म्हणून ?

**धोंड०**—तें मला माहीत आहे. म्हणूनच मी म्हणतों, जहा-गिरदारांच्या सध्यांचे स्थितींत तो हेतु कसा साधणार ? आणि जहा-गिरदार बरे होऊन हिंडूं फिरूं लागेपर्यंत ह्यांनीं येथें राहून दिवस काढण्यापेक्षां माझ्या बंगल्यांत रहावयास जाणें बरें नाहीं का ?

**सर०**—अस्सं ! तुझें तसें ह्मणणें असेल, तर बाईसाहेब विचार करतील. पण तुझे बंगल्याचें भाडें द्यावें लागणार, तें कोणी द्यावें ? ह्यांचा पगारच जर ह्यांना पुरत नाहीं, तर भाड्याचा खर्च त्या काय म्हणून अंगावर घेतील ?

**धोंड०**—भाडें तें असें किती आहे ? एकशें पंचवीस दिले, तरी माझी हरकत नाहीं. व ही रक्कम वजा जातां त्यांना पंचवीस रुपये रहाणार आहेतच. कदाचित् जास्त रक्कम खर्चास लागली, तर

ती जहागिरदारांनीं कां देऊं नये? असें झालें, तर यांची रहाण्याची उत्तम सोय झाल्यानें आपणा सर्वांस विशेष संतोष नाहीं का होणार?

**कमला०**—आपण ह्मणतां, तें अगदीं रास्त आहे. पण आम्ही बायका माणसें! आह्मांला स्वतंत्र रीतीनें कसें रहातां येईल बरं? येथें बाबांची व काकूंची सोबत आहे. आम्ही जशा कांहीं आमच्याच घरांत आहोंत, असं आह्मांला वाटतं. शिवाय तिकडचं येणं झाल्याशिवाय आह्मांला कांहींच करतां यावयाचं नाहीं.

**धोंड०**—माझें ह्मणणें, आपण आतांच रहावयाला आलें पाहिजे, असें नाहीं. बंगला आपण कायम केलात, ह्मणजे झालें. ह्मणजे दुसऱ्यास साफ नाहीं ह्मणतां येईल. आपण आपल्या सोईस येईल, तेव्हां भाडें द्या. मग झालें कीं नाहीं?

**सर०**—मला वाटतें, हें धोंडभटाचें ह्मणणें ठीक आहे. आपण त्यांच्या भाड्याची तारीख आजपासून सुरू करा. मग आपण आपल्या सोईप्रमाणें रहावयास जा, अगर नका जाऊं. कां धोंडभट असेंच ना?

**धोंड०**—असेंच. पण मी आणखी हेंही म्हणतों कीं, ह्यांची पुरुष मंडळी आली कीं, ह्यांनीं तिकडे रहावयासही जावेंच. भाड्याबद्दलही आजचीच तारीख सुरू करावी, असा माझा आग्रह नाहीं. उद्यांची का असेना. ह्यांनीं होय ह्मणावें, ह्मणजे झालें. ह्यांनीं होय म्हटलें कीं, मी बंगल्याची झाडझूड करावयाला लागतों.

(जहागिरदारांचा चपराशी—नाम्या प्रवेश करितो.)

**नाम्या**—(धोंडभटास) धोंडभट, तुम्ही येथें आहांत का? मी तुमच्याकरितां समदा गांव धुंडला ना? बसलांत काय! वाड्यांत तुमची ते दिवाणजी वाट पहात आहेत. जहागिरदार अक्षी गडबडले आहेत. घटका दोन घटकेचे सोबती. (निघून जावयास लागतो.)

**धोंड०**—अरे नाम्या, इतक्यांत जास्ती काय झालें रे! दोन तासांचे अगोदर तब्येत ठीक होती?

**नाम्या**--( जातांना ) मला फुरसत नाहीं पघा. दुसरीकडे जायचें आहे. तुम्ही आटपा वेगी वेगी.

**धोंड०**—( सरसुभ्यांस ) आपल्याला गेलेंच पाहिजे.

**सर०**--मीही येतों, चल.

( दोघे उठून बभ्रीचा व कमलादेवीचा निरोप घेऊन जातात. )

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश २ रा.

**[ स्थळ—अनघपुर. जहागिरदारांचा वाडा-जहागिरदार बापुसाहेब अत्यवस्थ होऊन आपले खोलींत पडले आहेत. बाहेर सरसुभे, रत्नपारखी, रावबहादुर डमरु, धोंडभट, व बटवी खांद्यावर टाकलेले धुंडिराज वैद्य बसले आहेत. ज्योतिर्भूषण जोशी पाटीपंचांग घेऊन आंकडे मोडीत बसले आहेत. व दिवाण दुर्जनराय इकडून तिकडे फिरत आहेत. ]**

**धुंडिराज**--( दिवाणास ) काय हो, मघांशीं मी एक मात्रा मधांत उगाळून देण्यास सांगितली होती, ती तुम्ही दिलीत का ? मात्रा हजार वर्षांची जुनी असून हटकून गुण देणारी आहे, अशी माझी खात्री आहे. आणि आपण तर अगदीं निराश दिसतां. ह्याचें इंगित मला कळत नाहीं, म्हणून विचारतों.

**दिवाण**--मात्रा आपण सांगितल्याप्रमाणें चाटविली. शिवाय आल्याचा रसही थोडा चाटविला. पण घरघर कमी झाली नाहीं, म्हणून डॉक्टर पडघमसाहेबांस बोलावून आणिलें. त्यांनीं सांगितलें कीं, आतां मात्रा घशाखालीं उतरण्याची वेळ राहिली नाहीं. अशा औषधानें रोग्यास शीण मात्र होईल.

**धुंडि०**--पण ते कांहीं बोलले नाहींत का ?

**दिवाण**—ते इतकेंच म्हणालें कीं, पंधरा आणे अकरा पै त्यांचा प्राण निघून गेला आहे. तो अगोदर मला पूर्ण प्रमाणांत

आणिला पाहिजे. असें ह्मणून चटकन एक कुपी काढून त्यांनीं जहागिरदारसाहेबांचे नाकास लाविली. आणि एकदम बंद करून खिशांत घालून चालते झाले.

**धुंडि०**--पण कुपींत काय होतें ? कसल्या रंगाचें औषध होतें ? तें तुह्मी पाहिलें नाहीं का ?

**दिवाण**--मला तर कुपी अगदीं रिकामी दिसली बुवा !

**धुंडि०**--मग झालें काम आपलें ! मी दिलें तेंच औषध त्यांनीं दिलें. आमचे मात्रेंत व मद्यांत तेंच द्रव्य मुख्य आहे. मात्रा मद्यांत असल्याकारणानें ती घोटण्यासारखी नाहीं, असें डॉक्टरनें पाहूनच तें नाकाच्या द्वारें दिलें असलें पाहिजे. दुसरें काय ? एकंदरींत त्यांचें आणि माझें तत्त्व एकच ! जातात कोठें दुसरीकडे ? इतक्या स्थितीस जहागिरदार येऊन ठेपले आहेत, असें दिवाणांनीं मला सांगितलें असतें, तर मीही नाकाच्या द्वारें देण्याचें औषध दिलें असतें. माझ्याजवळही तें आहेच.

**धोंड०**--मग तुम्ही द्यावयाचें होतें कीं नाहीं तें नाकाचें औषध ?

**धुंडि०**—वा ! मला दिवाणजींनीं साफ सांगितलें कीं, आतां जहागिरदारांना हात सुद्धां लावूं नका. दुरून काय करावयाचें असेल, तें करा. मग मी काय करूं ? त्यांच्याच हातानें मात्रा देवविली, आणि निघून गेलों.

**दिवाण**--तें खरेंच. अहो, हे वैद्यराज आले, त्या वेळेस जहागिरदारांची इतकी मोठ्यानें घरघर चालली होती कीं, मला कांहीं एक सुचेना. मग ह्यांना म्हटलें, आतां कशाचें औषध ! गंगा घातली आहे तोंडांत, तेवढी बस्स आहे.

**धोंड०**--मग तुम्ही डॉक्टरसाहेबांस हात लावूं दिलात तो ?

**दिवाण**—अहो, त्यांना तरी कोणी हात लावूं दिला ? आणि त्यांनीं कोठें मला विचारलें ? आल्याबरोबर मद्याशीं सांगितल्याप्रमाणें प्राणाचें प्रमाण कमी झाल्याचें बोलले न बोलले, तोंच कुपी काढून

जहागिरदारांचे नाकास लावून दिली. आणि मी कुठे बोलतों न बोलतों, तोंच त्यांनीं कुपी बंद करून खिशांत घालून टोपी डोक्यावर ठेवून बाहेर जाऊन गाडींत बसले सुद्धां !

**धुंडि०**—खूप तडफ आहे बुवा. पण तडफच बरें का. बाकी तथ्यांशाचे नांवानें भोपळ्याएवढेंच !

**दिवाण**—आह्मांला तें काय कळणार ? कोणी उपाय सांगितला, तर तो करावयाचा, एवढें आह्मांस माहीत आहे.

**धुंडि०**—बरें, पण आपण खोलींत जाऊन पहा बरें. कांहीं उतरती कमान आहे किंवा कसें. ( दिवाण खोलींत जातात. )

**धोंड०**--आपणास कसें वाटतें, वैद्यराज ? आपण औषध दिलेंत, त्या वेळेस कांहीं अनुमान झालें असेलच कीं नाहीं ?

**धुंडि०**—सगळें झालें ! अनुमान झालें ! निर्णयही मी करून ठेविलाच आहे ! आज ज्वरास एकविसावा दिवस आहे, हेंही सर्वांस माहीतच आहे ! आणि झालें म्हटलें तर थोड्याच वेळांत प्रत्यक्ष अनुभवही येईलच. मग उगीच वाटाघाट कशाला पाहिजे ?

( दिवाण प्रवेश करितात. )

**धोंड०**--कां कसें काय ?

**दिवाण**—आटपला बाजार ! मला वाटतें, आतां उगीच उशीर लावूं नका. पुढल्या तजविजीला लागा कसे ! ( जोशीबुवा पंचांग व स्लेटपाटी घेऊन उठून जाऊं लागतात. )

**धोंड०**--अहो जोशीबुवा, जातां कोठें ? आंकडे मोडणें झालें का ? काय स्लेटीवर चटचट चालविली होतीन हो इतका वेळ ? जसा कांहीं आपल्या खोलींतच पत्रिका वर्तवीत बसला होता !

**जोशीबुवा**—जात नाहीं, आलोंच. हें पागोटें कोरें आहे, व करवतीकांठी धोतर जुनें आहे. उगीच धुवावें लागेल, म्हणून पंचा नेसून हा आलोंच. ( जातो. )

**सर०**—भलतेंच एकादें. असे प्रसंग आपण ह्यापूर्वी पाहिले नाहींत काय ? मग उगीच उतावीळ करण्यांत काय हांशील आहे ? इतक्यांत तयारीस लागूं नका. कोणी तरी जाऊन डॉक्टर पडघमसाहेबांस अगोदर बोलावून आणा. आणि त्यांचें सर्टिफिकिट घ्या. नाहीं तर पुढल्या विधीस अडचण येईल बरें ! उठा, जा कोणी तरी, अगर दिवाणजी तुम्हींच चिठ्ठी लिहून एक चपराशी का पाठवाना ? जा लौकर. ( दिवाण जातात. )

( जगत्काका प्रवेश करितात. )

**धोंड०**—हा कोठला थेरडा येथें याच वेळेस आला आहे, कोण जाणें. द्या हांकलून मूर्खाला ! म्हणावें, भिक्षा संपली. आणि पांथस्थाचीही येथें ह्या वेळेस सोय होणार नाहीं.

**जगत्काका**—महाराज, बापुसाहेब जहागिरदार आहेत का आंत ? मी जाऊं का ? मला भेटतील का ?

**धोंड०**—ते नुकतेच यमाजी भास्करांकडे गेले आहेत. जातांना सांगून गेले आहेत कीं, जर कोणी मला भेटावयास आला, तर त्याला तिकडेच पाठवा ! जावयाचें असेल, तर जा तिकडे. आणि मी म्हणतों कीं, इतक्यांतच जा, ह्मणजे गांठ पडेल !

**जगत्काका**—यमाजी भास्कर कोठें रहातात बरें ? त्यांचें अडनांव काय ? निदान कोणत्या मोहल्यांत रहातात, हें कृपा करून सांगाल, तर जातों बापडा, मला काय ?

**धोंड०**—तें कांहीं एक आह्मांस माहीत नाहीं. त्यांची आणि जहागिरदारांची नुकतीच ओळख पडलेली असल्यामुळें त्यांचा पत्ता वगैरे कांहीं एक आह्मांस ठाऊक नाहीं. टपाल ऑफिसांत तपास करा ! निघा !

**रत्न०**—अहो भटजी, असें काय त्या बिचाऱ्याला सांगतां बरें ? तो बिचारा भेटीकरितां आला आहे. तर कोण, कुठला, कांहीं तपास तरी करा. आणि मग काय आहे तें खरें सांगा. उगीच त्याला भटकावयास कां लावितां ?

**दिवाण**—( जगत्काकास ) महाराज, आपण कोण? कोठून आलांत? जहागिरदारांस ओळखितां काय? त्यांचेकडे कांहीं पैशा-बियशाचें काम आहे काय?

**जगत्काका**—जहागिरदारांना ओळखितों ह्मणजे? मी त्यांचा प्रत्यक्ष चुलता लागतों, सख्खा चुलता बरें! लांबचा नाहीं. जहागिर-दारांचा बाप तो माझा सख्खा वडील बंधु बरें! मी लहानपणींच घरां-तून निघून गेलों, त्यामुळें येथें विशेष कोणाची ओळख नाहीं. पण मी इकडील बातमी ठेवीत असें. जहागिरदारांचे आश्रितांपैकीं कुशंभट गर्गे ह्यांना मात्र मी एक वेळ भेटल्याचें स्मरतें. ते तरी गांवांत आहेत का? का गेले देशांतराला?

**धोंड०**—हो, हो, ते आहेत गांवांत खरेच. जा त्यांचेकडे. ते मसनवट्याच्या वाटेवर जहागिरदारांची पडकी बखळ आहे, ती तुह्मांस माहिती असेलच, तेथें रहातात.

**जगत्काका**—जहागिरदारांची पडकी बखळ? त्या बाजूला जहागिरदारांची वेदपाठशाळा होती, ती पडली वाटतें? पण मला तिकडे जाण्याचें कारण नाहीं. कुशंभटाची व माझी तरी कांहीं ओळख नाहीं. त्यांचें नुसतें नांव मी ऐकलें आहे. व त्यांना एकदा—हो एकदाच—पाहिल्याचें स्मरतें.

**रत्न०**—अहो काका, जरा बसा. विसावा खा. जहागिरदारांचे आपण चुलते ना? मग आपल्याला सर्व हकीकत कळविलीच पाहिजे. जहागिरदारसाहेब नुकतेच आटोपले हो! ईश्वर इच्छेपुढें इलाज नाहीं. आपण काल ह्या वेळेस—निदान आज सकाळीं--आलां असतां, तर दोन शब्द बोलावयास सांपडले असते. निदान दृष्टादृष्ट तरी झाली असती. पण आतां निरुपाय आहे. कालावर नजर देऊन आतां आपण स्वस्थ बसलें पाहिजे. दुसरें काय करणार?

**जगत्काका**—आमचा बापु गेला अं! शिव शिव! बरें ईश्वर इच्छा! त्याच्या पुढें कोणाचें चालणार? असो. पण त्याचें मला मुख-

दर्शन तरी होईल का ? तो ह्या खोलींतच असल्यास व आपली कांहीं हरकत नसल्यास मी जाऊं का आंत ?

**धोंड०**—तेवढें मात्र करूं नका. अगोदर आपली आणि जहागिरदारांची फारकत झालेली आहे किंवा नाहीं, हें सांगा; आपणास कांहीं मुलें अगर वारस आहेत कीं काय, तें कळूं द्या; आणि मग दिवाणास घेऊन आंत जा, जावयाचेंच असेल तर !

**सर०**—तरी सुद्धां जातां कामा नये. समजलें का धोंडभटजी ? माझें तुम्ही ह्या वेळेस तरी ऐकाच. डॉक्टरसाहेबांस येऊं द्या. त्यांना जहागिरदारांस पाहूं द्या. आणि त्यांनीं खरोखरीच आटोपल्याचें सर्टिफिकिट दिल्यावर मग जें करावयाचें असेल, तें करा. ( काकाकडे वळून ) समजलांत, काका ? जरा बसा आपण येथें.

( डॉक्टर पडघम व अप्रेंटिस धडफळे लगबगीनें येतात. अप्रेंटिसचे हातांतील बॅग धांदलींत खालीं पडते. )

**डॉ० पड०**—हा मूर्खा, पाडलीस बॅग एकदा ! औषधाच्या बाटल्या फुटल्या असतील ना सगळ्या ! आतां मी येथें काय बोडकें करणार !

( ज्योतिर्भूषण जोशी डोक्यास पंचा बांधलेले व पंचा नेसलेले प्रवेश करितात. )

**ज्योतिर्भूषण जोशी**—बोडकें काय म्हणून ? डोकीस निदान फडकें तरी असलेंच पाहिजे. आणि कांहीं तरी नेसायला !

**धडफळे**—( बॅग उचलून व डॉक्टरपुढें उभा राहून ) ही कांहीं औषधांच्या बाटल्यांची बॅग नाहीं, साहेब ! ती मी व्हिजिटहून आल्यावर लगेच घरीं ठेविली ! आणि बराच वेळ झाला, म्हणून मी ही फराळाची बॅग आणिली आहे हो ! ह्यांत आपल्याकरितां भीमरोटी व कांहीं नकुळरोट्या, व माझेकरितां भोपळ्याचें थालिपीठ आणि लसणीची चटणी आणिली आहे.

डॉ० पड०—आ यू डॅम फूल! पण तुला बिचाऱ्याला तें काय समजणार? सर ऐझॅक न्यूटनच्या कुत्र्याला आपल्या यजमानाच्या लेखाची काय किंमत! असो. अक्कलशून्य आहेस, दुसरें काय?

( सरसुभे, रत्नपारखी, डमरु ह्यांच्याबरोबर शेकहॅन्ड करून डॉक्टर खोलींत जातात. )

धड०—( बॅग उघडून थालिपीट काढतो. ) मला ह्मणतात कीं, पोटाची अगोदर तजवीज ठेवीत जा. वेळ अवेळ होतो, पोटांत थोडें गेलें ह्मणजे बरें! आणि आपणच आतां शिव्या देतात! पण ह्यांना असें समजत नाहीं कीं, येथून निघाल्यावर का माझा सासरा बसला आहे वाटतें, वाटेंत भूक लागली तर! आणि येथेंच कोणी खावयाला मागितलें, तर येथें कोणाला कांहीं मिळेल का अशा प्रसंगीं! ( थालिपीट खावयास सुरुवात करितो. ) चटणी चिकटली वाटतें भीमरोटीला! ह्या रांडेला जातबीत, ओळख देख, कांहीं लागत नाहीं! वाटेल त्याला आपली चिकटते! ( भीमरोटीला चिकटलेली चटणी बोटानें काढतो. )

डॉ० पड०—( बाहेर येऊन ) हं, आटोपली जहागीर, आणि जहागिरदार! बरें! ईश्वर समर्थ आहे. तो ह्मणेल, तसें झालेंच पाहिजे. ( बाहेर ठेवलेली टोपी घालून ) बरें आहे! सुभेसाहेब, मी आतांचे गाडीनें अलाहाबादेस जात आहें. आल्यावर भेटूं. गुड मॉर्निंग रत्नपारखी—ऑर, गुड डे, रादर! गुड डे डमरुसाहेब! ( जातो व परत मुरडून ) अहो दिवाणसाहेब, जहागिरदारसाहेबांस वाड्यांतच पुराना का? कशाला बाहेर नेण्याचे श्रम घेतां? माझे तेवढे बॅंकेंत भरा बरं का? नाहीं तर, अर्धे बॅंकेंत भरा आणि अर्धे जाऊं द्या धनशेटजीच्या दुकानांत. आणि असें केल्याचें मला पत्रानें ह्या पत्त्यावर ( दिवाणजीस पत्त्याचें कार्ड देतो. ) आज रात्रीचे टपालानें कळवा. विसरूं नका बरें का? नाहीं तर आजच्या गडबडींत रहावयाचें!

**सर०**--डॉक्टरसाहेब, दोनच सेकंड्स! जहागिरदारांस वाड्यांत पुरलें, तर चालेल का? ते ब्राह्मण आहेत; पण संन्याशी नाहींत.

**डॉ० पड०**—काय फिकीर आहे? जानवें तोडा! शेंडी ओढा! एक खळी काढा! आणि त्यांत सोडा त्यांना! मी संन्यासाबद्दल सर्टिफिकिट देतों! आणि थोडक्या पैशांत! मग झालें कीं नाहीं?

**दिवाण**--नाहीं, तसें करतांच येणार नाहीं. शिवाय जहागिरदारांचे काका आले आहेत. त्यांना ह्या बाबतींत विचारलेंच पाहिजे.

**डॉ० पड०**—जहागिरदारांना काका आहेत का? मी म्हटलें, काका, मामा, भाऊ सर्व आपणच!

**दिवाण**—मी कसचा? मला कोण आतां पुसतो? हे वृद्ध गृहस्थ येथें बसले आहेत, ते जहागिरदारांचे काका–सख्खे काका हो!

**डॉ० पड०**—असें का? असोत बिचारे! मी म्हटलें, मी आतां लांबचे प्रवासास जाणार आहें. संन्यास–सर्टिफिकिटाबद्दल अडचण पडूं नये, म्हणून विचारलें. आणि जरी सर्टिफिकिट घेतलें, तरी तुम्ही जहागिरदारांना पुरलेंच पाहिजे, असेंही नाहीं. जाळलेंत तरी चालेल. असें झालेंच, तर अर्धी फी माझेकडून परत घ्या, म्हणजे झालें.

**दिवाण**—आपण सध्यां जा. आपल्याला घाई आहे. जसें सोईस येईल, तसें करूं.

( डॉक्टर व अप्रेंटिस जावयास निघतात. अप्रेंटिसनें टोपींत दहा पांच बिस्किटें खाण्याकरितां घेतलेलीं खालीं पडतात. तीं वेंचून घेऊन व एक दोन कमी झालेलीं पाहून. )

**धड०**--( धोंडभटास ) पाहूं आपलें तोंड? दांत आहेत ना? मग आपलेंच काम खात्रीनें!

**धोंड०**—चल. नीघ येथून. बाऱ्या नाहीं तर. ( डॉक्टर व अप्रेंटिस जातात. )

**रत्न०**—हं दिवाणसाहेब, अगोदर ह्या काकांना खोलींत न्या पाहूं. बिचारा उगीच तिष्ठत बसला आहे. चला लौकर.

( दिवाण जगत्काकाचा हात धरून खोलींत जातो. जगत्काका आंत गेल्यावर, दोन विष्णुदूतांस बोलावून, त्यांच्याकडून निद्रिस्थ अश्वत्थाम्याचे शरीरांतून प्राण काढून जहागिरदारांचे शरीरांत घालतात, आणि विष्णुदूतांस जावयास आज्ञा करितात. व ते काकांस वंदन करून जातात. )

**धुंडि०**—मला वाटतें, तो डॉक्टर म्हणतो, त्याप्रमाणें पुरणेंच बरें. कारण, मी नुकतींच ह्या बाबतींत पंधरा वीस संस्कृतमिश्रित सूत्रें रचलीं आहेत. त्यांतील एक सूत्र असें आहे कीं, ‘ श्वासाभावे अपमृत्युः। न हि महामृत्युं विना भस्मीभूतं कलेवरम्। ’ ह्या सूत्रास अनुसरून जहागिरदारांस पुरलें, तर ते अपमृत्यूनेंच मेले, असें आपल्यास साधारण ह्मणतां येईल. व ही गोष्ट मी दिलेल्या मात्रेवरूनही सिद्ध होत आहे. ती मात्रा ह्मणजे प्रत्यक्ष यमाचे डोकींत कुऱ्हाड हाणल्याखेरीज रहाणारच नाहीं! असें असून ज्या अर्थीं जहागिरदारसाहेब मेले आहेत, त्या अर्थीं त्यांचा हा अपमृत्युच आहे. आणि म्हणून मी केलेल्या सूत्राप्रमाणें त्यांस पुरलेंच पाहिजे.

**धोंड०**—वाहवा! विषयप्रतिपादन करण्याची जी आपली शैली आहे, तिचें वर्णन करावें, तितकें थोडेंच. ( जोशीबुवांकडे पाहून ) आपलें काय ह्मणणें आहे, जोशीबुवा? जहागिरदारांस हल्लीं मृत्यूचा योग होता का? किंवा ते नजरचुकीनें तर मेले नाहींत ना?

**ज्योतिषी**—हें पहा धोंडभटजी, आपल्यासारख्यांना ह्या आमच्या विषयांत बोलण्याचा अधिकार नाहीं. आपल्याला या जगांत पैशावांचून दुसरें कांहीं दिसत आहे काय? मघाशीं आपण माझा जो उपहास केलात, तो माझे लक्षांत आहे. परंतु उत्तर देण्याची ती वेळ नव्हती, म्हणून गप्प बसलों.

( दिवाण खोलीबाहेर येतो. )

**दिवाण**--अहो, जहागिरदार सावध झाले! चांगले उठून बसून काकांशीं बोलत आहेत! व काका त्यांना घटकाभर पडून विश्रांति घ्यावयास सांगत आहेत. तुम्ही आतां येथें बसून काय करणार? आपापल्या घरीं जा कसे. हं, उठा जोशीबुवा. तुम्ही तरी निदान ह्या असल्या अभद्र वेषांत येथें बसूं नका. चला, चालते व्हा!

( सर्व निघून जातात. )

**धोंड०**--( जातांना ) सगळेंच विलक्षण! विषम झाला काय! तो थेरडा आंत गेला काय! आणि लागलेंच सर्व एका बाजूस राहून जहागिरदार आतां जिवंत झाले काय! निदान लोकलज्जेस्तव तरी त्यांनीं आतां मेलें पाहिजे होतें! पण लज्जा आणि अक्कल असेल तर!

( सरसुभे तोंडांत चिरूट धरून खुर्चीवर डुकल्या घेत पडले होते. त्यांस जागें करून व त्यांचा हात धरून निघून जाऊं लागतो. )

**सर०**--( जातां जातां ) मग पुरावयाचेंच ठरलें ना? बरें झालें. आणि तेंच सशास्त्र आहे बरं का!

**धोंड०**—कोणाला पुरतां? आणि कोणाला जाळतां? जा, झोंप घ्या घरीं जाऊन!

**सर०**—जाळणार, तर जाळा बापडें! आमचें त्याबद्दल कांहीं ह्मणणें नाहीं.

**धोंड०**—महाराज, आपण झोंपेंतच आहांत का अजून? जहागिरदारसाहेब त्या डॉक्टराचे औषधानें चांगले खडखडीत उठून बसले आहेत. म्हणून म्हणतों, आतां घरीं चला आणि जरा आराम करा. दरम्यान जहागिरदार फिरून मेलेच, तर जाळण्याचें कीं पुरण्याचें, तें पहातां येईल. तोंपर्यंत स्वस्थ विश्रांति घ्या कशी!

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ—जहागिरदारांचा दिवाणखाना-जहागिरदार बापुसाहेब व त्यांचे चुलते जगत्काका बसले आहेत. ]

**जहागिरदार**—काका, ह्या दुखण्यानें तर मला अगदीं वेडें करून सोडलें आहे. मागील मला कांहीं एक स्मरत नाहीं. जसा कांहीं नुकताच जन्मलों आहे !

**जगत्काका**—अरे, जिवावरचेंच दुखणें तें ! कित्येकांचें तर असल्या दुखण्यानें एकाददुसरें इंद्रिय पार नाहींसें झालेलें आहे. तुझी पुण्याई मोठी, म्हणून तसें झालें नाहीं ! आतां मागील स्मरण नाहीं, तें हलके हलके येईल.

**जहा०**—परवां तो दिवाण मला कांहीं पैशाच्या बाबतींत विचारीत होता, तें मला कांहीं समजलें नाहीं. मी आपला वेड्यासारखा स्तब्ध बसलों. तो मला लागलेंच ह्मणाला कीं, महाराज, अजून आपली तब्येत ठीक दिसत नाहीं ! मला कांहींच उत्तर सुचेना.

**जगत्काका**—ठीकच सुचेना. तुला कसें सुचेल ? तें मला सर्व कळलें आहे. आणि मी दिवाणांस त्याबद्दल जें कांहीं सांगावयाचें होतें, तें सांगूनही टाकलें आहे. त्यांनीं तुला काय म्हणून प्रश्न केला, कोण जाणें. कदाचित् तूं यजमान म्हणून केला असेल. करीनात बिचारे ! त्यांत कांहीं बिघडलें नाहीं. तुला एक खुबी सांगून ठेवतों, ती लक्षांत ठेवून वागत जा; ह्मणजे तुला कांहीं एक अडचण पडणार नाहीं. ती अशी कीं, कोणी तुला कांहीं विचारो, तुला उत्तर देतां आलें तर देत जा; नाहीं तर उगीच बुचकळ्यांत पडल्यासारखें न दाखवितां खाडकन् उत्तर देत जा कीं, मी काकांना विचारून सांगेन काय करावयाचें तें. असें केलेंस, ह्मणजे चार सहा महिन्यांत तुझी स्मृति येऊन तुझें पूर्ववत् बस्तान बसेल. तेथपर्यंत मी सांगेन तसेंच चालूं दे, ह्मणजे कसलीही अडचण पडणार नाहीं.

**जहा०**--काका, या वेळीं तुम्ही येथें आहांत, हे माझ्यावर केवढे बरें उपकार आहेत ! नाहीं तर माझे हाल कुत्रे खातेना.

**जगत्काका**- बापु, ईश्वर नेहमीं लोकांचें बरेंच करीत असतो. पहाणारा सुज्ञ असला, तर त्याला तें बरें दिसतें. मूर्ख असला, तर तो ईश्वरास नांवें ठेवितो. ईश्वरास मात्र चांगलें अगर वाईट, हीं दोन्ही सारखींच असतात. व तो कसली, कोणाचीही पर्वा करीत नाहीं. त्याला जें करावयाचें, तें तो करीतच असतो. आतां आणखी एक गोष्ट तुला सांगून ठेविली पाहिजे. कारण तिच्यासंबंधानें लौकरच वाटाघाट सुरू होईल. आणि तुला आपण मोठ्या अडचणींत पडल्यासारखें वाटेल. तर तसें होऊं नये, म्हणून सांगतों. ती ही कीं, दुखण्याच्या पूर्वीं पुनर्विवाहासंबंधीं तुझा कांहीं पत्रव्यवहार होऊन तुझ्याशीं पुनर्विवाह करण्याकरितां एक मोठी विदुषी बाई येथें आली आहे. व तूं आतां बरा झाला असल्यामुळें तुझे स्नेही ह्यासंबंधीं तुला प्रश्न विचारतील. तर त्यांनाही 'जें करावयाचें, तें काकांना विचारून करीन !' म्हणून सांग. म्हणजे मला जें करावयाचें, तें मी करीन. स्वतंत्र रीतीनें तूं आपले अंगावर कांहीं एक घेऊं नकोस. एवंच, तुला स्मृति येऊन सर्व जबाबदारी स्वतंत्रपणें अंगावर घेण्याचा तुला आवांका येईपर्यंत माझ्यावरच भिस्त ठेवून रहा.

( दिवाणजी प्रवेश करितात. )

**जगत्काका**--या बसा, दिवाणजी. झाली का आपली सर्व व्यवस्था ? ठरल्याप्रमाणें कागद करण्यास आतां हरकत नाहीं ना ?

**दिवाण**--थोडें विचारावयाचें राहिलेंच. आपल्याला हल्लींचे कायद्यामुळें त्याचीही साफी करून घेतलीच पाहिजे. म्हणून विचारतों कीं, रक्कम मूळ तुमची. ती तुम्ही मला मेहेरबानीखातर बक्षिस देणार. हें सर्व ठीक आहे. पण ह्या रकमेपैकीं मी जर वेळोवेळीं तुमच्या खर्चास रकमा देत गेलों, आणि त्याजवर व्याज आकारलें, तर

तुह्मांस पसंत आहे का ? हा धोंडभटजींनीं प्रश्न काढला आहे, म्हणून विचारतों ?

**जगत्काका**—हल्लीं जो व्याजाचा दर व जी रीत प्रचारांत असेल, त्याप्रमाणें आकारा. त्याला कोणाची भीति आहे ? आम्ही तें सर्व खुषीनें देऊं.

( धोंडभट प्रवेश करितो. )

**दिवाण**—( धोंडभटास ) बरें झालें, तूं आलास. मी आपलें मघाशीं ठरल्याप्रमाणें काकांना व्याजाबद्दल विचारीत आहें. ह्मणजे पुढेंमागें लोकांनीं आपणास नांवें ठेवावयास नकोत.

**धोंड०**—( काकांस ) वाजवीच आहे. पहिल्यानें कडू आणि मागाहून गोड, असें असलें ह्मणजे बरें. नाहीं तर आज आपण आणि दिवाणजींनीं एकादी गोष्ट ठरवावी, आणि उद्यां तीच चव्हाट्यावर आली, ह्मणजे लोकांनीं हंसावें, आणि तुमच्या दोघांत वितुष्ट पडावें ! मग काय राहिलें ?

**जगत्काका**—मला असल्या कामांत काय समजणार बरें ? मी कधीं असलीं कामें केलीं आहेत का ? आईच्या पोटीं जन्मलों, आणि तेव्हांपासून आतांपर्यंत देवाचें नांव घेऊन भिक्षा मागत हिंडत आहें. आतां उगाच चार दिवस तुमच्या कृपेनें असल्या गोष्टी ऐकावयाला तरी मिळताहेत. तुह्मी तुमच्या इच्छेप्रमाणें एक मसुदा तर तयार करून आणा. मग त्यांत काय कमजास्ती करावयाचें, तें करतां येईल.

**धोंड०**—मी जातों तर, आणि मसुदा तयार करून आणतों.

**जगत्काका**—हो, जा तुह्मी. आणि बिनहरकत करा. मी जबाबदार आहें. आपण अगदीं भिऊं नका. ( धोंडभट जातो. )

( डॉक्टर पडघम पहिल्यानें कार्ड पाठवून परवानगी झाल्यावर प्रवेश करितो. सर्व उठून त्यांना खुर्चीवर बसवितात. )

**डॉ० पड०**—मी सहज वाड्यावरून व्हिजिटला जात होतों. तों म्हटलें, वेळांत वेळ करून बापुसाहेबांची व जमल्यास काकांचीही भेट घेऊन जावें.

**जगत्काका**---बरें केलेंत. मीही आपणास बोलावणारच होतों. पण दिवाण ह्मणाले, फी द्यावी लागेल; ह्मणून स्वस्थ वाट पहात बसलों होतों. तों ईश्वरानें भेटीचा योग जुळवून आणिला.

**डॉ० पड०**---अहो, असल्या कामांत कसला ईश्वर घेऊन बसलांत ! दिवाण हल्लीं जहागिरदारांचे दुखण्यापासून बहकल्यासारखे झाले आहेत. ह्मणून त्यांनीं तुह्मांला फीचा धाक घातला. मी अर्ध्या फीवर मुद्दां पुष्कळ ठिकाणीं जातों.

**जगत्काका**---समजलों ! फीचें मला मोठेंसें वाटत नाहीं. पण आपला वेळ तरी विनाकारण कां घ्यावा, असें आपलें मला वाटलें.

**डॉ० पड०**---तें रास्त आहे. आणि मीही तसाच वागतों, हें आपल्या निदर्शनास आतांचे आतां येईल. ( दिवाणजीस ) बरं का, दिवाणजी, ह्या खेपेची अर्धीच फी आकारा. आणि ती नोट असल्यास माझेजवळ द्या, नाहीं तर बँकेंत पाठवून मला नुसतें कळवा, ह्मणजे झालें. आणि मागील बरीच रक्कम राहिली आहे; तीही--आज काका समक्ष आहेतच--त्यांना माझे समक्ष विचारून नोट असल्यास मला द्या, नाहीं तर बँकेंत पाठवा.

**जगत्काका**---मागील अजून किती फी द्यावयाची आहे ?

**डॉ० पड०**---फी थोडी आहे. मागील 'प्राणवायूच्या कुपीचें' बिल सबंधच द्यावयाचें आहे. फी व बिलाची रक्कम मिळून हजार बाराशेंचे बाहेर नाहीं !

**जगत्काका**---एकूण आपण आमच्या बापूला 'प्राणवायूचा' प्रयोग केला होतात तर ? तरीच बरें का ! आपण बाहेर गेल्यावर मी आंत गेलों, आणि पहातों तों, तो काल्यासारखा थंडगार पडला होता ! पण पुढें पहातों, तों चळवळ करावयास लागला ! मी म्हटलें, पिशाच्च तर संचारलें नाहीं ना ? इतक्यांत तो उठून बसला ! हें काय गूढ आहे, हें मला त्या वेळीं कळेना. पण आतां लख्खकन् उजेड पडला !

शाबास ! डॉक्टरसाहेब, आपणाला आम्ही काय देणार ? सर्व जहागीर दिली, तरी आपलें उतराई होणें शक्य नाहीं.

**डॉ० पड०**—काका, सर्व गोष्टी बाजूस ठेवून मी आपल्याला एवढेंच विचारतों कीं, आपण इतके दिवस होतां कोणीकडे ? आपण येथें असतां तर ह्या जहागिरीची इतकी परवड खास झाली नसती, आणि आमच्यासारख्या गुणी मनुष्याचा तेव्हांच बस बसला असता, असें मला आतां वाटूं लागलें आहे. आज माझ्या विद्येचें, श्रमाचें, अकलेचें, कर्तबगारीचें, फार काय ?—मी जिवंत असल्याचें भरपूर चीज झालें, असें मी समजतों. आणि तें कसें, हें आपणास विशेष वाच्यतेखेरीज समजणारें आहे. व दुसऱ्या कोणास समजावें, अशी माझी इच्छाही नाहीं !

**जगत्काका**—दिवाणजी, डॉक्टरांचे घरीं, अगर ते ह्मणत असल्यास बँकेंत, दोन हजार रुपये आतांचे आतां पाठविण्याची तजवीज करा. आणि तसें केल्याचें मला ताबडतोब कळवा. मी म्हणतों, दोन हजार ह्मणजे आमच्यासारख्यांना कांहींच नाहींत.

**डॉ० पड०**—काका, कांहीं चिंता नाहीं. तुमच्या मनामध्यें माझी खरी किंमत झाली, ह्मणजे बस्स आहे. दोन हजारांशिवाय आजच्या आणि मागच्या फीची रक्कम रहाते. पण तिचें पुढें पहातां येईल.

**जगत्काका**—पुढें कां ? तुमचे वेळेला किंमत नाहीं का ? आमच्यासारख्यांनीं त्याचा काय म्हणून फुकट उपयोग करून घ्यावा ? म्हणून मी म्हणतों, आतांच्या आतां आपली रक्कम मिळालीच पाहिजे. आपण जाण्यापूर्वीं बापूला एकदा पहा बरें. त्यानें लग्न करावें, इतकी त्याची प्रकृति आतां सुधारली आहे, असें आपल्याला वाटतें का ? ती पुनर्विवाहाकरितां बाई आली आहे ना ? तिच्याशीं तो पुनर्विवाह लावणार आहे. पण मी त्याला म्हटलें, आणखी कांहीं दिवस जाऊं देत, नाहीं तर दुखणें उलटेल कदाचित्.

**डॉ० पड०**—अगदीं बरोबर आहे, काका, तुमचें ह्मणणें ! मी सर्टिफिकिटच आपणास देतों कीं, आणखी दोन महिने तरी जहागिरदारांनीं असल्या भानगडींत पडूं नये. ( दिवाणाकडे पाहून ) एक कागद घ्या पाहूं. ( कागद वगैरे आणिल्यावर व सर्टिफिकिट लिहिल्यावर ) हें घ्या सर्टिफिकिट.

**जगत्काका**—दिवाणजी, डॉक्टरांना आणखी एक हजार रुपये द्या कसे. ह्मणजे त्यांना व्यर्थ शीण झाल्यासारखें वाटणार नाहीं.

**डॉ० पड०**—( जाण्याकरितां उठून ) थोडीशी फीची कसर राहिली, असें मला वाटतें. पण राहूं द्या, गिऱ्हाईक मोडतां कामा नये. ( दिवाणजीस ) तीन हजार रुपये बरं का ? लक्षांत असूं द्या. आणि रोख तेवढे बँकेंत, बाकीचे घराकडे ! ( जातो. सर्वजण उठून त्यास पोहोंचवितात. ) ( दाराबाहेर जाऊन फिरून परततो. व काकांस ) काका, तो बटव्या वैद्य येत आहे, त्याला संभाळा बरं ! उगीच थापा मारील ! ऐकूं नका ! त्याला कांहीं एक समजत नाहीं. आणि तुह्मांला वाग्भटाच्या–नाहीं तर आश्वलायनभटाच्या–गप्पा सांगून पैसे काढील ! ( जातो. )

( वैद्यराज खांद्यावर बटवी टाकून प्रवेश करितात. काका त्यांचा हात धरून त्यांस बसवितात. )

**वैद्यराज**—मग आपण आंत गेल्यावर किती वेळानें जहागिरदारसाहेब सावध झाले ? माझ्या मात्रेची मुदत एका घटकेची होती. आठ वळसे ! आणि मधांत ! हटकून गुण आलाच पाहिजे !

**जगत्काका**—अगदीं तंतोतंत आपला अजमास खरा झाला, असें म्हटलें पाहिजे. कारण, मी आंत गेलों, तोंडावरून हात फिरविला, अंगावरून हात फिरविला, तों चळवळ सुरू झालीच. आणि ताबडतोब उठून बसला ! पण मीच त्याला जोरानें निजविलें व सांगितलें कीं, दोन घटका स्वस्थ पडून विश्रांति घे. एकूण सहाणेवर उगाळलेली मात्रा तुम्ही दिली होतीत तर !

**वैद्य०**--होय तर! आणि दिवाणांना नाहीं का माहीत? त्यांचेकडूनच ती मी ठेवविली.

**दिवाण**--पण मी विसरलों बुवा! मात्रा उगळतां उगळतांच त्यांचा श्वास बंद झाला. आणि मग मात्रा तशीच सहाणेवर पडून राहिली!

**वैद्य०**--छट्! असें कधीं व्हावयाचें नाहीं. त्या मात्रेचा आणि रोग्याचा असा रासायनिक संबंध आहे कीं, तिचा दर्प हवेनें रोग्याचे पोटांत गेल्याखेरीज रहाणार नाहीं. आणि दर्प गेला कीं, रोगी उठून बसलाच! आणि ज्या अर्थीं रोगी प्रत्यक्ष उठून बसल्याचें तुह्मी सांगतां, त्या अर्थीं माझ्या मात्रेचा दर्प त्यांचे पोटांत गेलाच! जास्त बोलण्याचें येथें कारणच नाहीं.

**जगत्काका**—आपण ह्मणतां, हेंच खरें. कारण, मी जेव्हां खोलींत गेलों, तेव्हां मला इतकें कांहीं पडसें आलें होतें कीं, नाक गळून पडतें कीं काय, असें मला झालें होतें. आणि आंत जाऊन सहाणेवर काय आहे, ह्मणून पाहिलें मात्र, तों दर्पानेंच माझें पडसें खडखडीत वाळून गेलें. मात्रा आहे खरी जाज्वल्य!

**वैद्य०**--जाज्वल्य? हं हं, हजार वर्षांची जुनी मात्रा! नांव 'मृत्युकुठार!' नुसती जवळ असली, तर पांचशें कदमांवर मृत्यूस फिरकूं देणार नाहीं! मी एकादे वेळेस जानवें विसरेन, पण ही (बटवी खांद्यावरून काढून हातांत घेऊन) मात्रा ठेवण्याची बटवी मागें कधीं विसंबलों नाहीं, आणि पुढेंही कधीं विसंबणार नाहीं!

**जगत्काका**--(दिवाणास) मला वाटतें, वैद्यराजांनीं या वेळेस उत्तम कामगिरी बजाविली आहे. तेव्हां त्यांना निदान हजार रुपये दिले पाहिजेत. हजार वर्षें नुसती मात्रा जपून ठेवणें किती दुरापास्त आहे बरें! त्या मानानें हजार रुपये हे कांहींच नाहींत, असें मी समजतों.

**वैद्य०**--आपण ह्मणतां, तें अगदीं यथातथ्य आहे. पण आतांचे आतां शें दोनशें असले, तरी हरकत नाहीं. एकदा दिवाणांच्या

हवाल्यावर पडलें, ह्मणजे आमच्यासारख्यास थोडें कठिण जातें. शिवाय आपल्यासारख्यांना ‘ तुरत ’ दानाचें जें विशेष पुण्य लागावयाचें, तेंही उगीचच्या उगीच वायां जातें. ह्यासंबंधानें ‘ द्रविडचाणाख्यांत ’ असें म्हटलें आहे कीं, “ वक्कलस्य, वकीलस्य, वैद्यस्य च ऋणं त्वरित् । यो दीयते अशेषेण स गुप्तदानफलं लभेत् ॥ ” म्हणून म्हणतों कीं, जवळ शिल्लक असल्यास ती देऊन तितक्यापुरतें तरी पुण्य जोडा. बाकीचा हिशेब मागाहून सवडीप्रमाणें करूं.

**जगत्काका**—खरेंच. दिवाणजी, तुमचेजवळ सध्यां किती सवड होण्यासारखी आहे ?

**दिवाण**—माझेजवळ फक्त दोनशेंच्या नोटा आहेत. एक हजाराची नोट मी आपल्यास दिली, त्याच वेळेस मी ह्या दोनशेंच्या किरकोळ खर्चास ठेविल्या होत्या. तितक्या सध्यां माझेजवळ आहेत.

**जगत्काका**—खरेंच. तुह्मी मला हजाराची नोट दिली होती, नव्हे का ? ( खिशांत पहातो व बाहेर काढतो. ) आहे खरी ही माझे-जवळ. ( वैद्यराजांस ) ही घ्या कशी, महाराज. ह्मणजे तुमच्या श्लोका-प्रमाणें अनायासेंच काम झालें.

**वैद्य०**—वा ! आज बहार झाली. आजपर्यंत माझे अठवणींत असा कधीं बटवडा झाला नाहीं. म्हटलें आहे कीं, “ व्यवहारे झटपटे वर्ते स मुमुक्षू नात्र संशयः । ”

**जगत्काका**—फुरसत असल्यास जरा बापूची नाडी पाहून शक्ति येण्यास कांहीं आपलेजवळ औषध असल्यास दिलें, तर बरें होईल.

**वैद्य०**—फुरसत ! आह्मांस दुसरा काय उद्योग आहे ? रोगी पहावयाचा व औषध द्यावयाचें. ( जहागिरदारांची नाडी पाहून ) नाडी उत्तम आहे. थोडें भ्रमल्यासारखें होतें. पण तेंही ह्या धन्वंतरी चूर्णाच्या पुड्यांनीं बंद होईल. ( पुड्या देतो. ) ह्यांतील एक पुडी सूर्योदयाचे अगोदर लोण्यांत थोडें खडीसाखरेचें चूर्ण घालून घेत जावी. नंतर

थोडें निजावें. ह्मणजे सात दिवसांचे आंतच, जसें कांहीं दुखणें आलेंच नव्हतें, अशी प्रकृति होऊन जाईल. ह्या चूर्णांत सुवर्णाचें भस्म असल्यानें किंमत जरा जबर आहे. परंतु ती आतांच दिली पाहिजे, असें नाहीं. तूर्त जें जरूर आहे, तें हें कीं, बापुसाहेबांस असें तिष्ठत कधींही बसूं देऊं नका. नेहमीं खेळण्यांत, थट्टामस्करींत, व जमल्यास स्त्रियांचे सहवासांत, त्यांचा जितका वेळ जास्त जाईल, तितका जाऊं देण्याची व्यवस्था ठेवा.

**बापुसाहेब**—मला वाटतें कीं, वैद्यराजांनीं माझ्या सध्यांच्या स्थितीची अगदीं बरोबर परीक्षा केली आहे.

**जगत्काका**—मलाही तसेंच वाटतें. आणि म्हणून मी म्हणतों कीं, दिवाणजीपाशीं ज्या दोनशेंच्या नोटा आहेत, त्या वैद्यराजांस आतांच देऊन टाकाव्या. ( दिवाणजीस ) दिवाणजी, त्या तुमच्यापाशीं असलेल्या नोटा वैद्यराजांस देऊन टाका कशा ! ( वैद्यराजांस ) आपण दररोज सकाळीं येऊन बापूची प्रकृति पहात जाल काय ? दोन चार दिवस तसदी घेतलीत, तरी बस्स आहे. आणि मीही त्या मास्तरणी आल्या आहेत, त्या दोघींस आज येथेंच जेवावयास बोलावितों. ह्मणजे त्यांचे सहवासांत बापूचा वेळही आनंदांत जाईल.

**वैद्य०**—मी बापडा दररोज येईन. मला काय ? तुह्मी मात्र आतां येथें तिष्ठत बसूं नका. जा, आणि त्या मास्तरणींस अवश्य बोलवा. पहा, दोन चार दिवसांत कसा अजब फेर पडतो तो. ( सर्व उठतात. )

[ पडदा पडतो. ]

( पडद्याबाहेर वैद्यबुवांस ज्योतिर्भूषण भेटतात. )

**जोशीबुवा**—कां लौकरसे आलांत परत ? जहागिरदार भेटले नाहींत का ?

**वैद्य०**—बोंबल्या खरा तूं ! मला वाटतें, तुझे ग्रह लंकेंत रावणाच्या घरीं अजून उपडेच पडलेले आहेत ! माझ्या अगोदर दोन तास आला असतास, तर पांच वर्षांची बेगमी झाली नसती का ? आणि

शिवाय एकाद्या मुलाच्या मुंजीचा खर्चही बाहेर पडला नसता का? पण नशिबीं पाहिजे ना?

**जोशी०**—मी पैसे उकळण्याकरितां जहागिरदारांकडे जाणार नव्हतों. ते दुखण्यांतून उठल्यावर त्यांची गांठ पडली नाहीं, म्हणून चार गप्पा मारण्याकरितां जाणार होतों. माझा योग अजून यावयाचा आहे! तेव्हां समजेल सर्वांना, जोशीबुवांची काय खुबी आहे ती! (जातात.)

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश ३ रा.

**( स्थळ—दुर्जनराय दिवाणाची बसावयाची खोली. दुर्जनराय हिशेब तपाशीत बसले आहेत. )**

**दिवाणजी**—( आपल्याशीं ) धन्य आहे या कारकुनांची! लेकांना पैसे कोठें खावेत, कसे खावेत, किती खावेत, केव्हां खावेत, याचा अगदीं सुमार नाहीं! मी तर म्हणतों, हे कारकुनच नव्हेत. निव्वळ हजाम आहेत. जहागिरदार हिशेब तपाशीत नाहींत, हें खरें. पण मी तपासतों, हें त्यांना माहीत आहे ना? असें असून लोकांचे डोळ्यांत धूळ टाकतात, ह्याला काय म्हणावें?

( धोंडभट प्रवेश करितो. )

**धोंड०**—कां दिवाणजी, आज हिशेबाची बरीच बारकाई चालविली आहे? एकाद्या कारकुनाची बुधली उपडी पाडावयाची आहे वाटते?

**दिवाणजी**—मी पुष्कळ बुधल्या उपड्या पाडीन. पण जहागिरदार ऐकतील तर ना? आतां तर आणखी ते काका आले आहेत! जहागिरदार स्वतः कर्ण, आणि ते काका महाकर्ण! आतां कारकुनांना ठीक फावलें आहे.

**धोंड०**--मी म्हणतों, ते तुमचे जहागिरदार आणि त्यांचे ते वृद्ध काका, दोघेही लंबकर्ण आहेत! आणि तुह्मी त्यांचे सख्खे वडील बंधु! परवां आपण त्या कागदाच्या बाबतींत पाहिलें नाहीं का? पैसा त्यांच्या खजिन्यांतला! तुह्मी त्यांच्यापासून अडवून घेणार! आणि फिरून त्यांच्याचपासून व्याज घेणार! आणि तुह्मी मोठ्या साळसूद-पणानें मला कागद करावयाला सांगतां! वा! धर्मराजानें तरी असला व्यवहार केला होता का? मग हे काका व जहागिरदार धर्मराजापेक्षांही उच्च कोटींतले असले पाहिजेत! किंवा मी म्हणतों त्याप्रमाणें लंबकर्ण तरी असले पाहिजेत! असें ओघानेंच नाहीं का येत? आणि तुम्ही हे पंधरा हजार गिळंकृत करून पुन्हा आपले कारकुनांच्या चुका धुंडा-ळीत बसलां आहांतच. नामी रोजगार! लोकांच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, पण आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं, तें हेंच!

**दिवाणजी**--'तुझ्या कामांत भट पडो' ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं. हें पंधरा हजारांचें काम तुझ्यामुळें आतांपर्यंत कुचंबलें आहे, असें आतां माझ्या पूर्ण अनुभवास आलें. दुसरा एकादा असता, तर कागद करून आपला हिस्सा पदरांत पाडून केव्हांच चालता झाला असता. तुझें पहावें, तों आपलें नेहमीं वांकडेंच. एकदा कागद करण्याबद्दल निम्मे रुपये मागतोस! एकदा म्हणतोस, रोख रुपये पद-रांत ओता! आणि आज तर मी जहागिरदारांस व काकांस फसवून घेतल्याचें ह्मणत आहेस! उद्यां आणखी काय ह्मणशील, कोण जाणें! तूं आपला आमचा कागद देऊन जा कसा. मी वाटेल त्याच्याकडून लिहून घेईन. कोणीकडून तरी तो नंदकिशोर येण्यापूर्वी तो कागद होऊन जहागिरदारांची सही झाली, ह्मणजे झालें.

**धोंड०**--ह्मणजे! तो नंदकिशोर इतक्यांत येणार कीं काय? आणि आला, तरी त्याला हें कागदाचें कारस्थान कोण सांगणार? आणि सांगितलें, तरी तो परकी मनुष्य काय करणार?

**दिवाणजी**—नंदकिशोर आजच येणार होता. पण आतां

गाडीची वेळ गेली. तेव्हां तो बहुतकरून उद्यां संध्याकाळचे आंत खास येईल. तो मोठा वकील आहे, ह्मणतात. आणि तुला माहीत आहे कीं, एकादें पैशाचें काम वकिलाचे हातांत गेलें, ह्मणजे तो सर्व पैसा त्याच्या पिशवींत जाईपर्यंत कामाचा शेवट कधीं लागत नसतो! शिवाय, तो काकांचा मोठा भक्त आहे, म्हणतात. त्याला जर हें कळलें कीं, हे पंधरा हजार विनाकारण माझ्े पदरांत पडत आहेत, तर तो फांदा मारल्याशिवाय राहील का?

**धोंड०**—पण काय हो, दिवाणजी, अलीकडे ही रुपयांची धार जहागिरदारांच्या येथें कोठून पडूं लागली आहे? मागें मी पहात होतों, तों भाजी सुद्धां उधार आणावी लागत असे. आणि आतां पहातों, तों त्या डॉक्टरला ह्मणे तीन हजार दिले! वैद्याला बाराशें दिले! आणि वाड्यांतही खर्चाची मोठी चंगळ चालली आहे! आणि तुमचेंही पंधरा हजारांचें खोरें लागलेंच आहे! हें आहे तरी काय? का परीस बिरीस तर त्या योग्यानें जहागिरदारांना दिला नाहीं ना? एके दिवशीं एक योगी आल्याचें आमच्या सभेंत जहागिरदार बोलल्याचें मला स्मरतें आहे.

**दिवाणजी**—त्या योग्याबद्दल मला कांहीं माहिती नाहीं. इतकें मात्र मला उघड उघड दिसतें कीं, दुखण्यापूर्वींचे जहागिरदार आणि हल्लींचे जहागिरदार, ह्यांच्यामध्यें जमीन अस्मानीचें अंतर आहे. जहागिरदारचसे काय, पण एकंदर जहागिरीची पूर्वींची अमदानी जहागिरदार दुखण्यांतून उठल्यापासून पार बदलून गेली आहे, अशी माझी तर खात्री झाली आहे. आणि अलीकडल्या एक दोन गोष्टी सांगितल्या, ह्मणजे तुझी सुद्धां खात्री होईल, असें मला वाटतें. तुला त्या वाड्यांतल्या दोन भाकड ह्मशी ठाऊक आहेत ना?

**धोंड०**—होय. त्या आज चार पांच वर्षें दूध देत नाहींत.

**दिवाणजी**—होय. पण त्या हल्लीं वेळेस पांच पांच शेर दूध

देतात ! शिवाय मधल्या वेळेस एकाद वेळ काढलें, तर तें निराळेंच. तसेंच वाड्यांतल्या कुव्यास पूर्वीं पाणी होतें का ?

**धोंड०**—बिलकुल नव्हतें. थोडेंबहुत पावसाळ्यांत येत असे. पण तें अगदीं खारें. तोंडांत घालण्याची तर सोय नव्हती !

**दिवाणजी**—त्यांत आतां जसें कांहीं गोडें व विपुल पाणी आलें आहे, असें वाटतें. कुशंभटाच्या बखळींतल्या विहिरीचेंही तसेंच अगदीं गोडें पाणी झालें आहे. मला वाटतें, हा सर्व त्या मास्तरणीचाच प्रभाव आहे. ज्या दिवशीं त्या कुशंभटाकडे आल्या, त्याच दिवशीं आपले कुव्याला गोडें पाणी आलें ! आणि वाड्यांत रहावयास आल्या, त्या दिवसापासून वाड्यांतला कुवा गोडा झाला आहे.

**धोंड०**—ह्मणजे ! त्या मास्तरणी वाड्यांत रहावयाला आल्या आहेत का अलीकडे ?

**दिवाणजी**—होय. आणि तुला नाहीं का माहीत ? त्यांना वाड्यांत येऊन जवळ जवळ महिना होत आला. त्यांना पाहिलें, ह्मणजे मनाच्या वृत्ति उदात्त होऊन हा सर्व जगाचा व्यापार क्षुद्र वाटूं लागतो. दुसरी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. पण मी आतां ती सांगत बसत नाहीं. कारण, मला आतां वेळ नाहीं. इतकेंच सांगतों कीं, तो ह्मातारा काका कांहीं आपल्यासारखा साधारण मनुष्य नव्हे. मोठा तपस्वी, ईश्वरपरायण–प्रत्यक्ष ईश्वरच कां ह्मणेनास–असा आहे. जहागिरदार जेव्हां त्या दिवशीं दुखण्यांतून खाडकन् उठले, त्याच दिवशीं जो चमत्कार माझे पहाण्यांत आला, तो तुह्मांला कोणालाही माहीत नाहीं. पण मला त्याचा प्रत्यक्ष अनुभव आहे. मी काकांना प्रत्यक्ष शंकर किंवा विष्णुच समजतों.

**धोंड०**—जाऊं द्या हो, दिवाणजी. असल्या ईश्वराच्या गप्पा मारणारे मी आजपर्यंत पुष्कळ पाहिले आहेत. आणि आपण ह्या गप्पा मारतां मारतां पंधरा हजार गिळंकृत करण्याच्या उद्योगांत आहांत,

हें मला प्रत्यक्ष अगर महाप्रत्यक्ष अनुभवानें कळलें आहे. आतां माझी इतकीच विनंति आहे कीं, मी कागद केल्यावर आपण मला देऊं केलेले पांच हजार रुपये लागलीच माझ्या पदरांत टाका! त्यांत आणखी ईश्वराचे ऐश्वर्याची कहाणी सांगून भामटेगिरी करूं नका, एवढी मेहेरबानी करा!

**दिवाणजी**—ईश्वराचे ऐश्वर्यांत भामटेगिरीचाही समावेश होतो, म्हणतोस अं! धन्य आहे तुझी! आणखी काय ह्मणावयाचें?

**धोंड०**—मीच का म्हणतों? प्रत्यक्ष वेदच ईश्वराला 'स्तेनानां पति' म्हणून ओरडत आहेत. पण तुह्मां संताळ्या मंडळीला तें कोठून ठाऊक असणार? तुमची एकाद्यावर भक्ति बसली कीं, लागले त्याचे मागें! मला तसें साफ चालणार नाहीं, सांगतों. मी भाकऱ्यांचे शिळे तुकडे जोडून ताज्या भाकऱ्या करण्याचें यंत्र मागविलें आहे. तें येथें येऊन दाखल झालें कीं, लागलीच मला तीन हजार रुपये पाठविलेच पाहिजेत. दोन हजार अवांतर खर्चास लागतील!

**दिवाणजी**—ह्या दर्शनी हुंडीचीच मला मोठी पंचाईत वाटते, बुवा. बारा तेरा हजार तर मला जहागिरदारांचेंच देणें आहे. तें अगोदर मला दिलेंच पाहिजे. बाकी दोन हजार रहाणार. त्यांत मी यंदा आपल्या थोरल्या मुलीचें लग्न उरकून घेणार आहें. जहागिरदारांचा मला कांहीं आतां भरंवसा लागत नाहीं. एकदम फट्दिशीं घरीं बसावयाला सांगितलें तर! काका आहेत तोंपर्यंत मला भीति नाहीं, म्हणा! पण त्या विरक्त पुरुषाला काय? मी नाहीं, माझा काका दुसरा!

**धोंड०**—ह्मणजे इतक्यावर येऊन घेतली आहे का? इतके का जहागिरदार ह्या दुखण्यामुळें बदलले आहेत? पूर्वीं तर अगदीं मेषपात्र होते. असो. पण दिवाणजी, तुम्ही तरी आपल्या मुलीच्या लग्नाला दोन हजार काय म्हणून लावतां हो? आपले लोक ह्या लग्नांच्या खर्चानें अगदीं मत्यास येतात, हें तुह्मांला माहीत असूनही एवढा खर्च तुम्ही करणार, ह्याला काय म्हणावें?

**दिवाणजी**—अरे, मी काय करणार ? मी तर अगदीं पन्नासाच्या आंत करण्याचा घाट घातला होता. व रुखवतापर्यंत सगळें गुंडाळून ठेविलें होतें. रुखवत तुझ्या खाद्यपेयाराम सदनांतून उधार आणणार होतों. आणि तेथेंच एक मेजवानी उधार देण्याचें ठरविलें होतें. पण बायको ऐकेना. ती म्हणाली, माझी पहिली वहिली मुलगी, मी सर्व सोहाळा करणार. आणि व्याही म्हणतो, एक मोटार जांवयास वरातीच्या अगोदर दिलीच पाहिजे, व मुलीच्या गर्भाधानापर्यंत जांवयाला व त्याला स्वतःला गारेचे चष्मे पुरविले पाहिजेत !

**धोंड०**—आणि भटाच्या दक्षिणेचें ? कांहींच ठरलें नाहीं का ?

**दिवाणजी**—तें समजा. त्याबद्दल मी शब्द बोललों नाहीं. आमच्याकडचा तूं आहेसच. त्यांच्याकडल्याला ते वाटेल तें देईनात. आपल्याला काय ?

**धोंड०**—पण तुम्ही तरी मला काय देणार ?

**दिवाणजी**—पांच हजार रुपये देण्याचा कागद करून देतों ना ? आणखी काय पाहिजे ? रुपये मात्र सोईसोईनें. आणि आतां ऊठ लौकर. दोन्ही कागद तयार करून आण कसे. उगीच वेळ घालवूं नकोस.

( जहागिरदारांचा चपराशी प्रवेश करितो. )

**चपराशी**—दिवाणजी, ते पाहुणे आले आहेत ना ? जहागिरदारसाहेब तुमची वाट पहाताहेत. चला बेगी बेगी. तो मागील चौकांतील दिवाणखाना पाहुण्याकरितां खुला करून द्यावयाचा आहे. उठा. काका म्हणाले कीं, लौकर आपल्याला पुढें घालून घेऊन ये.

**दिवाणजी**—हा निघालोंच बघ. तूं पुढें तर हो. ( चपराशी जातो. ) तो नंदकिशोर आला वाटतें ! मग कसें धोंडभटजी ? अजून तरी कागद करण्याचें मनांत येतें का ? नाहीं तर तो कागद परत दे पाहूं. मला आतां वाड्यांत गेलेंच पाहिजे. ( उठतो. )

**धोंड०**—मी येऊं का वाड्यांत ? तेथेंच आपण त्या वकिलाला विचारून काय करावयाचें, तें करूं.

**दिवाणजी**—निव्वळ मूर्ख आहेस तूं! तो कागद तर दे अगोदर माझ्याकडे. मग तुला वाटेल तें कर. तुझा आपला नेहमीं तृतीयपंथच !

**धोंड०**—बरें. मीही घरीं जातों. उद्यां सकाळीं कागद करून आणतों. मग झालें कीं नाहीं ? (निघून जातात.)

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ५ वा.

**[ स्थळ—अनघपुरांतील खाद्यपेयाराम सदनांतील संभाषणाचें दालन. पुनर्विवाहोत्तेजक मंडळींची सभा. जहागिरदार, सरसुभे, रावसाहेब रत्नपारखी, रावबहादुर डमरु, धोंडभटजी, दिवाणजी, डॉक्टर पडघम, धुंडिराज वैद्य, जोशीबुवा, व स्त्रिया वगैरे मंडळी जमली आहेत, व कांहीं येत आहेत. ]**

**सर०**—कसें काय ? बापुसाहेब, आतां प्रकृति ठीक आहे ना ? काय बुवा तुमच्या दुखण्याची एक विचित्र कहाणीच झाली ! मी त्या दिवशीं आश्चर्यानें अगदीं चूर झालों ! कधीं कोणी ऐकला ना पाहिला, असा प्रकार झाला.

**बापु०**—मलाही काका सांगतात, त्यावरून कळलें. बरें झालें. त्या वेळीं सुदैवानें आमचे काका प्राप्त झाले. नाहीं तर हा देह आपल्या आज दृष्टीस पडता ना ?

**रत्न०**—पण काय हो, बापुसाहेब, आपणास कांहींच स्मरत नाहीं ? आमचें तरी असें अनुमान आहे कीं, आपण तास दोन तास अगदीं निचेष्टित पडला होतां. श्वास बंद झाल्याचें एक दोघांनीं पाहिलेंही आहे.

**बापु०**—आमचे काकाही तसेंच म्हणत होते. पण मला मात्र कांहीं एक स्मरत नाहीं.

**डमरु**—असाच प्रकार सुमारें दोन अडीचशें वर्षांपूर्वी, दक्षिणेंत समर्थ रामदास म्हणून सिद्ध पुरुष होऊन गेले, त्यांचे वेळेस घडल्याचें लोक सांगत असतात. पुण्य पुरुषाचे संगतीनें, आशीर्वादानें, अगर इच्छेनें असें होणें मला कांहीं अशक्य वाटत नाहीं. बापुसाहेबांचे काका जरी सामान्य मनुष्यकोटींतले दिसतात, तरी त्यांचें तप निःसंशय असाधारण आहे! तीस गायत्रीपुरश्चरणें! व तितक्याच काशीरामेश्वराच्या खेपा व कड्डें ब्रह्मचर्य! असल्या आचरणाचा मनुष्य प्रत्यक्ष यमाला खालीं आणील! मग एकाद्या मनुष्यास सजीव करणें त्यास काय अशक्य आहे? काका कांहीं सामान्य नव्हेत बरें! महान् कोटि आहे ती! कोणाला कळावयाची मात्र नाहीं!

(नंदकिशोर चक्रवर्तीसाहेब, मिसेस कमलाबाई चक्रवर्ती, व मिस बम्रूताई प्रवेश करितात. त्यांचें सर्व मंडळी उठून स्वागत करितात.)

**सर०**—(रावबहादुर डमरूंस) मला वाटतें, आतां सभेच्या कामास सुरवात करावी. येणारी बहुतेक मंडळी हजर आहेतसें दिसतें. जगत्काका मात्र आले नाहींत.

**नंद०**—(उठून) जगत्काकांस ह्या वेळेस येण्यास सवड नाहीं. करितां सभेच्या कामास सुरवात करावी. जगत्काका आज जें बोलणार आहेत, तें त्यांनीं मलाच बोलावयास सांगितलें आहे. माझें जें स्वतःचें मत आहे, तें मी पुढें एकादे प्रसंगीं सांगेन. बम्रूताईना जें कांहीं सांगावयाचें आहे, तें त्या स्वतःच सांगणार आहेत.

**डमरु**—ठीक आहे तर. मी रावसाहेब रत्नपारख्यांस आज सभेचे अध्यक्ष नेमावें, अशी सूचना करितों.

**सर०**—मी रावबहादुर डमरूंच्या सूचनेस अनुमोदन देतों.

**रत्न०**—मी आपण दिलेल्या मानास पात्र नाहीं, हें मला प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. तथापि ज्या अर्थीं मला सरसुभे-

साहेबांनीं अनुमोदन दिलें आहे, त्या अर्थीं माघार घेणें ह्मणजे विनाकारण उद्दामपणा करण्यासारखें दिसणार असल्यानें मी दिलेल्या मानाचा साभार स्वीकार करितों. (अध्यक्षस्थानीं जाऊन बसतो व उठून) आज जगत्काका बोलणार असून ते कांहीं कारणामुळें हजर राहूं शकत नाहींत, ही फार दुःखाची गोष्ट आहे. असो. जगत्काकांच्या ऐवजीं नंदकिशोरसाहेब बोलणार आहेत, ही त्यांतले त्यांत आनंदाची गोष्ट आहे. तर माझी अशी शिफारस आहे कीं, जगत्काकांना जें बोलावयाचें होतें, तें प्रथम नंदकिशोरसाहेबांनीं निवेदन करावें. नंतर बभ्रूताईंस जें कांहीं बोलावयाचें असेल, तें त्यांनीं बोलावें.

**नंद०**—कुलीन स्त्रिया व सभ्य गृहस्थ हो, बभ्रूताई कोण, जगत्काका कोण, ह्या दोघांचा संबंध काय, व माझा ह्या दोघांशीं काय संबंध आहे, व त्याचप्रमाणें काकांच्या मुखांतून बभ्रूताईंस मिळालेला पंचपतित्वाचा शाप—अगर शापमिश्रित वर—अथवा आशीर्वाद—वगैरे गोष्टी आपणा सर्वांस माहीत आहेत. सबब, मी आतां ह्यासंबंधीं जास्त बोलून सभेचा व्यर्थ वेळ घेत नाहीं. सदरहू शापमिश्रित आशीर्वादानें तर बभ्रूताईनें जगत्काकांस गुरु करून त्यांचेकडून परमार्थ घेतला. व त्यानंतर त्या माझेकडे रहाण्यास आल्या. त्यांचा भाव, त्यांची रामचरणीं निष्ठा, व जगत्काकांचें तपःसामर्थ्य, ह्या तीन गोष्टींनीं एवढ्याशा थोडक्या काळांतच बभ्रूताई मनुष्यरूपी प्रत्यक्ष देवीच बनून गेल्या आहेत. असो. पुढें जगत्काका माझे भेटीस मथुरेस आले. काका येण्याचे अगोदर आपल्या जहागिरदारसाहेबांचें पुनर्विवाहासंबंधीं पत्र येऊन, मंडळी पाठवितों, असें उत्तरही मी त्यांस लिहिलें होतें. ही गोष्ट मी जेव्हां काकांस सांगितली, तेव्हां त्यांनींही मला मंडळी इकडे पाठविण्याचा रुकार दिला. आणि आपण यात्रा करीत करीत काशीस गेले. तेथें त्यांनीं मैत्रेयऋषींची गांठ घेऊन बभ्रूताईच्या विवाहाची वाटाघाट केली. त्यांत बभ्रूताईसारख्या विदुषी व परमार्थसंपन्न स्त्रियांनीं अशा प्रसंगीं 'पार्थिव' विवाह करण्यास हरकत नाहीं, असा शास्त्रार्थ

ठरला. ( शाबास ! शाबास ! ) रजपूतस्थानांत अशा प्रकारचा विवाह मिराबाईनें केला आहे. व ह्याचप्रमाणें बभ्रूताईचाही विवाह व्हावा, अशी काकांची पूर्ण संमति आहे. ( फारच उत्तम ! ) जहागिरदारसाहेब तूर्त विवाह करण्याच्या स्थितींत नाहींत, असें डॉक्टरचें ह्मणणें असून बभ्रूताईनीं अविवाहित राहून जहागिरदारांचे सहवासांत असणें हें काकांस अगदीं प्रशस्त वाटत नाहीं. ( रास्त आहे ! ) तेव्हां काकांचें असें ह्मणणें आहे कीं, तुमच्यापैकीं एकाद्या पुनर्विवाहपटूनें पुढें होऊन बभ्रूताईशीं ' पार्थिव ' विवाह लावावा. व त्या बिचारीला चिखलांतून वर काढावें. अशी काकांची आपल्या सर्वांस हात जोडून विनंति आहे. मला ह्या बाबतींत ह्याशिवाय तूर्त कांहीं विशेष सांगावयाचें नाहीं. ( खालीं बसतो. )

**डमरु**—' पार्थिव ' विवाह ह्मणजे आम्ही काय समजावें ? पुनर्विवाहांत व त्यांत काय फरक आहे, हें नंदकिशोरसाहेबांनीं सांगितलें नाहीं. तें समजल्याशिवाय ह्या विषयाची चर्चा करतां येणार नाहीं.

**नंद०**—पुनर्विवाह अशास्त्र आहे, व पार्थिव विवाह सशास्त्र आहे, हाच दोहोंमधील मुख्य भेद आहे. ' नष्टे मृते प्रव्रजिते ' ह्या श्लोकाचा जो तुम्ही अर्थ करितां, तो व्याकरणदृष्ट्या अगदीं चुकीचा आहे. व त्या आधारावर आजपर्यंत झालेले सर्व पुनर्विवाह अशास्त्र असून त्यांपासून होणारी संतति गोळक होणारी आहे, असें मैत्रेयऋषींनीं काकांस सांगितलें आहे. ' पार्थिव ' विवाहाचा हेतु फक्त वैधव्य नष्ट करण्याचाच आहे; ग्राम्य कर्मानें संतति उत्पन्न करण्याचा नाहीं. इतकेंच नाहीं, पण जर विवाहित जोडप्यापैकीं एकाद्याच्या मनांत पापवासना उत्पन्न झाली, तर त्याचें लागलीच प्राणोत्क्रमण होण्याचा संभव आहे ! पार्थिव विवाहास ' ना विष्णुः पृथिवीपतिः ' ह्या सूत्राचा आधार आहे. व ह्याच सूत्राप्रमाणें पृथ्वीचा पति जो राजा, तो विष्णूचा अंश समजला जाऊन तो तिचें संरक्षण करण्यास अधिकारी होतो. ' पार्थिव ' विवाहानें होणाऱ्या पतीला पत्नीचे धर्म व

अर्थ ह्या दोन पुरुषार्थांनीं संरक्षण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. आणि ह्याच तत्त्वास पूर्णपणें अनुसरून बभ्रूताईचा पहिला पति वागला आहे. दुसऱ्या पतीलाही तेच अधिकार 'पार्थिव' विवाहानें प्राप्त होणार असून, त्या अधिकारांची बजावणी पतीकडून उत्तम रीतीनें झाल्यास त्याला स्वर्गप्राप्ति होईल.

**सर०**—हा वेदांत बस्स आहे ! हें कोडें आहे. लग्नाचें बोलणें नव्हे. निदान जहागिरदारांनीं तरी ह्या हेतूनें इतका खर्च सोसून बभ्रूताईस आणिलेली नाहीं. आणि आमचे ह्या जहागिरींत तरी असलें थोतांड करून हें बभ्रूताईचें लचांड गळ्यांत बांधून घेण्यास कोणी तयार होणार नाहीं.

**नंद०**—माझेंही पूर्वीपासून आपल्यासारखेंच ह्मणणें होतें. व म्हणूनच मी जहागिरदारांचे पत्रास मान देऊन बभ्रूताईची इकडे रवानगी केली. पण मैत्रेयऋषींच्या व काकांच्या आज्ञेबाहेर मला जातां येत नाहीं. मलाही हें प्रथमपासून अशक्यच वाटत होतें. पण काकांचा व बभ्रूताईच्या तपोबलाचा जो मला थोडा अनुभव आला आहे, त्यावरून मी असें खात्रीनें म्हणतों कीं, ह्या कोड्याचा उलगडा ते तेव्हांच करतील. आणि आपल्या इच्छेप्रमाणें आपलें कार्य ह्याच ठिकाणीं साधून घेतील. मग तुमची सहानुभूति–अगर तुमचें साहाय्य–असो वा नसो, त्यांना त्याची पर्वा नाहीं.

**सर०**—असेंच जर असेल, तर होऊं द्याच ह्मणावें ! कसें कार्य साधतात, तें तरी पाहूं !

**बभ्रूताई**—( उठून ) माझी सर्व मंडळीस हात जोडून अशी प्रार्थना आहे कीं, इतक्या निकरावर आपण तूर्त येऊं नये. मज दीन, अनाथ, चिखलांत पडलेल्या गाईकडे लक्ष देऊन, जेणेंकरून माझें हित होईल, तें आपल्यास कर्तव्य आहे, असें धरून मी चालतें. आमच्यासारख्या अनाथ गाईंचा उद्धार करणें हें आपल्यासारख्या मंडळीचें

ब्रीदच आहे, असें मी समजतें. व ह्या कार्यास येथील सरसुभेप्रभृति मंडळीचा हातखंडा आहे, असा जगांत डंका वाजत आहे. ( फारच गोड! फारच मधुर! वाहवा! ) असें असून आपल्यांतीलच क्षुद्र भेदामुळें मला येथून माझें कार्य झाल्याशिवाय जावें लागलें, तर नंदकिशोर बाबा अगर माझे परमपूज्य गुरु जगत्काका, ह्यांचें कांहीं बिघडेल का? काका परम विरक्तच आहेत. नंदकिशोरबाबाही जवळ जवळ त्याच कोटींत मोडावयास लागले आहेत. रहातांपैकीं राहिलें मी. त्या मला- मी येथून विवाह झाल्याखेरीज गेलें तर– 'दे माय धरणी ठाय!' असें होणार आहे. माझी विटंबना होईल, व आपल्यासारखे पुनर्विवाहोत्तेजक इतके वीर येथें असून मला ज्या अर्थीं येथें कोणी पत्करलें नाहीं, त्या अर्थीं माझ्या सदाचरणाबद्दल आणि वर्तणुकीबद्दल लोकांत चर्चा सुरू होऊन माझी विनाकारण अपकीर्ति होईल. असला प्रसंग माझ्यावर ह्या आपल्या दुहीनें येणार आहे. तर माझें सर्वांस हात जोडून असें सांगणें आहे कीं, आपण थोडीशी माघार घेऊन व माझेकडे पाहून काकांच्या म्हणण्यास रुकार द्यावा. ( बहुत नामी! बहुत नामी! ) आपण वाटेल तीं संकटें सोसून व मोठमोठ्या खर्चाच्या जोखमा व इतर जबाबदाऱ्या अंगावर घेऊन जर माझ्यासारख्या गाई केवळ परोपकारबुद्धीनें चिखलांतून काढतां, तर त्यांच्यावरील वृषभाच्या हक्काची लालसा तेवढी कां सोडून देत नाहीं बरें? वृषभ सुद्धां गर्भाच्या व इतर प्रकारच्या संकटांत गाय असतां तिच्यावर हक्कबजावणी करण्यास शरमतो! मग पुरुषांनीं–ज्यांना चिखलांबाहेर हिंडत बागडत असलेल्या हव्या तितक्या कालवडी शास्त्रास अनुसरून बाळगतां येण्यासारख्या आहेत,–त्यांनीं माझ्यासारख्या अडचणींत सांपडलेल्या गाईवर दया न करणें हा निर्दयपणा नव्हे काय? मी अनाथ अबला ह्यापेक्षां जास्त स्पष्ट रीतीनें सांगण्यास असमर्थ आहें! ( तोंडास पदर लावते. ) माझे—

रत्न०––बम्रूताईचें ह्मणणें रास्त आहे. व त्याचा विचार झालाच पाहिजे.

**बापु०**——मी स्वत: बभ्रूताईबरोबर विवाह करण्यास तयार आहें. आणि तेंही काकांच्या ह्मणण्याप्रमाणें.

**सर०**—जहागिरदारसाहेबांस आणखी दोन महिने कांहींच करितां येणार नाहीं.

**डॉ० पड०**——अगदीं बरोबर! लग्नाच्या बाबतींत कांहीं करितां येणार नाहीं! तसें करणें सर्टिफिकिटाविरुद्ध होईल! सर्टिफिकिटाची मुदत अजून संपली नाहीं.

**दिवाण**——मला बभ्रूताई पत्करीत असल्यास मी विवाह करून त्यांचें दास्यत्व करण्यास एका पायावर तयार आहें. विवाहप्रकार कसलाही असला तरी चालेल. मला दुसऱ्या कोणाचीही ह्या बाबतींत सल्ला घेण्याचें कारण नाहीं.

**नंद०**—ठीक आहे तर. आमचें काम झालें. आतां मी काकांना विचारून दिवस मुकरर करून आपल्यास कळवितों. ( बभ्रूताईस ) ताई, आतां आपलें काम झालें. आपण ह्या सर्वांची रजा घेऊन जाऊं या.

**व०**——एक गोष्ट ह्या मंडळीस व मुख्यत्वेंकरून दिवाणजींस सांगावयाची राहिली. ती सांगितली पाहिजे. ती ही कीं, परधन व परनारी यांचा अभिलाष माझ्या तपाला व 'पार्थिव' विवाहाला फार बाधक आहे. म्हणून निदान असल्या प्रकारचें पातक आपल्या हातून न होईल, अशी खबरदारी ठेवा. व पूर्वीं चुकून झालें असल्यास विवाह झाल्याबरोबर मला कळविण्यास विसरूं नका. ह्मणजे मला काय करावयाचें, तें मी करीन. ह्यांत चूक झाल्यास आपल्या दोघांपैकीं एकास मृत्युमुखीं पडावें लागेल, हें लक्षांत ठेवा. आतां सर्व मंडळीजवळ आह्मी रजा मागतों. कारण, काकांची अशी आज्ञा आहे कीं, येथें वर निश्चित झाला कीं, तावडतोब त्यांना कळविलें पाहिजे. ( सर्व मंडळी उठतात. बभ्रूताई, नंदकिशोर व कमलादेवी निघून जातात. )

**सर०**—पाहिलेंत ना, बापुसाहेब, तुमचे दिवाणजी कसे प्रामाणिक व हुशार आहेत ते! बम्लूताईला इतका खर्च करून आणिलेंत तुह्मी! आणि कांहीं खर्च न करतां सवरतां तिला उपटली दिवाणजींनीं! आतां तो तुमचा योगी भामट्या, का नंदकिशोर भामट्या, का तुमचे दिवाणजी भामटे, हें तुह्मींच ठरवा! तो योगी पुरा भामट्या आहे, असें मी तर पूर्वींच सांगितलेलें आहे. ( दिवाणजी निघून जातात. )

**बापु०**—काय बुवा, आपली तर ह्या कामांत कांहींच अक्कल चालत नाहीं. अगोदर मला ह्या दुखण्यापासून स्मृति रहात नाहींशी झालेली आहे. यामुळें कांहीं बाबतींत तर मला बोलतांच येत नाहीं. आणि काकांचें सुद्धां मला असेंच सांगणें आहे कीं, जी गोष्ट आपल्याला कळली नाहीं, त्यांत कधींही लुब्रेपणा करूं नये.

**सर०**—मग स्वस्थ बसा तर! आणि त्या लुच्चा दिवाणजीला म्हणावें कीं, ने बभ्रीला उपटून! आमचें तरी काय जातें? उद्यां जर आपल्या बायकोशीं बोलावयाला काकांचा परवाना लागूं लागला, तर तो ह्या जहागिरींत ज्यांना रहावयाचें असेल, त्यांनीं काढलाच पाहिजे!

**रत्न०**—मला वाटतें कीं, ह्या खाजगी कामांत टीका करतांना सुभेदारांचा घाट जहागिरदारांच्या जहागिरी कामासंबंधीं टीका करण्याचा आहे, हें बरोबर नाहीं. म्हणून त्यांनीं ह्या विषयावर आतां ज्यास्त बोलूं नये. बम्लूताईंनीं व नंदकिशोरसाहेबांनीं आपली बाजू सभेपुढें उत्तम रीतीनें मांडली असून त्यांत कोणत्याही व्यक्तीसंबंधानें विरुद्ध टीका नाहीं. सभेंतील मंडळीला जर त्यांचे विचार पसंत नसतील, तर त्यांनीं दुसरी सभा भरवून आपली नापसंती पाहिजे असल्यास दर्शवावी. परंतु माझें स्वतःचें तर असें मत आहे कीं, जर ह्या सभेचा असाच विचार असेल, तर निदान हा 'पार्थिव' विवाह खरा आहे अगर निव्वळ थोतांड आहे, तो कसा लावितात, त्याचा परिणाम काय, त्यापासून विवाहित जोडपें परस्परांशीं कसें वागतें, त्यास सुख होतें कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा बारकाईनें तपास करून मग जें

करणें असेल, तें करावें. उगीच एकमेकांवर विरुद्ध टीका करून वितुष्ट वाढविणें बरोबर नाहीं. व तसें करण्यापासून जगत्काका, नंद-किशोर व बम्भूताई आपल्या ठरीव कार्यांत माघार घेतील, असाही संभव त्यांच्या आजच्या निःस्पृही व सडेतोड वर्तनावरून दिसत नाहीं.

**डमरु**—आपण जर हें सर्व अध्यक्ष ह्या नात्यानें बोलत असाल, तर आमचें थोडें विवेचन होणें राहिलें आहे, तेवढें ऐकून घेण्याची तसदी घ्यावी. हें विवेचन स्वतंत्र मुद्याबद्दल असून त्यांत सांप्रतच्या विवाहविषयाचा काडी इतका सुद्धां संबंध नाहीं.

**रत्न**०—तसें असेल, तर मी ही सभा बरखास्त करितों. आणि मग आपल्यापैकीं ज्या कोणास जें कांहीं बोलावयाचें असेल, तें त्यांनीं खुशाल बोलावें.

( रत्नपारखी सभा बरखास्त करून अध्यक्षाच्या खुर्चीवरून उठून दुसऱ्या खुर्चीवर बसतात. )

**सर**०—मला थोडें बोलावयाचें आहे. तें हें कीं, बम्भूताईचा जहागिरदारांबरोबर जो पुनर्विवाह लावावयाचा, तो मोठ्या थाटानें लावून सर्व पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस किता घालून द्यावयाचा जो बेत होता, तो जगदीशाच्या अवकृपेनें तूर्त फसला आहे, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे! आमचा दुसरा असा बेत होता कीं, ह्या पुनर्विवाहाचें याज्ञिक धोंडभटजींनीं चालवावें व त्याबद्दल जहागिरदारांनीं त्यांस शंभर रुपये दक्षिणा द्यावी! पण हाही बेत फसला आहे. तेव्हां माझें असें ह्मणणें आहे कीं, धोंडभटजींस दक्षिणेशिवाय तूर्त एक पागोटें, एक धोतरजोडा, व माझ्या व जहागिरदारांच्या सहीची ‘याज्ञिकधुरंधर’ ह्या पदवीची सनद द्यावी. ही सनद माझ्याजवळ तयार आहे. ( सनद काढतो. ) ह्यावर मी सही केलीच आहे. जहागिरदारांनीं सही करावी. व रावबहादुर रत्नपारखी यांनीं ती सनद धोंडभटजींस बहुमानानें अर्पण करावी. ह्मणजे आजचें काम संपलें, असें ह्मणण्यास हरकत रहाणार नाहीं. पागोटें वगैरे पुढें देतां येईल!

**डमरु**—मला वाटतें कीं, जर धोंडभटजींस पागोटें आणि धोतरजोडा घ्यावयाचा आहे, तर तें देते वेळेसच ही सनद दिली, तर बरें दिसेल. बिचाऱ्या ब्राह्मणास आज नुसता कागद व पोकळ पदवी देऊन काय करावयाचें आहे ?

**धोंड०**--माझीही रावबहादुर डमरूंसारखीच नम्र विनंति आहे. पण जर सरसुभेसाहेबांची मर्जी आजच हा सन्मानविधि उरकून घेण्याचा असेल, तर धोतरजोडा व पागोटें ह्यांच्या बदला रोख पैसा दिल्यास ह्या प्रसंगीं मला त्याचा फार उपयोग होईल.

**सर०**--आज माझेजवळ रोख एक पैसाही नाहीं. सभेस येतांना पैसे कोण आणतो ? सनद खिशांतच होती, म्हणून ती तेवढी बरोबर आली आहे.

**धोंड०**--सभा आटोपल्यावर मी आपलेबरोबर आपल्या घरीं येतों पाहिजे तर. ह्मणजे आजचे कामाचा निकाल एकदाचा लागेल.

**सर०**—माझ्या एकट्याच्या घरीं येऊन काय उपयोग ? सभेची मंडळी काय वर्गणी देतात, मला किती द्यावी लागते, तें अजून कुठे ठरलें आहे. मला वाटतें कीं, रावबहादुर डमरूंनीं प्रथम धोंड-भटजींस पागोट्याची व धोतरजोड्याची किंमत म्हणून अजमासें पंचवीस रुपये द्यावे. व नंतर सवडीसवडीनें मंडळीकडून ते वसूल करावे.

**डमरु**--मला आणखी तीन महिने एक पैसा सुद्धां देण्यास सवड होणार नाहीं. नुकतीच माझी पहिल्या लग्नाची बायको बाळंतीण झाली असून हल्लींची महागाई, तुपाचा भाव, मुलांची व मुलींची फी, व पुस्तकांचा खर्च मनांत आणिला कीं, माझे डोळे रुपयासारखे पांढरे होऊन जातात. म्हणून माझी सरसुभेसाहेबांस व सर्व सभासदांस अशी विनंति आहे कीं, आजच्या सभेंत धोंडभटजींस सनद तेवढी अर्पण करावी, व सभा बरखास्त व्हावी. धोतरजोडा व पागोट्याचें पुढील सभेवर ढकलावें.

**रत्न०**—सभा बरखास्त झालेलीच आहे. धोंडभटजींसही आज सनदेची विशेष जरूर आहे, असें नाहीं. करितां हा सन्मानविधि पुढील सभेवर ठेवावा, हेंच बरें. आजपासून धोंडभटजींस 'याज्ञिकधुरंधर' ह्मणण्यास मात्र हरकत नाहीं. (सर्व जातात.)

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ६ वा.

**[ स्थळ—धोंडभटजींचे घरांतील खोली. धोंडभट पत्रावळी व द्रोण लावीत बसले आहेत. ]**

**धोंड०**—(स्वगत) एकंदरींत दिवाणजीच्या मरणाचें कोणाला कांहीं कळलें नाहीं, हेंच खरें. कोणी म्हणतो, अशानें मेला! कोणी म्हणतो, तशानें मेला! मिळून मेला मात्र खरा! आणि आज पंधरा दिवस होत आले, तरी अजून कशानें मेला ह्याचा पत्ता नाहीं! हीच तर मोठी मजा आहे!

(गुडघ्यापर्यंत पंचा नेसलेला, डोकीस रुमाल, अंगावर धोतर, हातांत सलकडीं, आणि खांद्यावर झारा व पळा टाकलेला अन्याबा प्रवेश करितो.)

**अन्याबा**—(पळा वगैरे खालीं ठेवून व तंबाकूची पिचकारी मारून) कां 'याज्ञिकधुरंधर,' कसला विचार चालला आहे? आणि इतक्या पत्रावळी कशाला रे? कांहीं प्रयोजनाचा बेत आहे वाटतें? पक्कान्नबिक्कान्नाचा बेत आहे, का नुसत्या पुरणपोळ्याच?

**धोंड०**—कसलें प्रयोजन आणि पक्कान्न घेऊन बसला आहेस! दररोजची भाकरी मिळण्याची पंचाईत येऊन पडली आहे. ह्या पत्रावळी खुद्द माझ्याचकरितां नव्हेत. त्या दुर्दैवी दिवाणजीच्या दिवसांकरितां आहेत! ह्याचें मी कंत्राट घेतलें आहे, तें पुरें केलें पाहिजे. पण आपली स्वारी आज इकडे कोणीकडे रस्ता चुकली?

**अन्याबा**—रस्ता चुकलों नाहीं, आणि सहजही आलों नाहीं. मुद्दाम तुझी गांठ घेण्याकरितांच आलों आहें. तसेंच कांहीं महत्त्वाचें काम आहे. येथें कोणी दुसरें नाहीं ना? ( इकडे तिकडे पहातो. )

**धोंड०**—आज घरांत कोणी नाहीं. मंडळी जेवावयास गेली आहेत. ती आणखी दोन तास तरी परत येत नाहींत खास. बोल तुला काय बोलावयाचें आहे तें.

**अन्याबा**—मी एक चिखलांत रुतलेली गाय बाहेर काढून तिला बाळगली होती, हें तुला माहीत आहे ना?

**धोंड०**—मग?

**अन्याबा**—ती नुकतीच एक महिन्यापूर्वी मेल्याचेंही तुला माहीत आहेच.

**धोंड**—होय, आहे माहीत. पुढें?

**अन्याबा**—पुढें सांगतों ना. ती जखीण होऊन तुझ्या बंगल्याच्या शेजारच्या पिंपळावर बसली आहे. ती काल भर दोनप्रहरीं येऊन मला भेटली, आणि म्हणाली कीं, "तुझ्याकडून दोन गोष्टी कबूल करवून घे. एक, तूं त्या बंगल्यांत शिळ्या भाकरींचे तुकडे जोडून ताज्या भाकऱ्या करण्याचें यंत्र तेथें उभें करणार आहेस, तें करूं नयेस. व दुसरें, ती दिवाणजीची विधवा बम्म्रूताई आहे ना? तिला तो बंगला रहावयास देऊं नये." पण काय रे? दिवाणजी अखेर कशानें मेला, हें तुला ठाऊक आहे का? कोणी म्हणतात कीं, काळीज फुगून मेला. आमची ती जखीण सांगत होती कीं, दिवाणजींनीं आणि तूं दोघांनीं मिळून जहागिरदारांचे कांहीं पैसे उपटण्याचा घाट घातला होता, त्या पापानें तो मेला. व बम्म्रूताईच्या योगदृष्टीच्या सामर्थ्यानें तो स्वर्गासही गेला!

**धोंड०**—हें पहा, अन्याबा, असल्या थापा जर तूं मारशील, तर त्या माझ्याजवळ बिलकुल चालणार नाहींत, समजलास! काय अगदीं सावकाश आणि जुळवून सांगतो आहे पण! तुझी ठेवलेली

रांड ! ती झाली जखीण ! ती माझ्या बंगल्या शेजारच्या पिंपळावर मला विचारल्याशिवाय बसली ! बरें, बसली त्यांत माझें कांहीं गेलें नाहीं ! पण ती आणखी मला अमुक करा, तमुक करा, असा हुकूम करते अं ! वा ! खूप बतावणी तुला करतां येते ! पण तिला सांगावयाचें होतेंस कीं नाहीं कीं, रांडे, धोंडभट आपल्या बंगल्याची वाटेल ती व्यवस्था करील ! तुझ्या बापाचें काय गेलें ? धोंडभटजी कांहीं तुला भिऊन वागणारा नाहीं ! पुरा यज्ञोपवीत धारण करणारा ब्राह्मण आहे तो !

( जखीण बुरखा घेऊन धोंडभटजीच्या समोर उभी राहून त्याची पगडी उचलते. धोंडभटजी घाबरून अन्याबाचे पाठीशीं जाऊन खालीं डोकें घालून व तोंडावरून पांघरूण घेऊन बसतो. )

**अन्याबा**—( जखिणीला ) अग, तूं आज फिरून कां आलीस ? मी तुला काल सांगितलें होतें ना कीं, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें धोंडभटाकडून करवीन म्हणून ? मग आज फिरून कां तसदी घेतलीस ?

**जखीण**—तुमच्या सांगण्यावर धोंडभटजीचा भरंवसा बसणार नाहीं, असें मला वाटल्यावरून मी आलें. पण आतां जातें. पण तेवढें माझ्या पैशाचें ब्राह्मणभोजन घालण्यास विसरूं नका बरं का ?

**अन्याबा**—पण त्याला कांहीं तरी मुदत पाहिजे. मी म्हणतों, पंधरा दिवसांची तरी—

**धोंड०**—( अन्याबास बारीक चिमटा घेऊन हलकेच ) लेका, एक महिन्याची तरी मुदत मागून घे. त्याचे आंत हिनें आपल्याकडे येतां कामा नये. एकादी शपथ घाल !

**अन्याबा**—मी म्हणतों, एक महिन्याची मुदत पाहिजे. त्याचे आंत तूं माझ्याकडे अगर धोंडभटाकडे येतां कामा नये. आलीस तर तुला बम्हूताईची शपथ आहे !

**जखीण**—ठीक आहे. मी एक महिनाभर वाट पहातें. पुढें मला जें करावयाचें, तें करीन. मी जातें तर आतां. ( जाते. )

**धोंड०**—गेली का रे ती?

**अन्यावा**--गेली! इतका भितोस कां तिला? तूं ब्राह्मण ना?

**धोंड०**—कोण लेकाचा भितो आहे? मी कांहीं भ्यालों नाहीं! तसें असतें, तर मी पळून नसतों का गेलों? तूं कोकण्या, तुला असल्या आचरट आचरणाची संवयच! आमच्यांत आचरटपणा कमी. पण त्याच्या ऐवजीं अक्कल व युक्ति देवानें जास्त ठेविली आहे. समजलास?

**अन्यावा**—कसली अक्कल आणि युक्ति? कर्माची? ब्रह्मतेज कमी! दुसरें काय! मी जरी असला धंदा करतों आहे, तरी दशग्रंथी ब्राह्मण आहें, समजलास! भिक्षुकींत कांहीं मिळेना, आणि सगळ्यांची ओशाळगत मात्र पदरीं पडे; म्हणून असला हा धंदा पत्करला! आतां दररोज ब्रह्मकर्म यथास्थित करून तीन चार रुपये खिशांत बाळगून एकाददुसरी चिखलांत रुतलेली अगर प्रसंगीं गोठ्यांतली देखील गाय बाळगण्याला मला कसली दिक्कत वाटत नाहीं. उत्तम धंदा चालून फिरून परमार्थही सहज होत आहे.

**धोंड०**—तें सगळें ठीक आहे. पण धंदा हलकट ना? तुला कोणी तक्याशीं घेईल का? अगर कोणी खुर्चीं बसावयास देईल का?

**अन्यावा**--काय तुझ्या त्या तक्याला आणि खुर्चीला घेऊन करतोस! मी चार तास अग्नीची सेवा केली कीं, वीस तास स्वतंत्र! कोणाचें आर्जव नको, अगर कोणी फट्ट ह्मणावयाला नको. आणि वर्षाचे कांठीं जेऊन खाऊन हजार बाराशेंला कांहीं कमी नाहीं!

**धोंड०**--हा वाद तूर्त राहूं दे. जो तो आपापल्या परी मोठा व चांगलाच आहे. पण काय रे? ही तुझी जखीण आमचा बंगला सोडून जाईल, अशी कांहीं शक्कल तुला सुचते का?

**अन्यावा**—मला एक युक्ति सुचली आहे. आणि म्हणूनच मी आज बुद्ध्या तुझ्याकडे आलों आहें. तुला पसंत पडेल, तर ती अमलांत आणण्यासही मी स्वतः तयार आहें. पण--

**धोंड०**--पण काय? सांगशील तर खरें. मला सर्व कळल्याशिवाय मी कांहीं सल्ला देणार नाहीं.

**अन्याबा**—तुला माहीत आहे कीं, बब्रूताई तूर्त रिकामी आहे. ती जर मला पत्करीत असेल, तर मी तिच्याशीं 'पार्थिव' अगर वाटेल तो विवाह लावण्यास तयार आहें. विवाह झाला, ह्मणजे बभ्रीला आणून ठेवतों तुझ्या बंगल्यांत! आणि मग ती आणि मी आपले चैनीनें तेथें राहून दिवस काढूं! बभ्री माझ्याजवळ असली, ह्मणजे मग त्या साळूताईच्या जखणीचा प्रपितामह आला, तरी मी भिणार नाहीं.

**धोंड०**—युक्ति ठीक आहे! पण तूं स्वतः कारकून नसल्यामुळें त्या युक्तीला हिशेबी स्वरूप तुला देतां आलें नाहीं. आतां तुझीच युक्ति, पण मी कशी करावी म्हणतों, तें ऐक! आपण दोघे बभ्रीशीं विवाह करूं. तूं अव्वल पति हो, मी दुय्यम होईन. विवाह झाल्याबरोबर तिला आणून ठेवूं माझ्या बंगल्यांत. ह्मणजे साळू जखिणीचा कायमचा बंदोबस्त झाला! पहिले सहा महिने तूं नवरेपणाचा हक्क चालीव, आणि त्या मुदतीचें बंगल्याचें भाडें दीडशें रुपये महिनाप्रमाणें तूं देत जा. पुढचे सहा महिने माझ्या वांटणीचे. त्या मुदतीचें तूं निम्में भाडें दे, ह्मणजे झालें!

**अन्याबा**—भाड्याच्या रकमेशिवाय मला सर्व कबूल आहे. भाड्याची रक्कम फार आहे. तितक्या रकमेंत मला एक दोन अडचणींत सांपडलेल्या गाई सहज बाळगतां येतील! आणि अगदीं स्वतंत्र रीतीनें! असल्या कामांत कोणाचा भागीदार होणें हितावह होणार नाहीं. आणि तुझ्यासारख्याचा होणें तर मला बिलकुल पसंत नाहीं. शिवाय माझ्याजवळ इतके पैसेही नाहींत.

**धोंड०**—त्या साळूताईचे पैसे काय केलेस रे? ते टाक खर्च करून! ठेवतोस कशाला?

**अन्याबा**—ते माझेजवळ थोडेच आहेत! ते आहेत बँकेंत साळूताईच्या नांवावर. ते मला मिळाले, तर कसलीच पंचाईत नाहीं. ते मिळाले, तर लागलीच एक सहस्र तेलंग जेवावयास घालून तिच्या ऋणांतून मोकळा तरी होईन! पण तें मोठ्या खटपटीचें काम आहे.

**धोंड०**--तें माझ्याकडे लागलें. मी सर्व तजवीज करतों. तूं मात्र आतां ऊठ. घरीं जाऊन चांगला पोषाख घालून ये. आपण नंदकिशोरबाबूंची गांठ घेऊन हें लग्नाचें आणि पैसे काढण्याचें काम त्यांजवरच सोंपवूं. तो मोठा चतुर आहे. आणि स्वतः मोठा बाणेदार वकील असल्यामुळें आपणाला हे पैसे काढण्याच्या कामांत त्याची फार मदत होईल. ऊठ, आतां वेळ घालवूं नकोस. उत्तम पोषाख, एक घड्याळ, आणि डोळ्यास चष्मा लावून, लौकर ये.

**अन्याबा**—( उठतो ) पोषाखाचें व घड्याळाचें ठीक आहे. पण चष्मा लावून मला कसें दिसणार ? त्याची मला संवय नाहीं.

**धोंड**--मूर्ख खरा तूं! दिसण्याकरितां का कोणी चष्मा लावीत असतो ? तुझा चेहरा खुलला पाहिजे ना ? स्वयंपाक करण्याला का तूं नंदकिशोराकडे जाणार ? जा घरीं! उगीच हेंगल घालीत बसूं नकोस. चष्म्यानें दिसत नसल्यास भिंगें काढून टाक. नुसता आंकडा नाकावर ठेवून ये. ऊठ. आणि परस्परच जा. मी मागोमाग आलोंच. आजच्या आज ह्या सर्व गोष्टींचा निकाल झालाच पाहिजे. (दोघे निघून जातात ).

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश ७ वा.

**( स्थळ—जहागिरदारांच्या वाड्यांतील कचेरीची जागा. नंदकिशोर हातांत पुस्तक व स्मरणी घेऊन मनन करीत बसले आहेत. अन्याबा उत्तम पोषाख करून, खिशांत घड्याळ, व नाकावर चष्म्याचा खोका चढवून, व हातांत काठी घेऊन प्रवेश करितो, व नंदकिशोरास नमस्कार करितो. )**

**नंद०**--( नमस्कार करून ) कोणीकडे ? जहागिरदारसाहेबांकडे का ?

**अन्याबा**—नाहीं. आपल्याकडेसच कांहीं कामानिमित्त आलों आहें.

**नंद०**—कसलें काम आहे ? कोर्टांत कांहीं मोकद्दमा अगर खटला बिटला आहे कीं काय ?

( धोंडभटजी प्रवेश करितात. )

**धोंड०**—( नंदकिशोरास नमस्कार करून ) तब्येत ठीक आहे ना ? मला वाटतें, येथील हवा आपल्यास बरोबर मानवत नाहीं. तोंडावरची सुरखाई जरा कमी झाल्यासारखें दिसतें. मला वाटतें, येथें आहां, तोंपर्यंत एकदा भोजन करण्याचा परिपाठ ठेवा. ह्मणजे येथील हवा आपणास उत्तम मानवेल.

**नंद०**—आमच्या मथुरेकडे एक वेळ भोजनाचाच पाठ होता, तोच येथेंही कायम आहे. कदाचित् ह्या बभ्रूताईच्या काळजीनें तब्येतींत फरक दिसत असेल. पण त्याला काय उपाय आहे ? बायकांच्या समजुती ! तिचा अजून आपला विवाह करण्याचा आग्रह आहेच. आणि काका तर सध्यां जहागिरदारांना विवाह करूं देत नाहींत. आणि दुसरें योग्य स्थळ अजून मिळत नाहीं. आम्ही तरी काय करावें ?

**धोंड०**—योग्य स्थळ ह्मणजे तरी काय ? नवरा पैसेवाला पाहिजे कीं काय ?

**नंद०**—छट् ! पैशाला काय घेऊन करतां ? थोडा शिकला सवरलेला, व्यवहारचतुर, चार लोकांत उठणारा बसणारा असला, ह्मणजे झालें ! मी तर म्हणतों कीं, पैसेवाला नसला तरच बरा. कारण, ह्या दिवसांत अन्यायोपार्जित द्रव्याशिवाय पैसेवाला होणें सामान्य मनुष्यास शक्यच नाहीं. आणि असें असणें, हें तर बभ्रीशीं विवाह करणाऱ्या पुरुषास अतिशय वावडें आहे, हें तुह्मांला त्या दिवाणजीच्या अनुभवावरून कळलेंच असेल. आणि ह्याच अटीमुळें बभ्रीला नवरा मिळण्याची मोठी अडचण पडते.

**धोंड०**—समजलों. पण एकाच वेळीं दोन पुरुषांशीं विवाह लावतील का बम्ब्रूताई ? आपल्याला कसें वाटतें ?

**नंद०**--तिला तर उलट बरेंच झालें ! एक नवरा शिलकेंत पडलेला वाईट काय ? मला वाटतें, ती आनंदानें कबूल करील. आणि काकाही कबूल करतील. शिवाय पार्थिव विवाह एकापेक्षां जास्त पुरुषांशीं लावतांही येतो. तसा पुनर्विवाह लावतां येत नाहीं. मी ह्मणतों, आपण ह्मणतां त्याप्रमाणें ईश्वरानें जुळवून आणिलें, तर गंगेंत घोडे न्हायलेच ह्मणावयाचे !

**धोंड०**--ह्या कामांत कांहीं हातदाबी करावी लागली, तर पैसे कोण खर्च करणार ? आपण ? का बम्ब्रूताई ? का काका ? का जहागिरदार ?

**नंद०**- पैसे असे किती लागणार ? हजार पांचशें रुपये मी सुद्धां खर्च करीन. जास्ती लागल्यास बम्ब्रूताई करील. तिच्या नांवावर तीस हजार रुपये बँकेंत आहेत. तीही कांहीं भिकारी नाहीं.

**धोंड०**--आम्ही दोघे--मी आणि हे आनंदराव--विवाह करण्यास तयार आहोंत. पुढचा ठराव कोणाशीं करावयाचा ? आपल्याशीं कीं त्या जगत्काकांशीं ?

**नंद०**--जगत्काकांशीं करावा हेंच बरें. ते आणि कुशंभटजी गर्गे, ह्या पार्थिव विवाहविधींचे जाणते आहेत. आपण उभयतां त्यांचेकडेसच जा. ह्मणजे चटकन् निकालास लागेल.

**धोंड०**—आपण नाहीं का या कामांत एकादा शब्द खर्च करणार ?

**नंद०**—हो हो, न करावयाला काय झालें ? पण मी असल्या कामांत दिवसाची हजार रुपये फी घेत असतों. ती आपल्याला कबूल असली, तर मी सुद्धां हें काम अंगावर घेऊन करीन. मला काय ?

**धोंड०**—फीचें मान कमी होण्यासारखें आहे का ?

**नंद०**--मी फी कमीच सांगितली आहे. कारण, आमच्या बम्ब्रूताईचा विवाह होणें मलाही इष्टच आहे. तसें नसतें, तर पांच

हजार मागितले असते. मी पंचपारिक्ष्य वकील आहें ! उगाच एक दोन परीक्षा दिलेला नाहीं, हें लक्षांत आणा ! शिवाय, मी असलों तर लग्नाचे कागदपत्र असे तयार करून देईन कीं, प्रत्यक्ष तो स्त्री-उपव्या इंद्र जरी बभ्रीवर हक्क सांगूं लागला, तरी त्याचें सुद्धां कांहीं चालणार नाहीं. मग इतरांची कथा काय ?

**धोंड०**--बरें, ह्याच फींत आमचें-ह्मणजे ह्या आनंदरावजींचें-दुसरें एक बँकेंतून पैसे काढण्याचें काम आहे, तें आपण कराल का ?

**नंद०**--हे आनंदराव कोण ? किती पैसे काढावयाचे आहेत, तें कळलें, ह्मणजे फींचें सांगतां येईल. पांचपन्नास कमी जास्ती झाल्यास माझी हरकत नाहीं. पण सर्व हिशेबीं झालें, ह्मणजे तुह्मांला बरें आणि मलाही बरें.

**धोंड०**--हे आनंदरावजी दशग्रंथी विद्वान् आहेत. हल्लीं मुदपाकखान्यांतील कामाचीं अगर वाकनिशी कामाचीं कंत्राटें घेत असतात. हजार दीड हजारांची प्राप्ति आहे. स्वतंत्र आहेत. ह्यांचे फक्त दोन चार हजार रुपये काढावयाचे आहेत. मी आपल्याला माहीतच आहें.

**नंद०**--आपण 'याज्ञिकधुरंधर' मला माहीत आहांत. आणि आनंदरावजीही कांहीं चारपांचशेंला महाग नाहींत. मला वाटतें, आपण फींत कमी न कराल, तर बरें पडेल. आणखी चारपांचशें रुपये द्याल, तर मी आतांच्या आतां हीं दोन्ही कार्यें उरकून टाकून विवाहासाठीं तुह्मांला बोलावणेंच पाठवितों. मग झालें कीं नाहीं ?

**धोंड०**--ठीक आहे. आम्ही विचार करून आपल्याला कळवितों.

**नंद०**--अजून विचार करावयाचा असल्यास फी जास्ती पडून ह्या आतांच्या बोलण्यांत गेलेल्या वेळेचा चार्ज तुह्मांला द्यावा लागेल. मग आपल्या इच्छेस येईल, तसें करा. आणि विचार करावयाचें ठरलेंच, तर उठा कसे येथून ! मला दुसरीं महत्त्वाचीं कामें आहेत.

तूर्त प्रत्यक्ष यम आला, तरी त्याच्याशीं चार शब्दही बोलण्याला मला वेळ नाहीं! चला उठा. ( आपण उठावयास लागतो. )

**अन्याबा** – ( धोंडभटजीस ) जाऊं द्या हो! उगीच कोरित बसण्यांत अर्थ नाहीं. वकीलसाहेबांचा उगाच वेळ कां घ्यावा? ( नंद-किशोरांस ) साहेब, आपण आमचीं दोन्ही कामें पत्करा. आपण सांगाल, ती फी देण्यास आम्ही कबूल आहों.

**नंद०** —तुह्मी कबूल आहां. पण आमच्या याज्ञिकधुरंधरांच्या हातावर पैशाची भली जाड रेषा आहे. पैसा हातांतून बाहेर जावयाचाच नाहीं. नेहमीं उलाढाली सुरू आहेत. काय हो, धोंडभटजी, त्या भाक-रीच्या यंत्राचें काय झालें? येऊन मांडामांड झाली का?

**धोंड०** —मांडामांड व्हावयाची आहे. त्यासंबंधींही मला आप-ल्याला सल्ला विचारावयाचाच आहे. पण मी आपल्या फीला जरा भितों.

**नंद०** —ती तर ब्रह्मदेवाला सुद्धां चुकावयाची नाहीं बाबा! फीची कुरकुर असेल, तर उठा कसे. मला जाऊं द्या, मग तुम्ही वाटेल तें करा.

**धोंड०** —बरें, आपण सांगितलेली फी मी सध्यां तरी नाकबूल करीत नाहीं. आपण विवाह ठरवून आह्मांला बोलवा. आपल्या बोला-वण्याची आम्ही वाट पहात बसतों.

**नंद०** —ठीक आहे. दोन तासांचे आंत आपल्याकडे बोलावणें आलेंच म्हणून समजा. ( सर्व उठतात. ) [ पडदा पडतो. ]

( पडद्याबाहेर )

**धोंड०** —( अन्याबास ) तूं मोठा मूर्ख आहेस. उगीच उतावीळपणा केलास. हें काम मी फुकटांत चार इकडच्या तिकडच्या गप्पा मारून ठोकणार होतों.

**अन्याबा** —बोडकें ठोकणार होतास आपलें! तो कांहीं अन्याबा नाहीं लागला. जाडा वकील आहे तो. तुझ्या गप्पांना तो थोडाच भुलणार!

**धांड०**—अरे, मी एक नवीन युक्ति शोधून काढली आहे. ती त्याला सांगणार होतों. तूं उगीच मध्यें घाई केलीस. हे वकील व विद्वान् लोक असल्या नव्या शोधाचे मोठे भोक्ते असतात.

**अन्याबा**—तूं कसला शोध लावला आहेस रे?

**धोंड०**—तुला सांगतों पाहिजे असल्यास. पण तूं मात्र कोणाला ती युक्ति सांगूं नकोस इतक्यांत. सरसुभेसाहेबांच्या मार्फत ती मी प्रसिद्ध करणार आहे. युक्ति फार व्यवहारोपयोगी असून थोड्या खर्चांतली आहे.

**अन्याबा**—अशी युक्ति तरी काय आहे, बुवा?

**धोंड०**—ती युक्ति ही कीं, हल्लीं जो नुसता चष्मा लोक लावितात, त्याला ' चष्मा-फाणसची ' जोड द्यावयाची! बटाट्या एवढे फाणस तयार करून फुलवातीसारख्या लहान मेणबत्त्या रबरी स्टँड-वरती बसतील, असे स्टँड तयार करावयाचे. व हें सर्व यंत्र कानापाशीं जें चष्म्याच्या आंकड्याचें टोंक असतें, त्यावर अलुद बसवून द्यावयाचें.

**अन्याबा**—युक्ति नामी आहे खरी! आणि आंधळ्या लोकांत तर त्याची अतिशय मागणी होईल. मला वाटतें, त्यांतच थोडी सुधारणा करून बायकांच्या खोप्यावर फाणस लावण्याचें केलें, तर फारच उपयोग होईल. पण सध्यां ह्या युक्तीच्या मागें लागावयाचें, का बभ्री हस्तगत करून साळू जखणीचा नायनाट करावयाचा?

**धोंड०**—हो हो, खरेंच. तो नंदकिशोर आपणाकडे दोन तासांचे आंत बोलावणें पाठविणार आहे. मग उगीच असल्या गप्पांत वेळ घालविणें बरें नाहीं. चल तर, तूं आपल्या घरीं जाऊन वाट पहात बैस. आणि मीही आपल्या घरीं जाऊन वाट पहात बसतों. (जातात.)

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ८ वा.

**( स्थळ—धोंडभटजींचा बंगला. धोंडभटजी पोषाख करून खुर्चीवर बसले आहेत. बभ्री त्यांच्यापुढें शुभ्र वस्त्र परिधान करून उभी आहे. )**

**बभ्री**—(तीन चार कागद धोंडभटापुढें टाकून ) एवढीं डॉक्टराचीं बिलें तरी इकडून दिलींच पाहिजेत. दुसरें कोण देणार बरें ?

**धोंड०**—( बिलें पाहून व पगडी टेबलावर आपटून ) अबब ! चार हजार रुपये ! मी तर साफ देणार नाहीं. माझ्याजवळ नाहींच एवढी रक्कम अगोदर! मग देण्याचें पुढें !

**ब०**—जवळ नसेल. मी आहे म्हणत नाहीं. पण अशा प्रसंगीं कोणाकडून तरी उचापत काढलीच पाहिजे. तिकडला मला आतां बिलकुल भरंवसा नाहीं. तेवढी साळू जखणीची रक्कम बँकेंतून निघून कारणीं लाविली, ह्मणजे मी मुक्त झालों, अशी घोकणी आज दुपारपासून सुरू झाली आहे. नंदकिशोरबाबांना मी बोलाविलें होतें. पण अजून ते कसे आले नाहींत, कोण जाणें. ते कांहीं तरी तजवीज करते.

**धोंड०**—ते काय तजवीज करणार ? ते करतील, तें आमच्यानें नाहीं का होणार ? बायकांच्या ज्या वेड्या समजुती म्हणतात, त्या ह्याच ! उगीच मला त्या नंदकिशोराचें कौतुक सांगूं नकोस. काडीचाही त्याचा अशा प्रसंगीं उपयोग होणार नाहीं. उगीच पैसे मात्र माझ्याकडून हगवील, झालें !

**ब०**—माझा आग्रह नाहीं. मग उठायचं आणि डॉक्टर पडघमला बोलवायचं. तिकडे अगदीं घशाला कोरड पडली आहे. पाणी तरी देऊं का चुळकाभर ?

**धोंड०**—दे दे ! एक ग्लासभर का देईनास ? चांगला माठांतल्या गार पाण्याचा एक ग्लास दे.

**ब०**—भलतेंच ! थंड पाणी कसें देऊं ? ताप अंगांत कोण ! थंड पाण्यानें वायु बियु झाला तर ? म्हणून ह्मणतें कीं, डॉक्टरला आणायचंच एकदा. ह्मणजे—

( नंदकिशोर प्रवेश करितो. )

**नंद०**—डॅाक्टर कशाला ग ताई ? आनंदरावांचें जास्ती आहे कीं काय ?

**ब०**—तें मी काय सांगूं ? शोष अतिशय पडला आहे, आणि एकसारखं पाणी पाणी चाललं आहे.

**नंद०**—मग सोडावॉटर दे. एक बाटलीनें काम होईल !

**ब०**—सोडावॉटर घरीं कुठलं ? मी ह्मणतें, तें तरी आणा. ह्मणजे तिकडे नेऊन देतें.

**नंद०**—ह्मणजे ! एक सुद्धां बाटली घरांत नाहीं आज ! धन्य तुमची दोघांची ! हजारों बाटल्या त्या खाद्यपेयाराम सदनांत उडत असतील. आणि घरीं एक सुद्धां नाहीं ह्मणतां, ह्याला काय ह्मणावें ? कां धोंडभटजी, आजारी माणसाला उत्तम जपतां बुवा तुह्मी !

**ब०**— बरें, मी जातें आंत. तिकडे अगदीं घाबरं व्हायचं होतं. आपल्यापैकीं कोणी तरी जाऊन सोडावॉटर आणा, अगर सरते शेवटीं डॉक्टरला तरी आणा. ( जाते. )

**नंद०**—जा, धोंडभटजी, उठा. डॉक्टरला घेऊन या. आणि तशाच सोडावॉटरच्याही दहा वीस बाटल्या आणा.

**धोंड०**—दहा वीस कशाला हो ? काय रोग्याला स्नान घालणार वाटतें ?

**नंद०**—वीस तरी निदान पाहिजेतच. पांचसात मी पिईन, पांचसात डॉक्टरला लागतील, व एक दोन तुह्मी घ्या.

**धोंड०**—छट् ! आपण कधींही ओंवळ्यानें केलेलें सोडावॉटर घेत नाहीं. मला लागतें, त्या वेळीं मी धावळी नेसून करीत असतों,

समजलांत! मी दिसतों असा, पण माझें सोंवळें ओवळें अगदीं जेथल्या तेथें आहे, बरें का?

नंद०—असेल! नाहीं कोण म्हणतो? मग दहा बारा तरी आणा. आणि तसेंच येतांना डॉक्टरला आणा. उठा!

धोंड०—माझें ऐकाल, तर कांहीं एक करूं नका. स्वस्थ बसा. त्या आनंदरावाच्या स्वप्नांत ती त्याची साळू जखीण आली होती. तिनें त्याला साफ सांगितलें आहे कीं, ह्या दुखण्यांतून तूं उठणार नाहींस! म्हणून म्हणतों, उगाच धडपड कां करा?

नंद०--तें सगळें ठीक आहे. पण यत्न तर केला पाहिजे ना? शिवाय बभ्री जर इकडे आली, आणि तिनें जर आपणास स्वस्थ बसलेलें पाहिलें, तर ती काय ह्मणेल बरें?

धोंड०--मोठी पंचाईत आहे, बुवा. डॉक्टरचें चार हजारपर्यंत आतांच देणें निघत आहे. त्यानें कांहीं रक्कम मागितली तर? म्हणून म्हणतों कीं, मी येथेंच कोठें तरी लपतों. बभ्री आलीच तर सांगा, मी डॉक्टराकडे गेलों आहें म्हणून!

नंद०--ठीक आहे. मग कोठें तरी कां? ह्या टेबलाखालींच लपा!

धोंड०--शाबास! खाशी युक्ति! मला वाटत होतें कीं, तुमचा नुसता झोंकच पाहून घ्यावा! पण वकिली पेंच आहेत खरे तुमच्यांत! आणि तेही मोठ्या गमतीचे आहेत! (टेबलाखालीं लपतो.) बभ्री आलीच, तर मला कांहीं तरी खूण करा, बरें का? ह्मणजे मी गप्प बसेन.

नंद०—मी म्हणतों, तुह्मी बोलूंच नका.

धोंड०--(टेबलाखालून) वा! तसें कसें चालेल? मला तुमचा सल्ला घ्यावयाचा आहे. आणि तो आतां आजच्या आजच घेणें जरूर आहे. लांबणीवर टाकणें मला मोठ्या धोक्याचें वाटतें.

नंद०--बरें आहे. तर बोला. पण माझ्या फीचें—

( बभ्री प्रवेश करिते. )

**ब०**—कोणाची फी? डॉक्टरची का? परत येणें नाहीं झालें वाटतें! बरें, मी जातें तर मग. जरा डोळा लागला आहे. पण हांक मारणें झालें, तर तेथें कोणीच नाहीं. डॉक्टर आले, ह्मणजे आंतच घेऊन या, बरं का. मी वाट पहात तेथेंच बसतें. ( जाते. )

**नंद०**—हं, धोंडभटजी, या आतां बाहेर कसे. बभ्रूताई गेल्या आंत.

**धोंड०**—( बाहेर येऊन नंदकिशोराजवळ खुर्ची सरकावून बसतो. ) मला जो सल्ला पाहिजे आहे, तो ह्या तुमच्याच बभ्रीच्या कामांत. आणि फी कसली मागतां हो?

**नंद०**—आमची बभ्री असली म्हणून? माझें स्वतःचें काम असलें, तरी आमच्या धंद्याच्या रिवाजाप्रमाणें मला वकिली फीची रक्कम माझ्या खात्यास खर्च लिहून वकीलखात्यास जमा करावी लागते, महाराज! तेव्हां तो पैसा वांचतो. उगीच नव्हे! धंद्यांत बभ्री बिभ्री मी कांहीं जाणत नाहीं. आणि बभ्रीचेंच काम असेल, तर तिला बोलूं द्या. तुह्मी कां उगाच मध्यें लुडबुडतां?

**धोंड०**—माझेंही त्यांत थोडें काम आहेच. मात्र सगळें नाहीं. माझें अर्धें आणि बभ्रीचें अर्धें.

**नंद०**—अर्धें आणि पाव कुठे काम असतें का? तुह्मी तसें समजत असलां, तरी तें मी सगळेंच समजतों. तुह्मांला तुमच्या कामाबद्दल सगळी फी द्यावी लागेल!

**धोंड०**—( त्रासून व कपाळावर हात ठेवून ) आतां माझ्या मिशा उपटा तुह्मी आणि ती तुमची बभ्री मिळून! काडीचीही तुह्मांला मुरवत नाहीं! काय त्या तुमच्या अकलेला व युक्तीला घेऊन जाळावयाचें! हें करूं का?—काढा फी! तें करूं का?—काढा फी! हें करूं नको का?—काढा फी! तें करूं नको का?—काढा फी!

फीशिवाय तुमचें बोलणेंच नाहीं. अखेरीस ही फीच तुमचे छातीवर बसून तुह्मांला फें फें करावयाला लावील ना! ह्याचा कांहीं विचार करा!

**नंद०**—हें पहा, धोंडभटजीनाना, सरळ बोलावयाचें असेल, तर माझ्याशीं बोला. वांकड्यांत शिरावयाचें असेल, तर मी बम्रीला बाहेर बोलावून जातों कसा. मग घाला तुम्ही दोघे जण गोंधळ. माझें काय जातें?

**धोंड०**—नको, महाराज. मी आपले पाय धरतों. तेवढें करूं नका. कृपा करून माझी तेवढी ह्या बम्रीपासून सुटका करा, आणि मग जा आपण वाटेल तिकडे. फी मात्र माझ्या ऐपतीप्रमाणें थोडी कमी झाली, तर पहा.

**नंद०**—(उठून जाऊं लागतो.) मी जातों कसा. तुम्ही आपलें येऊन जाऊन आमच्या फीचें काढावयाचें! आम्ही काय म्हणून फी कमी करावी हो?

**धोंड०**—मग नाइलाज आहे. माझ्याजवळ एक शिवराई–फुटकी कवडी सुद्धां–नाहीं आज.

**नंद०**—शिवराईची कोणाला जरूरी आहे? काम करून घ्यावयाची इच्छा आहे ना? बस्स आहे.

**धोंड०**—इच्छा पूर्ण आहे. पण तुमच्या फीला जरा भितों.

**नंद०**—अगदीं भिण्याचें कारण नाहीं. ह्या छापील नमुन्या-खालीं सही करून, त्यांत मिळकत असा शब्द आहे त्यावर फुली करून, बाजूस तुमच्या स्थावर जंगम मिळकतीचा तपशील करा. आणि तारीख घालून द्या कसा!

(पडद्यांतून बम्रूताई ह्मणते: "आले का डॉक्टर? लौकर आंत आणा आले असल्यास!")

**नंद०**—आतां इतक्यांत ते एक दोन 'व्हिजिट्स' करून येणार आहेत. आले कीं, आंत आणतोंच त्यांना. तूं तेथेंच बैस.

( धोंडभटजींस ) हूं, आटपा लौकर. नाहीं तर मला तरी जाऊं द्या डॉक्टराकडे. ( उठतो. )

**धोंड०**—झालें, झालें! जरा बसा तर खरे. शाई लेखणी तर आणूं द्याल कीं नाहीं!

**नंद०**—( फाउनटन पेन काढून ) हं, हें घ्या. करा सही. आटपा. ह्मणजे मी लागलीच निघून जातों डॉक्टराकडे.

**धोंड०**—हं, ही घ्या सही. ( कागद देतो. ) पण आमच्या आणि बभ्रीच्या संबंधाबद्दल करावयाचें, तें राहिलेंच. तें झाल्याशिवाय मी बरा जाऊं देईन?

**नंद०**—हो, खरेंच. सगळेंच मुसळ केरांत! तुम्ही आतांच्या आतां बभ्रीच्या नवरेपणाच्या हक्काचा राजीनामा देऊन मोकळे व्हा कसे. ( दुसरा छापील नमुना काढून धोंडभटजींस देतो. ) हं, करा ह्या वरच्या ओळीवर सही. खालची ओळ बभ्रीला सही करण्याकरितां ठेवा. पुढील व्यवस्था मी करीन. आटपा! आणि ( पहिला कागद पुढें करून ) ह्या पाहिल्या नमुन्यांत तुम्ही सगळी मिळकत नमूद केली नाहींतच. शिळ्या तुकड्याच्या ताज्या भाकऱ्या करण्याचें यंत्र यांत नाहीं. लांकडाची वखार नाहीं. हें काय बरें असें, भटजी?

**धोंड०**—भाकऱ्यांचें यंत्र तुह्मांला दिल्यावर मी काय दोन्ही हातांनीं वाजवूं वाटतें? लांकडांची वखार माझ्या भावाची आहे! आम्ही विभक्त आहोंत!

**नंद०**—तें कांहीं चालणार नाहीं. हें घ्या पेन, आणि लिहा. तुमची मी चांगली व्यवस्था ठेवीन. काळजी करूं नका.

( बभ्री पडद्यांतून: "अहो, बाहेर काय करतां अजून? कोणी तरी आंत या! मी एकटी येथें काय करूं?" )

**नंद०**—आलोंच. ताई, तूं अगदीं घाबरूं नकोस. ( धोंडभटास ) हं, लिहिलेंत का? आणा कागद पाहूं!

**धोंड०**--हं, ध्या एकदाचें ! तुमच्या मनासारखें होऊं द्या. माझें चांगलेंच वाटोळें केलेंत. पंचपारिक्ष्य वकिलच तुम्ही ! कमी कां कराल !

**नंद०**—( कागद खिशांत घालून ) तुम्ही निर्धास्त रहा. तुमचें अखेरीस चांगलेंच करीन. मी जातों आतां डॉक्टराकडे. तुम्ही बसा येथें. बम्री आलीच, तर मी फिरून डॉक्टराकडे गेलों आहें, म्हणून सांगा. ( जातो. )

**धोंड०**—एकंदर लफंग्या खरा. काय गुलामानें सगळाच कीं हो खव्याचा गोळा पटकावलान्! पण ह्मणावें, मी शेरास सव्वाशेर आहें ! पहातों काय करतोस तें ! आपणही आतां येथून चालतें व्हावें. जें व्हावयाचें असेल, तें होऊं द्या. ( जातो. )

[ पडदा पडतो. ]

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**( स्थळ—जहागिरदारांच्या वाड्यांतील रंगमहाल. कोचावर एका बाजूला जहागिरदार व दुसऱ्या बाजूला बभ्री बसली आहे. )**

**जहागिरदार**—बभ्रे, आतां लांब काय म्हणून? तुझें व्रतानुष्ठान संपूर्ण आज झालें ना? मग आतां काय हरकत राहिली आहे? जरा जवळ ये! येथें आतां तुझ्या व माझ्यावांचून तिसरें कोणी आहे का?

**बभ्री**—चांगलें! इतका वेळ जें काकांनीं पढविलें, आणि फिरून इकडे येतांना जें बजाविलें, तें इतक्यांत विसरायचं वाटतं?

**जहा०**—तें सगळें थोतांड आहे, मी तुला खात्रीनें सांगतों. कसला हा सोमयाग? कसलें भागीरथीचें स्नान? आणि कसलें विश्वेश्वराचें दर्शन? कांहीं तरी खुसपट घालून ठेवावयाची काकांची चालच आहे! बरें, इतकें केलें, तरी पार्थिव विवाहाची सबब पुढें आहेच. पण मी तुला खास सांगतों कीं, जगत्काकांनीं अशी टंगळमंगळ लाविली, तर मी त्यांना येथून हांकलून देईन! असल्या कामांत मी कोणाची मुरवत ठेवणारा नव्हे!

( जगत्काका प्रवेश करितात. बभ्री उठून एकीकडे बसते. जहागिरदार त्यांना आपल्या जवळ बसवितात. )

**जगत्काका**—बभ्रे, बाळे, व्रत कायम आहे ना? तुम्ही दोघेंच येथें आहांत, म्हणून सहज विचारलें.

**ब०**—( पदर सांवरून ) इश्श! परकं का आहे कोणी येथें? तिकडे अगदींच का कळत नाहीं?

**जगत्काका**—कळत नाहीं, कोण म्हणतो? पण त्या कामानें शंकराला सुद्धां त्राहि त्राहि करून सोडलें. मग आपण यःकश्चित् मनुष्यकोटींतले! ह्मणून ह्मटलें, आणखी पंधरा दिवस!—फार झालें, तर वीस! मग घाला धिंगाणा वाटेल तसा. सोमयाग पांच सहा दिवस! आणि काशीची ओव्हरयात्रा दहा--फार झालें तर बारा दिवस!

(कुशंभट घाईघाईनें प्रवेश करितात.)

**कुशंभट**--काका, तुह्मी इकडे का आलांत! मी तुह्मांला वाडाभर शोधतों आहे केव्हांचा! ते ज्ञानसागर पंडित आपली केव्हांची वाट पहात आहेत. ते दक्षिणी श्रौती त्या पंडितजींना एक शब्द सुद्धां बोलूं देत नाहींत.

**जगत्काका**--मी पंडितजींना सांगितलें होतें कीं, तुह्मी ह्या दक्षिणी मंडळीबरोबर वादविवादांत वेळ न घालवितां एकदम काशीस जाऊन मैत्रेय ऋषींना ही सर्व हकीकत सांगून त्यांचें आज्ञापत्र घेऊन या म्हणून. अजून ते गेले नाहींत का? तुह्मी जाऊन पंडितजींची आतांच्या आतां काशीस रवानगी करा कशी! चला, नाहीं तर मीच येतों. पंडितजींनींच काशीस गेलें पाहिजे.

(कुशंभट व काका जातात. आणि बभ्री त्यांचे मागून जाते.)

**जहा०**--(बभ्रीला जातांना) बभ्रे, अग बभ्रे, जरा थांब कीं. त्या म्हातारड्यांना जाऊं दे. तुला काय पंडितजीशीं करावयाचें आहे? जरा मागें तर बघ. (बभ्री थोडी मागें वळते, व जहागिरदारांकडे पहाते.)

(जगत्काका पडद्यांतून: "बापु! अग बभ्रे! चला, चला लौकर. उगीच घोटाळूं नका. तुमचेंच काम आहे अगोदर.")

(बभ्री जाते.)

**जहा०**—जा म्हणावें त्या थेरड्याला, आणि कर तूंच त्या बभ्रीला घेऊन सोमयाग! आणि उडव पैसा! पाण्यासारखा पैसा खर्च करतो आहे, आणि इतकें करूनही बभ्रीशीं मला चार शब्द सुद्धां

बोलूं देत नाहीं. ह्याला म्हणावें प्रारब्ध! ह्याला म्हणावें पूर्वसंचित!

( जगत्काका पडद्यांतून: "बापु, चल रे बाबा लौकर. आलास का?" )

**जहा०**--काका, आलोंच. माझें अंगवस्त्र येथें कोठें सांपडत नाहीं, तें पहातों हो. तें बभ्रीबरोबर चुकून गेलें वाटतें. (जातो.)

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश २ रा.

**( स्थळ—जहागिरदारांच्या वाड्यांतील मागील चौकांतील खोली. जगत्काका गोमुखींत हात घालून स्वस्थ बसले आहेत. इतक्यांत नंदकिशोर प्रवेश करितो. )**

**नंद०**---इकडे येऊन का बसले आहांत? मी शोधतों आहें तुम्हांला सर्व वाड्याभर. बरें केलेंत एकपरी. काय तिकडे त्या यज्ञ-मंडपांत हुंब्रेतुंब्रे न् डोकें फोडाफोडी चालली आहे त्या ब्राह्मणांची, ती पुसूंच नका!

**जगत्काका**--( गोमुखींतून हात काढून व ती कपाळाला लावून खालीं ठेवितो. ) अजून दंगा संपला नाहीं का? मीं पंडितजींना सांगून आलों होतों कीं, मैत्रेय ऋषींकडून आज्ञापत्र येईपर्यंत स्वस्थ बसा. कोणाला कांहीं एक बोलूं नका.

**नंद०**---वा! तसें कसें चालेल? धोंडभटजीसारखे निव्वळ घंटाबडवे जर तृतीय सवनांत घसा फोडूं लागले, आणि कोणावर पाटच उगार, कोणाला दर्भांची जुडीच हाण, असे बेताल होऊं लागले, तर पंडितजींनाच काय, पण आमच्यासारख्या वेदशून्य मंड-ळीला मुद्रां अवसान चढल्याशिवाय रहाणार नाहीं. मग पंडितजीं-सारख्या चतुर्वेदी व षट्शास्त्रपारंगत मुनींना कसें स्वस्थ बसवेल?

**जगत्काका**—तें खरें, पण आपण हा याग ह्या हट्टी ब्राह्मणांकरितां करीत आहोंत, का दैवी कार्य उरकून घेण्याकरितां करीत आहोंत बरें? धोंडभटजींना आणि त्या दक्षिणी श्रौती ब्राह्मणांना साफ जाऊन सांगा कीं, तुह्मांला ह्या कामांत बोलण्याचें मुळींच कारण नाहीं. तुमची दक्षिणा तुह्मांला कांहीं एक न करितां मिळेल.

**नंद०**—दक्षिणेचें नांव काढलें, तर आतांच्या आतां मोठा बिकट प्रसंग येऊन बेतणार आहे! कारण, त्या धोंडभटजींनीं आणि त्याच्या त्या सुधारक मंडळींनीं श्रौती फोनोग्राफ तयार करून आणला आहे. आणि त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, "आम्हांला ह्या यागांत धोंडभटजीशिवाय एकाही ब्राह्मणाची जरूर नाहीं! धोंडभट, ज्याचेकडून तो फोनोग्राफ तयार करविला आहे तो बोहरी, आणि सशास्त्र पशुवध करणारा एक कसाई, इतकी मंडळी असली, ह्मणजे बस्स आहे! आणि तुह्मी जी दक्षिणेची रक्कम खर्च करणार आहांत, त्याच्या निम्या रकमेंत आम्ही हें यागाचें कंत्राट पुरें करितों!" आतां शिकस्त झाली कीं नाहीं? म्हणून म्हणतों कीं, दक्षिणेचें नांव काढूं नका. निदान मैत्रेय ऋषींचें आज्ञापत्र येईपर्यंत तरी कांहीं बोलूं नका.

**जगत्काका**—मला वाटतें, तूं जाऊन त्या पंडितजींना इकडेच घेऊन ये. आम्ही मैत्रेय ऋषींना सर्व हकीकत कळविली आहे. श्रौती फोनोग्राफाची गुणगुण माझ्या कानावर आली होती. तीही साग्र हकीकत आम्ही कळविली आहे. मैत्रेय ऋषींकडून उत्तर आज आलेंच पाहिजे. एक दोन तास दम धरा म्हणावें. असें ब्राह्मण व इतर मंडळींना सांगून पंडितजींस आणि कुशंभटास तेवढें हलकेच इकडे आण.

(कुशंभट पळीपंचपात्री घेतलेला व डोकीवर टोपीसारखी धावळी बांधलेला असा धापा टाकीत प्रवेश करितो.)

**कुशंभट**—काका, हा याग बंद करा कसा! अगर तुह्मांला करणेंच असेल, तर दुसरीकडे कोठें तरी—नर्मदेच्या कांठीं—एकां-

तांत जागा पाहून तेथें करा. येथें कराल, तर एकदोघांचा घात केल्याशिवाय हे ब्राह्मण रहाणार नाहींत. तो आपला धोंडभटजी तर फारच एकेरीवर आला आहे, आणि म्हणत आहे कीं, माझ्या ह्मणण्याप्रमाणें याग झाला नाहीं, तर मी कसलेंसें पाणी आणून अग्निकुंडांत ओतणार ! आणि सरसुभे वगैरे मंडळींची त्याला फूस असून तेही जोरानें असेंच ह्मणत आहेत.

**जगत्काका**—ह्मणूं देत. जरा दम धरा ह्मणावें. दोन तासांच्या आंतबाहेर सर्व यथास्थित होणार आहे. पंडितजींना तेवढें तुह्मी येथें बोलावून आणा. ह्मणजे विचार करतां येईल, पुढें काय करावयाचें त्याचा.

**कुशं०**—ते इकडे येणारच होते.—इतक्यांत येतील ! पण ते आले कीं, त्या ब्राह्मणांचा आणि सरसुभेप्रभृतींचा घोळकाच्या घोळका त्यांचेमागून आलाच म्हणून समजा. मग तुह्मांला मात्र स्वस्थपणा न मिळतां त्राहि भगवान् होऊन जाईल. विचार करा !

( पंडितजी शालजोडी पांघरून व डोक्यास सखलादीची
टोपी घालून प्रवेश करितात. त्यांस काका
उठून आपल्याजवळ आसन देतात. )

**जगत्काका**—पंडितजी, तुह्मी कशाला त्या मंडळींच्या नादीं लागलांत ? इकडे यावयाचें होतें कीं नाहीं ?

**पंडितजी**—मी इकडेच—

( धोंडभटजी व दक्षिणेंतील ब्राह्मण सोंवळें नेसलेले व पळी-
पंचपात्री घेतलेले, व सरसुभेप्रभृति पाटलोणीवर पितां-
बर नेसून, अंगांत लेकरीचे शर्ट घालून, चष्मा
लावून, आणि फोनोग्राफ व त्याच्या बांगड्या
घेऊन प्रवेश करितात. )

**जगत्काका**—( सर्व मंडळींस शांतपणानें ) या, बसा. शांतपणानें मी सांगतों, तें ऐका. मग तुह्मांला जें करणें असेल, तें करा.

आमची ना नाहीं. पण तूर्त—निदान दोन अडीच तास तरी—अत्याचार करूं नका. कोणास कांहीं बोलावयाचें असेल, तर शांत, सौम्य रीतीनें खुशाल बोला. आम्ही ऐकून घेतों. दंगाधोपा, मारामारी, अगर अचकट विचकट शिव्या देऊं नका.

**धोंड०**—काका, आपलें सांगणें वाजवी आहे. आणि तें आह्मांला कबूल आहे. आमच्यासारख्यांचा उदरनिर्वाह दक्षिणेच्या पैशावर. आणि यज्ञासारखी दक्षिणा तर दुसऱ्या कोणत्याही कार्यांत मिळणें शक्य नाहीं, हें आपण जाणतांच. त्याचप्रमाणें मी ऋग्वेदी पुरुषसूक्त्या ब्राह्मण आहें, हेंही आपल्याला माहीत आहेच. तसेंच मी जहा-गिरदारांचा पुरातन आश्रित आहें, हें ह्या गांवांत सर्वांना माहीत आहेच. मी ऋग्वेदी हौत्र ह्या यागाकरितांच शिकलों आहें. इतकें असून हे कुशंभट आणि हे पंडितजी मला होतृगणांत वरण्याचें नाकारतात, हा अत्याचार नव्हे काय ?

**कुशं०**—काका, माझें थोडें ऐकून घ्या, आणि मग जें काय बोलावयाचें असेल, तें बोला. धोंडभट ऋग्वेदी आहे. त्यानें हौत्र नुक-तेंच म्हटलेलें आहे, हें मला कबूल आहे. पण त्याला तें पुरुषसूक्ता-प्रमाणें घडघड व बिनचुक ह्मणतां येत नाहीं. अतिशय चुका करतो, व संचार जातात. म्हणून मी म्हटलें कीं, दक्षिणेंतील उत्कृष्ट दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण आले आहेत, त्यांपैकीं होतृगणांत ऋत्विज वरून धोंडभटजींनीं माझ्या हाताखालीं राहून मला एकंदर व्यवस्थेचे कामांत मदत करावी. पण हें त्यांना कबूल नाहीं. आणि उगीच चवताळून गेले आहेत.

**सप्तगोदावर्याचार्य तेलंग**—आम्ही वडोद्ऱ्याहून दक्षिणे-करितां आले होते. धनपाळी परीक्षा दयांत........इकडे प्रचंड याग होष्यमाण आहे, एतत् श्रवण करून, तथा खंडापट्टी दक्षिणा प्राप्त होत आहे, इति श्रवण करून, धोंडभट आचार्य 'याज्ञिकधुरंधर' यांजकडे निवास केले. त्यांनीं विचारलें. आह्मी सांगितलें. हो हो, आम्ही

तसेंच करा म्हटले. द्विगुणित दक्षिणा प्राप्तव्येन प्रायश्चित्तो भवति इति बोलले. आनंतर--

**श्रौताचार्य** ( दक्षिणेंतील हिरण्यकेशी ब्राह्मण )—( एकदम उठून ) कसलें आनंतर आणि कर्मांतर घेऊन बसलांत ! ( सर्व मंडळीस उद्देशून ) येथें जमलेल्या विद्वान् व वेदशास्त्रनिपुण ब्रह्मवृंदास माझी हात जोडून अशी विनंति आहे कीं, मला सर्वांनीं ह्या वादांत चार शब्द बोलण्याची कृपा करून परवानगी द्यावी. मी जरी येथें नवा आहें, तरी दक्षिणेंत माझा मोठा नांवलौकिक असून श्रौतासंबंधीं मला चांगली माहिती आहे. माझें ह्मणणें असें आहे कीं, यजमान जहागिरदारसाहेब हे माध्यंदिनशाखी आहेत. तेव्हां त्यांनीं आपल्या संहितेंत व कात्यायनसूत्रांत सांगितल्याप्रमाणें याजुष होतच केलें पाहिजे. तसें न करतील, तर त्यांना शाखारण्डत्व दोष प्राप्त होऊन कदाचित् मरणही प्राप्त होण्याचा संभव आहे, असें मला स्पष्ट सांगितलें पाहिजे. मी दक्षिणेच्या लोभानें येथें आलेला नाहीं. माझी घराकडे चांगली सावसावकारी असून माझें येथें येण्याचें कारण इतकेंच कीं, हा याग वेदशास्त्रास व श्रौतसूत्रास अनुसरून व्हावा, व यजमानाला शाखारण्डत्वाचा दोष लागून मरण येऊं नये. दुसरें—

**धोंड०**--( मोठ्यानें व अंगविक्षेप करून ) आला आहे श्रौताचार्य ! इकडे आम्ही अन्नरण्डत्वाच्या भीतीनें मरतों आहोंत ! आणि हे उंटावरले शहाणे शाखारण्डत्व घेऊन बसले आहेत ! ह्मणे, यजमान मरतील ! मरूं देत आमचे यजमान ! त्यांना एक दोन घटकांच्या आंत मरून जिवंत होण्याची संवय आहे, समजलांत ! तुलाच भार्यारण्डत्व प्राप्त होऊं दे ! चल नीघ येथून !

**जगत्काका**---अहो धोंडभटजी, हें काय तुम्ही आज आरंभलें आहे बरें ? त्या श्रौताचार्यांनीं अगदीं बरोबर श्रौतसूत्राचें विवरण केलें आहे. असें असून तुम्ही त्यांची विनाकारण निर्भर्त्सना करतां, हें मला अगदीं पसंत नाहीं.

**पंडितजी**--कांकांचें ह्मणणें अगदीं रास्त आहे. शास्त्रासंबंधीं वादविवादांत असलें पोरकट व अडदांडपणाचें वर्तन चांगलें नाहीं.

**धोंड०**—( मोठ्यानें व अंगविक्षेप करून ) चला हो, मोठे आले आहेत थेरडे शास्त्रार्थ सांगावयाला ! ह्या काकांनीं तर आमच्या गांवांत शिरल्यापासून शास्त्राची आणि पैशाची राखरांगोळी मांडली आहे. आणि त्यांना साह्य ते तिकडे कोपऱ्यांत बसलेले ( नंदकिशोराकडे बोट करून ) मोठे पंचपारिक्ष्य वकील ! आणि ती पंचपतिव्रता बभ्री ! वा ! उत्तम मिळाले न् काय ? असो. तुमचें शाखारण्डत्वाचें ह्मणणें आहे ना ? ठीक आहे. आम्ही या फोनोग्राफानें याजुष हौत्र करतों. हौत्रच काय, पण सगळा याग मी ह्या फोनोग्राफानें करतों ! द्या सगळे ब्राह्मण हांकलून ! आणि त्यांची सर्व दक्षिणा आह्मांला द्या ! ह्यांत कोणाचा अपमान नाहीं, आणि कोणाला दोष लावावयाला नको ! कसें ? आहे मर्जी ?

**डॉ० पड०**—आणि मी म्हणतों, ते तुम्ही आणलेले पशुही आमचे स्वाधीन करा. ह्मणजे मी त्यांना तपासून त्यांच्या काळजाचा भाग बिघडूं न देतां उत्तम शस्त्रक्रियेनें सारखे तुकडे करीन. ह्मणजे पुढें मटन-ह्मणजे मांस अगर चरबी-संबंधीं लठ्ठालठ्ठी व्हावयाला नको !

**पंडितजी**—( काकांस ) काय काका, ठीक चाललें आहे ना ? आतां आणखी ह्या यागाची विटंबना करावयाची हौस आहे ना ?

**जगत्काका**—मला कसली हौस ! मी मैत्रेय ऋषींच्या पत्राची वाट पहात आहें, दुसरें काय !

( पंडितजींचा शिष्य मैत्रेय ऋषींस भेटून त्यांचा निरोप घेऊन परत आलेला प्रवेश करितो. )

**पंडितजींचा शिष्य**--( पंडितजींस, काकांस व कुशंभटास नमस्कार करून ) मैत्रेय ऋषि म्हणाले, " तूं जा. मी पत्राचें उत्तर वायूबरोबर पाठवितों. व त्याची नक्कल वादविवाद करणाऱ्यांपैकीं जे प्रमुख

आहेत, त्यांच्याकडे पाठविण्याचें करतों. तूं जा, आलास तसा. तुझ्याजवळ देतां येत नाहीं."

**जगत्काका**---मैत्रेय ऋषींनीं ही चांगली युक्ति काढली. सांप्रत चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं, हें पाहून त्यांनीं वायूबरोबर उत्तर पाठविलें, हेंच ठीक केलें. (पंडितजींस) जरा कुंभक करून पहा बरें, तुमच्याकडे उत्तर आल्यास केव्हां पोंचणार तें.

**पंडितजी**---हें मला मिळालेंच आतां इतक्यांत! (पत्र काढून काकांस दाखवितो.)

**सर०**---असली लटपट येथें चालावयाची नाहीं, समजलांत! पत्राची नक्कल माझ्यापाशीं मिळाली पाहिजे, तरच मी खरें समजेन!

**डॉ० पड०**---आणि माझ्यापाशींही मिळाली पाहिजे!

**धोंड०**---आणि मलाही स्वतंत्र नक्कल मिळाली पाहिजे. मी तुमच्या त्या मैत्रेय ऋषीला ओळखीत नसतों, समजलांत!

**पंडितजी**---ठीक आहे. (प्राणायामानें कुंभक करून) धोंड-भटजींच्या डोक्यावरच्या धाबळींत, सरसुभ्यांच्या रुमालांत, आणि डॉक्टर पडघमांच्या टोपीखालीं नक्कल मिळेल!

**सर०**---(हातरुमाल झाडतात.) हा घ्या रुमाल, आणि तुह्मीच वाचा, अगर मैत्रेय ऋषीकडे पाठवा!

**पंडितजी**---हातरुमालांत नाहीं, डोकीवरचे रुमालांत पहा.

(सरसुभे डोकीवरचा रुमाल काढून झाडतो. व त्यांतून पत्र निघतें, तें घेऊन स्वस्थ बसतो.)

**धोंड०**---आमची नक्कल कोठें आहे बावा? डोक्यांत तर कोणी टाकली नाहीं ना इतक्यांत! (धाबळी काढतो व त्यांत निघा-लेलें पत्र हातांत घेऊन) हें त्या साळू जखणीचें काम आहे. मैत्रेय ऋषि वगैरे सब झूट आहे. त्या जखिणीनें माझा सत्यनास उडविला!

**डॉ० पड०**---(टोपीखालीं हात घालतो, व त्याला नक्कल

मिळते. ती घेऊन फाडून टाकतो. ) हा कागद टोपीवाल्या कंपनीचा अजून कसा टोपींत राहिला बुवा !

**पंडितजींचा शिष्य**—( डॉक्टर पडवमनीं फाडलेले तुकडे चटकन् उचलून ) हे पहा, हे नकलेचेच तुकडे डॉक्टरांनीं केले आहेत.

**पंडितजी**—जाऊं दे रे. आपणास ह्यांच्याशीं बाचाबाच करण्यास वेळ कुठे आहे ? तूं मैत्रेय ऋषींचें पत्र मोठ्यानें वाच कसें. ( त्यास पत्र देतो. )

**पंडितजींचा शिष्य**—( पत्र हातांत घेऊन वाचण्यास सुरवात करतो. )

स्वस्तिश्रीवेदशास्त्रसंपन्न सकलविद्यापारंगत ब्रह्मनिष्ठ कुशंभट गर्गे, पंडित ज्ञानसागर व जगत्काका यांचे सेवेसी.

मैत्रेय यांचा शिरसाष्टांग नमस्कार. आपले मनोगत योगबलानें ज्याप्रमाणें मला कळतात, त्याप्रमाणें माझे मनोगतही आपल्याला तेथें कळतात, हें मी जाणून आहें. तथापि जो विशिष्ट हेतु मनांत धरून पत्र लिहिलें आहे, तोच हेतु मनांत बाळगून मीही लेखी उत्तर पाठवीत आहें. साग्र मनन करून त्याप्रमाणें व्यवस्था तत्काळ करावी. उत्तर लिहिते वेळीं देवेंद्र जवळ बसला होता. त्यास सर्व हकीकत सांगून त्याचा विचार घेऊन, कैलासवासी यशवंतरावमहाराज हे सहज मला भेटावयास आले होते, त्यांचेकडून हें लिहविलें आहे. असो.

१ आपलें ठरल्याप्रमाणें सोमयागाचें कृत्य आवरून घेऊन अवभृथ स्नानाचें पुण्य सर्वांनीं संपादन करावें.

२ तेथें जमलेल्या दक्षिणेकडील कोणत्याही ब्राह्मणास यज्ञांत न घेतां त्या प्रत्येकास त्याच्या ओंजळभर रुपये देऊन त्याची सन्मानानें परत पाठवणी करावी. त्यांच्यांत जो हौत्राचा तंटा आहे, तो मिटविण्याची सध्यां ईश्वराची इच्छा नाहीं. थोड्याच काळांत हिरण्यकेशी भिक्षुक कमी कमी होत जाऊन हा तंटा आपोआप मिटणार आहे. ह्या तंट्याचे मुळांत आढ्यता, विद्वत्तेची घमेंडी,

अनादर, व दक्षिणेचा लोभ आहे. यज्ञासाठीं ऋत्विज पंडितजींचे शिष्यगणांपैकीं वरावे. एकाददुसरा कमी आल्यास तांबट, शिंपी, सोनार ह्या जातींपैकीं एकाददुसऱ्यास ज्ञानेश्वरमहाराज अगर श्रीसमर्थ रामदास ह्यांच्याप्रमाणें तजवीज करून चतुर्वेदी ब्राह्मण तयार करावा.

३ जहागिरदारांनीं यज्ञदीक्षा घ्यावी, व कनवठीस सुपारी लावावी; ह्मणजे बभ्रीला यज्ञांत पत्नी ह्या नात्यानें वागणें अगदीं सशास्त्र होईल.

४ फोनोग्राफानें यज्ञ करणाऱ्या मंडळींस यज्ञमंडपांतून कायदेशीर उपायानें हांकलून द्यावें. त्यांस कांहीं एक दक्षिणा देण्याचें कारण नाहीं. ह्या मंडळीच्या अत्याचारानें इंद्र फार क्षोभला असून नुकताच दक्षिणेंतील भागानगरावर जो दारुण प्रसंग ओढवला, तसा प्रसंग अनघपुरावरही लौकरच ओढवेल, असा त्यानें शाप दिला आहे. भागानगरांत एका ब्रह्मक्षत्रियानें असाच फोनोग्राफ यंत्रानें यज्ञ करण्याचा विचार केला होता. पण तो बेत शहरांत एकाएकीं पाणी शिरून चोहोंकडे जलमय झाल्यानें फसला. तसाच प्रसंग इंद्रशापानें अनघपुरावर येऊन थोडक्याच दिवसांत अनघपुर नर्मदा-गर्क होऊन जाईल. करितां प्रत्येकानें सावध रहावें !

५ तुह्मी जे यज्ञाकरितां पशु आणिले आहेत, ते सर्व सोडून द्यावे. व यज्ञांत पशूंऐवजीं आज्याची अथवा घृताची योजना करावी. तुम्ही आणलेल्या पशूंपैकीं चार पशूंला इंद्र स्वतः लांडग्याचें रूप घेऊन भक्षण करणार आहे; व बाकीचे पशु इंद्र, वरुण व अग्नि ह्यांचे तंट्यांत आहेत. त्या तंट्याचा निकाल होईपर्यंत पशुयज्ञ कोणीही करूं नये.

६ अवभृथस्नान झालें कीं, विलंब न करितां जहागिरदारांनीं आपले अनुयायी मंडळीसह वाराणसीस विश्वेश्वराचे दर्शनाकरितां निघून जावें.

७ ही आज्ञा आपल्यास पोहोंचल्यापासून नर्मदेच्या पाण्यास वाढ सुरू होईल, व अखेरीस अनघपुर बुडाल्यावर ती कमी होईल. कळावें. हेच पत्रीं यशवंतराव भोसेकरांचे सर्वांस साष्टांग नमस्कार. भेटीची फार इच्छा आहे. ईश्वरी इच्छेप्रमाणें होणार आहे. असो.

**दस्तुर यशवंत भोसेकर.**

**पंडितजी**—( नंदकिशोरास ) साहेब, आतां आम्ही यज्ञमंडपांत जातों. एकंदर सर्व गोष्टींचा खुलासा मैत्रेय ऋषींनीं केला आहे. त्याप्रमाणें यज्ञाचें कृत्य आतां उरकून घेण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं. तुह्मी दक्षिणा देण्याची व्यवस्था करा. व ज्यांना दक्षिणा द्यावयाची नाहीं, त्यांस हांकलून लावा. तुह्मांला कायदा माहीत आहेच.

( सर्व उठतात. )

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश ३ रा.

**( स्थळ—जहागिरदारांचा वाडा. पुढील सोप्यांत जगत्काका, जहागिरदार, बभ्री व कमलादेवी वगैरे मंडळी बसली आहे. )**

**जगत्काका**—कां देवी, बापूचा आणि बभ्रीचा कसा जोड जमला आहे? ठीक आहे कीं नाहीं? मला तर हुबेहुब लक्ष्मीनारायणाचाच भास होतो!

**कमलादेवी**—आहेत खरीं तीं दोघेंही तशींच! मीही तेंच ह्मणणार होतें.

**जगत्काका**—पण ईश्वर सुखानें भाकरी खाऊं देत नाहीं म्हणतात, तें अगदीं खरें आहे. ह्याच वेळेस ह्या नर्मदेच्या पाण्याची भीति कां उत्पन्न व्हावी? बिचारे सगळे लोक हवालदील होऊन गांव सोडून चालते होत आहेत. हें संकट मध्येंच उद्भवलें नसतें, तर

दोन चार वर्षांत आमचा बापु दोन मुलांचा बाप होऊन मी आजोबा झालों असतों.

**कमला०**—खरेंच. काका, हें नदीचें पाणी काय चमत्कारिक रीतीनें चढूं लागलें हो! अखेरीस सगळा गांव उठून जाणार कीं काय? सकाळीं कोंडाऊ नदीवर धुवावयास गेली होती, ती सांगत होती कीं, आपल्या वाड्याच्या दक्षिणच्या भिंतीपासून पन्नास हातांवर पाणी आलें आहे!

**जगत्काका**—होय ग देवी! हेंच तें मी म्हणतों मोठें संकट प्राप्त झालें आहे. हा वाडा थोडा उंचावर आहे, म्हणून बरें. बाजाराकडली बाजू बहुतेक गर्क होऊन गेली आहे, म्हणतात. साहेब तेंच पहावयास गेला आहे. परत येईल इतक्यांत. मग आपला बेत ठरवूं.

(नंदकिशोर प्रवेश करितो.)

**नंद०**—काका, आटपा आतां. तुह्मांला एक दोन दिवसांत आतां येथून गेलेंच पाहिजे. मग आह्मांला आतां कशाला ठेवून घेतां? आह्मांला आतांच्या गाडीनें जाऊं द्या. आणि तुम्हीही उद्यां किंवा परवां निघाच येथून!

**जगत्काका**—आह्मांला काय? आमची आजच तयारी आहे. मी म्हणतों, आपण सर्वच बरोबर जाऊं. पाण्याची काय अहवाल आहे? गांवांत शिरलें आहे ना?

**नंद०**—गांवांत शिरलें आहे ना! अहो अर्धा गांव बुडून गेला आहे! तुम्ही आहांत कोठें? धोंडभटजींचा बंगला सफाई बुडाला! सरसुभ्यांचा बंगला, डॉक्टरांचा बंगला हेही पार बुडून गेले! ते दोघेही आवराआवरी करून येथून केव्हांच इंदुराकडे निघून गेले. रावसाहेब रत्नपारखी, रावबहादुर डमरु, हेही काल गेले. बाजार सर्व उठून मंडळेश्वरास गेला म्हणतात! आपल्या वाड्याच्या शेजारची वस्ती मात्र अजून उठली नाहीं. धोंडभटजींचें रहातें घर मात्र अजून शाबूत आहे. तो बोंबलत होता ठणाणा! आणि मला पाहून तर त्यानें आपल्या सर्वांवर एकसारखा शिव्यांचा भडिमार चालविला होता!

**जगत्काका**—तो कोठें जाणार? का येथेंच रहाणार आहे कोठें जवळपास? चल म्हणावें आमच्याबरोबर.

**नंद०**—जरा थांबा, आपोआप स्वारी येईल. त्याचें तें भाकरीचें यंत्र—तें खाद्यपेयारामगृह—सर्व वाहून जाऊन सभोंवती पाण्यांत बिस्कुटें आणि भाकरीचे शिळे तुकडे वहात आहेत! माशांना खूप लाट लागली!

**जगत्काका**—त्या बिचाऱ्याचें फार नुकसान झालें! पण मोठा उद्योगी खरा! मला वाटतें, त्याला तूं चार पांच हजार रुपये दे, आणि सांग कीं, आतां उगीच उपद्व्याप करूं नकोस! एक शिवण्याचें यंत्र घे, आणि शिंप्याचा धंदा कर. अगर विड्या आणि सोडावॉटर विकीत जा कसा! ह्याला फार भांडवल नको!

**नंद०**—तुह्मी स्वस्थ बसा. तो आपोआप येईल. मग काय करावयाचें, तें करूं. आतां तूर्त आह्मांला जाऊं द्या. बांधाबांध केली पाहिजे ना? माझ्याशिवाय कोण करणार? (कमलादेवीस उद्देशून) ही आयत्या वेळीं शालजोडी घेऊन गाडींत मात्र बसेल!

**जगत्काका**—आम्हीही तुमच्याच बरोबर येतों. तुमच्या मागें येथें राहून तरी काय करावयाचें?

**बापु०**—आतां ह्यांच्या बरोबर जाऊन काय करावयाचें? परभारें गेलें, तर आपण लौकर नाहीं का जाऊन पोहोंचणार? उगीच मथुरेकडून वांकडें कां जा?

**नंद०**—खरेंच, काका. तुह्मी, बापुसाहेब, बभ्री आणि कुशंभट परभारेंच जा. उद्यां काशीस पोहोंचाल. परवां सकाळीं गंगेचें स्नान करा. दोनप्रहरीं कोणास श्राद्ध वगैरे करावयाचें असल्यास करा. आणि संध्याकाळीं बभ्रीला बापुसाहेबांच्या स्वाधीन करून तुह्मी भजन करीत बसा कसे! हं, उठा, आतां वेळ घालवूं नका. (जातो.)

[ पडदा पडतो. ]

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

( स्थळ—वाराणशी क्षेत्र. मणिकर्णिकेच्या घांटावरील धर्मशाळा. बापूसाहेब व कुशंभट बोलत बसलें आहेत. )

**बापु०**—काय हो बाबा, काकांना आणि तिला जाऊन बराच वेळ झाला नाहीं का? अजून गंगेचें स्नान झालें नसेल म्हणतां? आतां यापुढें आपलीं स्नानें होऊन विश्वेश्वराचें दर्शन केव्हां होणार? आज बहुतकरून चार वाजणार आपल्याला हें सगळें आटपायला, असें दिसतें.

**कुशं०**—खरेंच, फार वेळ लागला ह्यांना. मी त्या दोघांना घेऊन येतों. उगीच तिष्ठत बसण्यांत अर्थ नाहीं.

**बापु०**—जा, जा, त्या दोघांना पुढें घालून आणा. तीं दोघें—ते गुरु आणि ती शिष्यीण—नादी आहेत. बसतील तिथेंच बसतील. मागची शुद्ध असेल तर कीं नाहीं! ( कुशंभट जातो. )

**बापु०**—( स्वगत ) काय इतके दिवस ह्या ह्याताऱ्यानें चाळवाचाळवी लाविली आहे! थांबा ह्मणावें. आज रात्रीं कोणाची कांहीं एक सबब न ऐकतां बन्नीला खोलींत घेऊन जाऊन इतके दिवसांचें उट्टें काढतों, ह्मणावें. तुह्मी काय समजलांत! आणि उद्यां सकाळीं काकांना आणि ह्या दुसऱ्या थेरड्याला देतों हांकलून. आणि बन्नीला मथुरेस घेऊन जातों. पुढचें जसें जमेल, तसें पाहतां येईल. मोठे मौजेचे दिवस येणार आहेत ह्याच्यापुढें!

( कुशंभट पडद्यांतून: "अहो बापुसाहेब, तुह्मांला पोहतां येत असल्यास लौकर बाहेर या, आणि गंगेंत उडी टाकून दोघांना लवकर काढा! काका आणि बन्नी दोघेंही गंगेंत बुडालीं हो बुडालीं! चला चला, सर्व घोंटाळा झाला!" )

**बापु०**---( तोंड उघडें ठेवून ऐकून ) कुशंभट भद्र्याच हें बोलतो आहे! आतांच्या आतां बुडी मारून निदान बभ्रीला तरी पाताळांतून काढतों ह्मणावें. जाते कोठें? (जातो.)

[ पडदा पडतो. ]

### प्रवेश २ रा.

**स्थळ—नारदोद्यान. अश्वत्थामा निजला आहे. नारद ऋषि जवळच आसनावर समाधिस्थ बसले आहेत. )**

**नारद**—( समाधि उतरून, आचमन करून व डोळ्यांस पाणी लावून ) अश्वत्थाम्या, ऊठ. चांगली चळवळ करतो आहेस. मग उठत कां नाहींस? झोंप पुरी झाली नाहीं का तुझी?

**अश्वत्थामा**--( खडबडून उठून बसतो व इकडे तिकडे पाहून नारदास ) काका, तुह्मी निघालांत का बाहेर? बभ्री बुडाली वाटतें? कुशंभट गर्गे कोठें आहेत? ते आले नाहींत का अजून?

**नारद**--कोण काका? आणि कुठली बभ्री? तूं अजून झोपेंतच आहेस वाटतें? ( पंचपात्री पुढें करून ) त्यांतलें पाणी डोळ्यांला लाव, आणि एक दोन गुळणे कर, ह्मणजे चांगला सावध होशील.

**अश्व०**—( पंचपात्रींतील पाणी डोळ्यांस लावून व गुळणे करून ) मी अगदीं सावध झालों आहें, काका. आणि ह्मणूनच विचारतों कीं, कुशंभट गर्गे आणि बभ्री मागाहून येत आहेत कीं काय?

**नारद**--अश्वत्थाम्या, तूं सावध असशील; पण तूं थोडें विचक बोलतो आहेस. त्यावरून मला वाटतें कीं, तुला स्वप्न पडलें असावें. आणि त्यासंबंधीं तूं कांहीं विचारतो आहेस. तूं पक्का जागा झालास का? तुझें डोकें दुखण्याचें आतां बरें आहे का, हें अगोदर मला सांग पाहूं.

अश्व०—माझें डोकें व माझें शरीरही आतां पूर्ववत्—ह्मणजे भारतीय युद्धाच्या वेळीं—जसें निकोप होतें, तसें झालें आहे, व मला एक प्रकारचा उत्साहही वाटूं लागला असून मला आतां वाटेल तें काम करण्यास कसलीही अडचण राहिली नाहीं, असें वाटतें.

नारद—फार उत्तम झालें. देवानें कृपा केली तुझ्यावर. मी तेवढ्याचकरितां तुझ्याकडे आलों होतों. आतां माझें काम झालें. मी आतां जातों. मला दुसरीं पुष्कळ कामें आहेत. आणि तीं माझीं मलाच केलीं पाहिजेत. तूं मात्र आजपासून तपश्चर्येस आरंभ कर. उगाच भटक्या मारण्यांत काळ घालवूं नकोस. तपश्चर्येच्या अगोदर प्रायश्चित्ता-निमित्त निदान दोन गायत्रीपुरश्चरणें कर, ह्मणजे तुझें शरीर निकोप राहील. ( जाण्याकरितां उठतो. )

अश्व०—( नारदाचा हात धरून व त्यास खालीं बसवून ) काका, एक क्षणभर थांबा, आणि कृपा करून माझ्या प्रश्नांचा उल-गडा करा. आपल्यावांचून मला कोण सांगणार बरें? मला स्वप्न पडलें असावें, व त्यासंबंधीं मी विचारीत आहें, असें ह्मणतां. पण मी सोम-याग केला; अवभृथस्नान केलें; बभ्री नांवाच्या स्त्रीबरोबर माझा पार्थिव विवाह झाला; ह्या सर्व गोष्टी नर्मदेच्या कांठच्या ज्या गांवांत झाल्या, त्या अनघपुर गांवांत नर्मदेचें पाणी शिरूं लागलें; सर्व गांव उठला; तुह्मी, मी, बभ्री व कुशंभट गर्गे ओव्हरयात्रेकरितां काशीस आलों; व तेथें तुह्मी आणि बभ्री गंगेच्या स्नानाला गेलांत आणि गंगेंत बुडा-लांत; ह्या सर्व गोष्टी मी प्रत्यक्ष पाहिल्या असून आतां मला त्या सर्व स्वप्नांत पाहिल्या ह्मणणें भाग आहे. तथापि ह्या दोन घटकांच्या स्वप्नांत इतक्या गोष्टी कशा घडून याव्यात, ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें! शिवाय आपणही माझ्या ह्या स्वप्नांत खास होतां, अशीही माझी पक्की खात्री आहे. जगत्काका ते आपणच, महाराज! आणि ह्मणूनच मी तुह्मांला आजपासून 'काका'च ह्मणणार.

**नारद**—तूं ज्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्याचें सांगतोस, त्या सर्व तूं स्वप्नांतच पाहिल्या आहेस. तुझ्याकडून सोमयाग होऊन तुला अवभृथस्नान घडलें, हें–स्वप्नांत कां होईना–पण खरें आहे. कारण, ह्याशिवाय तुझें डोकें ताळ्यावर येणार नव्हतें, असा ईश्वरी संकेतच होता. हा याग मी तुझ्याकडून जागृत अवस्थेंतच करविणार होतों, हें तुला आठवत असेलच. पण तूं जेव्हां तें कबूल केलें नाहींस, तेव्हां मी तुला मानासिक याग करण्याबद्दल सुचविलें. पण तूं पडलास कुरेंबाज! तुला तेंही पसंत पडेना. आणि ईश्वरी कार्य करणें तर भाग होतें. म्हणून मी भगवान् विष्णूपाशीं गेलों, हेंही तुला आठवत असेलच. विष्णूला मग काय उशीर! त्याला सर्व हकीकत कळल्याबरोबर त्यानें जें जें करणें अवश्य होतें, तें तें सर्व तुझ्याकडून स्वप्नांत चटकन् उरकून घेतलें, झालें! आतां स्वस्थ बैस आणि आपल्या उद्योगाला लाग.

**अश्व०**—काका. आपण म्हणा स्वप्न पाहिजे असेल तर! आणि मलाही तसेंच ह्मणणें भाग आहे. पण मला वाटतें, ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष घडल्या आहेत. आणि आपणच त्या जगत्काकांच्या रूपानें घडविल्या आहेत, असें माझें ह्मणणें आहे.

**नारद**—असेल, तसेंही असेल! नाहीं कोणी ह्मणावें! स्वप्नांत झालेले व्यवहार जागृत अवस्थेंतही खरे मानून त्याप्रमाणें वागणारे महात्मे ह्या भारतवर्षांत पूर्वीं होऊन गेलेले आहेत. नाहीं असें नाहीं. सूर्यवंशी हरिश्चंद्रानें काय केलें? असेंच केलें. पण बाबा, कोणीकडे तो सत्त्वशील हरिश्चंद्र आणि कोणीकडे तूं शापग्रस्त ब्राह्मणपुत्र अश्वत्थामा! ह्मणून मी ह्मणतों कीं, तूं सांगतोस ह्या सर्व गोष्टी स्वप्नांतच घडल्या असाव्यात. कदाचित् तुझ्या वडिलांची पुण्याई व त्यांनीं भारतीय युद्धांत बजाविलेलें कर्तृत्व मनांत आणून भगवान् गोपाळ कृष्णानें आपल्या मायेनें ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष घडत आहेत, असेंही दाखविलें असेल. नाहीं कोणी ह्मणावें?

**अश्व०**—मलाही तसेंच वाटतें, आणि ह्मणूनच मी आपल्याला खोदून खोदून विचारतों कीं, ह्या प्रत्यक्ष घडलेल्या व्यवहारांत जगत्काका आपण होतां, कीं दुसरी कोणी व्यक्ति होती?

**नारद**—अरे, जर हा सर्व व्यवहारच ईश्वरी मायेनें घडवून आणिला असें तूं ह्मणतोस, तर त्यांत दुसरी तिसरी व्यक्ति असणार कोठून? नामरूप मात्र व्यवहाराच्या बतावणीपुरतें निराळें असावयाचें. बाकी सर्व व्यक्ति तो कृष्ण परमात्माच नटला असला पाहिजे. तेथें द्वैत शक्यच नाहीं.

**अश्व०**—मग जगत्काका ह्मणतां तो कृष्णपरमात्माच होता तर?

**नारद**—होय. तुला ह्यांत संशय घेण्याचें कारणच नाहीं.

**अश्व०**—आणि नंदकिशोर?

**नारद**—तोही कृष्ण परमात्माच.

**अश्व०**—आणि तो लफंग्या धोंडभटजी परमात्माच का?

**नारद**—होय, तो धोंडभटही परमात्माच. आणि ह्याबद्दल तुला आश्चर्यही वाटण्याचें कारण नाहीं. गोकुळांत असतांना जो यःकश्चित् गवळ्यांच्या पोरांच्या पायांतील वहाणा होण्यास कचरला नाहीं, तो धोंडभट, पाषाणदीक्षित, अगर दगडशास्त्री होण्यास मागें सरेल काय! पण बाबा, तुला ह्या सर्व गोष्टी बरोबर कळण्याला तपश्चर्याच केली पाहिजे. आणि ह्मणूनच मी ह्मणतों कीं, तूं तपश्चर्येच्या आरंभीं प्रायश्चित्तानिमित्त अगोदर दोन गायत्रीपुरश्चरणें कर. त्यानें तुला दिव्य दृष्टि प्राप्त होईल. व मग तुला ही ईश्वरी माया बरोबर कळूं लागेल. प्रथम तुला स्वतः तूं कोण आहेस, हें कळेल. आणि मग आपोआप तुला इतर सर्व कळूं लागेल.

**अश्व०**—मी कोण, हें आपल्याला माहीत असलेंच पाहिजे. आणि तसें असेल, तर तुह्मीच कां सांगानात; म्हणजे मला धीर येईल. आणि तसेंच बभ्री कोण तेंही मला सांगा.

**नारद**—बभ्री ही श्रीकृष्णपुत्र सांबच. दुसरें कोण असणार? त्याला शाप झाला होता, त्याप्रमाणें पांच पतींशीं विवाह करून अखेरीस सोमयागानंतर अवभृथ स्नान करून भागीरथींत उडी टाकून तो स्वर्गास चालता झाला. तूं शंकराचा अंश असून चिरंजीव असल्यामुळें हा देह धरून राहिला आहेस, व ह्या—म्हणजे वैवस्वत—मन्वंतराच्या अखेर-पर्यंत तुला असेंच रहावें लागेल. पुढें सावर्णि मन्वंतरांत तो विरोचनपुत्र बली होणार असून तूं वेदव्यास होशील. पण तूं जर तपश्चर्या करीत राहिलास तर. नाहीं तर तुझी नेमणूक कदाचित् रद्द होण्याचा संभव आहे.

**अश्व०**—ठीक आहे तर! मी आतां घोर तपश्चर्या करण्यास सुरवात करितों. माझी नेमणूक झाल्यास हल्लींच्या व्यासांचें भारत अगोदर दुरुस्त करून त्यांत ही माझ्या सोमयागाची हकीकत स्पष्ट लिहून ठेवितों. ह्मणजे पुढें लोकांस शंका घेण्यास जागा उरणार नाहीं.

**नारद**—हल्लींच्या भारतांत ह्या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख नसल्या-मुळें लोकांचें थोडेंच अडून राहिलें आहे! तथापि तुला व्यासांचा अधि-कार प्राप्त झाल्यावर तुझा हात कोण धरणार? आणखीही एकदोन गोष्टी मला सुचल्या आहेत. त्यांचीही दुरुस्ती करून टाक कशी. गोकुळांत असतांना श्रीकृष्णाचें ज्या गोपीशीं सख्य होतें, त्या राधेचें श्रीमद्भागवतांत कोठें नांव सुद्धां नाहीं; मग वंदनपूजन लांबच राहिलें. असें असून लोकव्यवहारांत राधेवांचून कृष्णाचें नांव कोणी घेत नाहीं. करितां ही दुरुस्ती फार महत्त्वाची असून अगोदर करून टाक कशी! त्याचप्रमाणें भारतांतल्या ज्या कथा इतर पुराणांत चुकून गेल्या आहेत, त्या भारतांत घालून भारताचा एकलक्ष ग्रंथ पुरा कर. व हरिविजय हा ग्रंथ जो हल्लीं भारताचाच भाग समजला जातो, तो निराळा ग्रंथ करून टाक. म्हणजे सर्व सुव्यवस्थित होईल.

**अश्व०**—हें सर्व माझ्या तपश्चर्येवर अवलंबून आहे, ह्मणतां?

**नारद**—अर्थात्‌च. तपावांचून काय होणार? जगाची घडामोड करणारे शंकर, विष्णु, ब्रह्मदेव हे देवही जर तप करताहेत, तर तुलाही केलेंच पाहिजे. आणि म्हणूनच मी तुला वरचेवर तप करण्यास सांगत आहें.

( कलि प्रवेश करितो. )

**कलि**—( नारदास वंदन करून ) महाराज, आपण ह्या पोराच्या नादीं काय लागतां? ह्याला आज पांच वर्षें ज्या गोष्टीचा संस्कार नाहीं, ती ह्याच्यानें कशी पार पडणार? हा तुमच्या तोंडावर मात्र हो हो म्हणेल! आणि तुह्मी पाठमोरे झालांत कीं येरे माझ्या मागल्या म्हणून भटक्या मारावयाला लागेल!

**नारद**—मी ह्याचीं दोन पुरश्चरणें झालीं कीं, एकदा येऊन ह्याला भेटून पुढें तपश्चर्येच्या मार्गास लावून देईन. मला हें केलेंच पाहिजे. तूं मात्र ह्याला कोणत्याही प्रकारचा त्रास देऊं नकोस, अशी तुला माझी आज्ञा आहे. आणि आतां मी जातों. अश्वत्थाम्या, तूंही आतां जा, आणि मी सांगितल्याप्रमाणें करण्यास आरंभ कर. ( उठतात, व तंबुरा घेऊन "श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव" हा श्लोक म्हणत जातात. )

**कलि**—( अश्वत्थाम्यास ) दम धर बच्चारामजी, कसें तप करतां, तें पहातों! ( मिशांवर हात फिरवून ) माझ्याशीं गांठ आहे. पाहून घेईन.

**अश्व०**—अहो काका, काका! जरा इकडे या हो. हा कलि बघा मला कसा धाक दाखवितो आहे तो!

**नारद**—( प्रवेश करून ) काय रे अश्वत्थाम्या, तूं इतका नेभळा कशानें झालास? कलि काय रे तुला करणार? गायत्री-मंत्रापुढें त्याचें काय चालणार? पण दम धर, मीच चुकलों (कलीस) तूं काय ह्मणून येथें आलास रे? तुला कोणी बोलाविलें होतें?

**कलि**--महाराज, क्षमा करा. तुह्मी ब्राह्मण ब्राह्मण एकत्र मिळून काय करणार हें पाहण्याचें माझें कर्तव्य असल्यामुळें येथें येणें अवश्य झालें. आतां आपली आज्ञा होत असेल, तर मी जातों. कारण आपण दोघेही माझ्या चांगले परिचयाचे आहांत. आणि शिवाय आपण त्या परशुरामाच्या शिफारशीच्या एकाद्या ब्राह्मणाच्या कल्याणाबद्दल बोलत नव्हतां, अशी माझी खात्री आहे. असें नसतें, तर मला भगवान् विष्णूस वर्दी देणें भाग होतें.

**नारद**— वर्दी दे, नाहीं तर वाटेल तें कर. पण तूं सध्यां येथून जा कसा. चल, निघ.

**कलि**--आज्ञा महाराज. ( जातो. )

**नारद**—अश्वत्थाम्या, थांब. पूर्वीं वाल्मीकि ऋषीला जो मंत्र दिला होता, तो मंत्र मी तुला देतों. चल माझ्याबरोबर. प्रातः-काळीं स्नानसंध्यादि कर्म आटोपून माध्याह्न कालापर्यंत गायत्रीमंत्र जपीत जा. नंतर मी देणार आहें, त्या मंत्राचा तेराशें जप करून भोजन करीत जा. आणि भोजनानंतर कार्यकारण रामायणाचा पाठ करीत जा. ह्मणजे तुला कोणाचीच भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

**अश्व०**—चला. आपण जिकडे न्याल, तिकडे येण्याची माझी तयारी आहे. तो कार्यकारण रामायणाचा ग्रंथ व्यासापाशीं आहे कांय?

**नारद**—नाहीं. व्यासापाशीं रामायण कोठून असणार? तुला व्यवहार समजत नाहीं ह्मणतों तो हाच. एकंदर शतकोटि रामायणें वाल्मीकींनीं केलीं आहेत. हीं सर्व रामायणें काशीविश्वेश्वरापाशीं आहेत. त्यांपैकीं "कार्यकारण" रामायण ह्या मृत्युलोकीं नवीन प्रकट करण्याचा त्यांचा विचार आहे. व हें काम ते मैत्रेय ऋषींकडून करविणार असून त्यासाठीं मैत्रेय ऋषि शंकराकडे इतक्यांत जाणार आहेत. आपणही तेथें गेलों असतां आपणासही तें सहज श्रवण कर-ण्यास मिळेल. पुढें तूं मैत्रेय ऋषींपाशींच कांहीं दिवस राहून तें चांगलें

तोंडपाठ कर. तुझीं पुरश्चरणें झालीं, ह्मणजे मी तुला येऊन भेटेन, आणि मग पुढें काय करावयाचें तें सांगेन. तुझ्या योगक्षेमाची तजवीज नर्मदा लावील. मी तिला सांगून ठेवितों. ह्यापुढें तुला भिक्षा मागण्याचें अगर एकाद्या यात्रेकऱ्याजवळ तोंड वेंगाडण्याचें कारण नाहीं. निदान पांच सहा वर्षेंपर्यंत तरी आसन हालवूं नकोस. चल, उठ! ( नारद तंबुरा घेऊन "श्रीकृष्ण गोविंद" हा श्लोक ह्मणत जातात. )

[ पडदा पडतो. ]

समाप्त.